
# साईलीला

श्री साईबाबा संस्थान शिर्डीचे अधिकृत मासिक



## दिवाळी विशेषांक

नोव्हें.-डिसें. १९८२ श्री साईनाथ वाचनालय [किंमत दोन रुपये

342

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :
**श्री.क.हि.काकरे**
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )

## श्रीसाई वाक्सुधा

र्ष ६१ वे) किंमत २ रुपये ( अंक ८-९

नोव्हेंबर-डिसेंबर १९८२-दिवाळी अंक
भक्तस्वानुभव विशेषांक

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी : ४४३२६१
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

मन जातीचेंच चंचळ ।
होऊं न द्यावें उच्छृंखळ ।
होवो इंद्रियांची खळबळ ।
शरीर उतावीळ होऊ नये ॥१७०॥

इंद्रियांचा नाहीं विश्वास ।
विषयार्थ व्हावें न लालस ।
हळू हळू करितां अभ्यास ।
चांचल्य निरास होईल ॥१७१॥

होऊं नये इंद्रियाधीन ।
तीं ही न सर्वथा राहती दाबून ।
विधिपूर्वक तयांचे नियमन ।
करावें पाहून प्रसंग ॥१७२॥

रूप हातों दृष्टीचा विषय ।
सौंदर्य वस्तूचें पहावे निर्भय ।
तेथें लाजेचें कारण काय ।
द्यावा न ठाय दुर्बुद्धीतें ॥१७३॥

मन करोनियां निर्वासन ।
ईश कृतीचें करा निरीक्षण ।
होईल सहज इंद्रियदमन ।
विषय सेवन विस्मरण ॥१७४॥

—श्रीसाई सच्चरित अध्याय ४९ वा.



सर्व सिद्धि प्रदे देवि,
भुक्ति मुक्ति प्रदायिनी ।
मंत्र मूर्ति सदावन्दे
श्री महालक्ष्मी नमोऽस्तुते ॥

सर्व प्रकारचे सुयश, सफलता, भोग आणि मुक्ती देणाऱ्या मंत्ररूप असणाऱ्या हे श्री देवी महालक्ष्मी तुला नमस्कार असो.

# दिवाळी शुभचिंतन

ही दिवाळी आणि नूतन वर्ष आमचे सर्व लेखक–कवी, वर्गणीदार, जाहिरातदार व हितचिंतक यांना सुखाचे समृद्धीचे व भरभराटीचे जावो.

—संपादक


श्री साईनाथ वाचनालय

श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.

# दिवाळी अंकाचे मानकरी १९८२


१) संपादकीय–
२) ले. क. मु. बा. निंबाळकर
३) ह. भ. प. सौ. पद्मजा सहस्त्रबुद्धे
४) प्रा. र. श्री. पुजारी
५) सौ. वर्षा विजय हजारे
६) श्री. मनोहर सावंत
७) सौ. आसावरी वायकूळ
८) श्री. दत्ताराम बारस्कर
९) सौ. अस्मिता दांडेकर
१०) श्री. डी. आर. खडके
११) सौ. शालन कौरवार
१२) श्री. पांडुरंग भुजबळ
१३) सौ. वासंती नांदेडकर
१४) श्री. के. के. थिटे
१५) सौ. रेखा माहिमकर
१६) श्री. श्रीराम सातर्डेकर
१७) सौ. शशिकला याळगी
१८) श्री. डी. बी. पोतनीस
१९) डॉ. सौ. सुमती खानविलकर
२०) श्री. गजाननराव निरखे
२१) सौ. वसुंधरा चोरे
२२) श्री. रमेश चव्हाण
२३) सौ. उषा चितांबर
२४) श्री. अनिल रिसबुड
२५) सौ. लीला देवी पंडित
२६) श्री. रमाकांत पंडित
२७) श्रीमती मनोरमा परुळेकर
२८) श्री. रमेश शेलार
२९) सौ. विनोदिनी राजपूत
३०) श्री. रमेश बाबरे
३१) सौ. शोभा पंडित
३२) श्री. भालचंद्र पोटकुळे
३३) चिरागानंद सरस्वती
३४) सौ. मंगला वैद्य
३५) लीलाताई गोलतकर
३६) सौ. शशिकला रेवणकर
३७) कु. नीता शानभाग
३८) श्री. सूर्यकांत दळवी
३९) सौ. वायंगणकर
४०) श्री. पि. एम. मिराशे
४१) कल्पना शृंगारपुरे
४२) सौ. वसुधा दळी
४३) श्री. हितेंद्र वर्तक
४४) कु. शालिनी देशपांडे
४५) श्री. भास्कर जोशी
४६) श्री. रणजित पाटील
४७) सौ. नलिनी चिटणीस
४८) श्री. जयप्रकाश बाबरेकर
४९) सौ. सुमती सावरकर
५०) श्री. मधुकर वखारे
५१) श्री. डी. व्ही. गुप्ते
५२) सौ. नलिनी नाडकर
५३) श्री. बी. डी. जगत्पुरीया
५४) सौ. सिंधु सणस

५५) प्रा. गुंडेराव पटवारी
५६) सौ. लता ढापरे
५७) डॉ. अ. का. पाठक
५८) सौ. उषाताई अधिकारी
५९) सौ. मंदाकिनी इनामदार
६०) श्री. नंदकुमार बेलवलकर
६१) कमल गोरे
६२) श्री. वसंत प्रधान
६३) सौ. शीला चौबळ
६४) सौ. उषा कर्णिक
६५) श्री. अनिल रसाळ
६६) श्री. स. अ. रेगे
६७) सौ. कमला रेखी
६८) श्री. प्रफुल्ल दिघे
६९) श्री. ज. ब. कोष्टी
७०) कु. सरला खारकर
७१) डॉ. वाय. एम. हिवारे
७२) श्री. जी. के. म्हात्रे
७३) श्री. ग. रा. पालकर
७४) श्री. लक्ष्मण बापूराव रापतकर
७५) मृतात्म्यांना श्रद्धांजली
७६) शिरडी वृत्त
७७) शिरडी वृत्त
७८) नसबंदी शिबीर
७९) भारतातील बाबांची मंदीरे



## श्रीसाईलीला पुढील अंक जानेवारी १९८३ मध्ये

श्रीसाईलीलाचा हा दिवाळी अंक नोव्हेंबर–डिसेंबर जोड अंक असल्याने वेगळा डिसेंबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही. यापुढील अंक १ जानेवारी १९८३ रोजी प्रसिद्ध होईल यांची कृपया लेखक–कवी, वर्गणीदार जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

# बाबांचा गुरुमंत्र

श्रद्धेचे सामर्थ्य अमर्याद आहे. ज्याने तो गुण संपादन केला त्याला या जगात अशक्य अशी कोणतीही गोष्ट नाही. ईश्वरप्राप्ति ही सर्वांत महत्वाची गोष्ट आहे. या जीवनात मिळविण्यासारखे महत्तम असे जर काही असेल तर तेच होय. परंतु ज्यांनी ज्यांनी श्रद्धेची कास धरली त्यांना ईश्वरप्राप्ति झालेली आहे.

परंतु ही श्रद्धा विवेकी असावी. अविवेकी किंवा भोळी–आंधळी श्रद्धा कामाची नाही. जेथे अज्ञान आहे, तेथेच आंधळी श्रद्धा संभवते. अज्ञानाचे व आंधळेपणाचे जसे सख्य आहे, तसेच ज्ञानाचे व विवेकी श्रद्धेचे आत्यंतिक सख्य आहे, आणि यासाठीच आपण ज्ञानाची उपासना केली पाहिजे. केवळ अज्ञानापायी आज आपल्या-समोवार व जगात नाना प्रकारचे घोटाळे माजलेले आहेत.

दिवाळी आली. आपल्या अंतःकरणात जो अज्ञानरूपी अंधकार भरलेला आहे तो नाहीसा करून त्याजागी ज्ञानसूर्याचा उदय घडवून आणणारा म्हणजे सद्‌गुरुच होय, त्याला शरण गेले पाहिजे. अनन्यभावे त्याची सेवा केली पाहिजे. हाच दिवाळीचा संदेश आहे. दरवर्षी याच संदेशाची संवेदना करून देण्यासाठी दिवाळसण येत असतो.

श्रीसाईबाबा हेच आपले सद्‌गुरु होत. आपण त्यांचे अनुयायी व त्यांनी दाखवून दिलेल्या मार्गाने जाणारे आहोत. श्रीसाईसत्‌चरिताच्या रूपाने त्यांनी अमूल्य व अनुकरणीय ज्ञानाचा ठेवा आपल्यामागे ठेविला आहे. त्यांनी एका वाक्यात जो महामंत्र देऊन ठेविला आहे, त्याचे मनन करून तो आचरणात आणण्यासाठी आम्ही जर मनापासून झटलो तर आणखी काही करण्याची जरूरी नाही.

> ‘ तू मजकडे अनन्य पाही । पाहीन तुजकडे तैसाच मीही ।।
> माझ्या गुरूने अन्य काही । शिकविले नाहीच मजलागी ।। ’

माझ्यावर दृढ श्रद्धा ठेवा. जे जे करसल ते ते माझ्या नावाने करा व मला समर्पण करा. माझी आठवण नेहमी ठेवा. माझ्याशी तल्लीन होऊन जा. जगातील साऱ्या गोष्टींचा विसर पडला तर पडू दे, परंतु माझा विसर क्षणभरही पडू देऊ नका. माझे भजन, गायन, चिंतन यापेक्षा दुसऱ्या कोणत्याही गोष्टीला महत्व देऊ नका. अशा प्रकारची अनन्यसाधारण भक्ति तुमच्याकडून घडली म्हणजे त्या भक्तीचे फळ त्याच मापात नव्हे, तर सवाई दुप्पटीने तुमच्या पदरात पडेल, याची खात्री बाळगा.

बाबा एवढेच सांगून थांबले नाहीत तर आपल्या गुरूने आपणास याच्याशिवाय दुसरा गुरुमंत्र दिला नाही, असे आपणास निर्धारपूर्वक सांगत आहेत.

दिपावलीच्या या मंगल सण प्रसंगी जगावर उपकार करणाऱ्या साईबाबांना आमचे कोटी कोटी प्रणाम —

卐

# चल हट्

—ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
१/१४ फाईव्ह स्टार अपार्टमेंटस्
बंड गार्डन रोड, पुणे–४११००१

मी कोणावरही रागावतां । ठावे न चित्ता माझिया ॥ ११ ओ. ७४ ॥
माय हाणी लेकुरा लाता । समुद्र करी नदियां परता ।
तरीच मी होय तुम्हां अव्हेरितां । करील अहिता तुमचिया ॥ ७५ ॥

● या बाबांच्या उक्तिचा अनुभव मला अलीकडेच आलेला आहे. बाबा रागावत असत, क्रोधाने लाल होत असत व त्यामुळे कित्येक वेळा त्यांचेजवळ जाण्यास त्यांचे भक्तही घाबरत असत हे प्रसिद्धच आहे. परंतु श्री साईसचरितातील तसल्या प्रत्येक प्रसंगाचा नीट विचार केला तर कळून येते की बाबांचा तो राग कधीच खरा नव्हता, त्यामागे काही हेतू असायचा व दया आणि प्रेम तर खास होतेच' अक्कलकोटच्या सपटणेकर वकीलांची 'चल हट्' म्हणून सारखी संभावना केली. माधवराव देशपांडे (शामा) यांना सर्पदंश झाला तेव्हा त्यांना 'चढू नको भटुरड्या वर, चल नीघ जा खाली उतर' म्हणून ओरडून हाकलून लावले व डहाणूच्या देवांवर चिंधी चोरल्याचा आळ घेऊन मारावयाला उठले. परंतु शेवटी या सर्वांचे कल्याणच केले ना ? असो.

१७ जुलै १९८१ चा गुरुपौर्णिमेचा दिवस. गेली कित्येक वर्षे इतर उत्सवाला नाही तरी गुरुपौर्णिमेच्या उत्सवाला शिरडींस मी सहकुटुंब जातो. दोन दिवस आधी गेलो तरी अभिषेक त्याच दिवशी करण्याचा प्रयत्न करतो कारण सद्‌गुरुंची पूजा त्याच दिवशी झाली पाहिजे. परंतु त्या दिवशी गर्दी फार व अभिषेकाचे तिकीट मिळणे अतिशय बिकट. १९८० साली तिकिट मिळाले नाही व नुसत्या दर्शनाच्या रांगेत ३ तास व तेही पावसात उभे राहावे लागले होते. म्हणून १९८१ साली कसेही करून तिकीट मिळवावयाचेच म्हणून पहाटे ३ वाजता शौचमुखमार्जन स्नान वगैरे न करता रांगेत जाऊन उभा राहिलो. परंतु ६ वाजता कळले की सर्व तिकीटे संपली. मी अगदी निराश झालो. काकड आरती व बाबांचे पहाटेचे दर्शन तर चुकलेच आणि अभिषेकही नाही. वाटले दोन वर्षे झाली. बाबा आपल्या हातून पूजा का घेत नाहीत ! आपल्यावर रागावले तर नाही ना ! इतक्यात माझी सौभाग्यवती जिला मी स्वतःचे स्नान वगैरे आटपून मला रांगेतून सोडविण्यास यावयास सांगितले होते तिने येऊन बातमी दिली की परवा आपण खोली बदलली तेव्हा आपली छत्री तिथेच राहिली. हे ऐकून छत्री आता कुठली मिळायला म्हणून मन आणखी निराश झाले. पण मला आठवले की बाबांचे खरे वास्तव्य द्वारकामाईतच होते ना !

तिथूनच त्यांनी भक्तांना सर्व उपदेश केला आणि तिथेच तर त्यांनी पहिली गुरुपूजा करवून घेतली होती. लगेच माझे मन प्रफुल्लित झाले व त्याप्रमाणे मी तिथे पूजा करण्याचा निश्चय केला.

सौभाग्यवतीला बाबांच्या स्नानाच्या दर्शनाला जाण्यास सांगितले व मी किल्ली घेऊन शांतिनिवासमधील खोलीकडे स्नान व नित्यकर्म करण्यासाठी निघालो. परंतु त्या आधी आपल्या छत्रीचा तपास करावा म्हणून तिसऱ्या मजल्यावरील पूर्वीच्या खोलीकडे गेलो. कर्मधर्मसंयोगाने एक तरुण बाहेर उभा राहून दार वाजवीत होता. एका वृद्ध बाईने दार उघडले. मी त्या तरुणाला आमच्या छत्रीबद्दल विचारले. आधी तर तो म्हणाला की दोन दिवसापूर्वी ती मंडळी जेव्हा या खोलीत आली तेव्हा काही सापडले नव्हते म्हणून. परंतु नंतर तो आतल्या खोलीत गेला व म्हणाला, येथे २–३ छत्र्या आहेत, ही तर तुमची नाही ना ? आणि खरोखरीच त्याने जी छत्री दाखविली ती आमचीच निघाली, आणि मला खूप आनंद झाला. हा तरुण मी गेलो त्याचवेळी बाहेरून दार वाजवीत होता हा योगायोगच नाही का ? तो नसता तर आतील एकट्या बाईने मला परक्या माणसाला आत घेतले नसते व छत्रीही मिळाली नसती.

मग मी आपल्या खोलीवर आलो. स्नान वगैरे आटोपले आणि माझ्या नियमाप्रमाणे श्री साईसच्चरिताचे दोन अध्याय वाचावयास घेतले. प्रथम अध्याय ४८ वा आला. त्यात सुरुवातीलाच सद्गुरुची व्याख्या व साईबाबा हेच कसे खरे सद्गुरु आहेत याचे विवेचन वाचण्यात आले आणि नंतर सकाळी माझ्या मनात आलेली सपटणेकर वकीलांची 'चल हट्' म्हणून झालेली संभावना व नंतर त्यांचेवर झालेली कृपा ही कथाच निघाली, त्याबरोबरच आपणावर बाबा रागावले असले तरी आपल्यावरही अशीच कृपादृष्टी ठेवतील याची मला खात्री वाटली. त्यानंतर अध्याय ४९ वा आला. त्यात प्रथम हरि कान्होबांची हरवलेली पादत्राणे सापडल्याची गोष्ट वाचण्यात आली आणि मला नुकतीच आपली हरवलेली छत्री सापडल्याची आठवण झाली. शिरडीस येताना या गुरुपौर्णिमेला बाबांचे समोर अध्यात्मातील प्रगतीसाठी इंद्रियदमनाबद्दल काही निश्चय व्यक्त करावयाचा असे मी ठरवून आलो होतो, आणि आता हा अध्याय संपविताना नेमका दर्शनाला आलेल्या बुरख्यातील एका स्त्रीचा सुंदर चेहरा पाहून मनाची चलबिचल झालेल्या चांदोरकरांना 'बनता बनता बनेल' वगैरे इंद्रियदमनाचा बाबांनी केलेला सुंदर उपदेश वाचण्यात आला आणि बाबांनी जणू काय माझ्या निश्चयाला पुष्टीच दिली असे वाटले.

माझे वाचन संपले व पोथी बंद करून बांधू लागलो. इतक्यात सौभाग्यवती आली. लगेच तिला मी अत्यंत हर्षाने म्हटले, 'बाबांनी माझी पूजा येथेच घेऊन

टाकली आणि मला हवे ते सर्वच देऊन टाकले–अध्याय वाचताना सर्व काही मिळाले.' माझे वाक्य संपते ना संपते तोच दाराची कडी वाजली व सौभाग्यवतीने दार उघडल्यावर मित्र श्री. अनिल रसाळ पुजेचे तबक घेऊन आत आले आणि मला म्हणाले, 'तुम्हाला अभिषेक लाभला नाही ना ? हा घ्या अभिषेकाचा प्रसाद ! मला नंतर कोणाकडून एक तिकीट मिळाले आणि मी अभिषेक करून आलो, व तसाच तुमच्यासाठी प्रसाद घेऊन आलो.' मला किती किती आनंद झाला म्हणून सांगू ! डोळे आनंदाश्रूंनी भरून आले व बाबांच्या कृपेने अगदी भारावून गेलो. उठून प्रसाद खाल्ला व रसाळांना विचारले की तुम्हाला कसे कळले मी या खोलीत मुक्कामास आहे म्हणून ? ते म्हणाले, 'शांतिनिवास मध्ये राहता एवढी कल्पना होती. तुमच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन करून तपास करीत करीत येथे आलो व तुमचीच खोली सापडली.' परंतु श्री. रसाळ यांचे प्रसादासह आगमन नेमके माझी पोथी संपल्याबरोबरच होणे हा चमत्कारच नाही का ?

परंतु खरा चमत्कार पुढेच होता. सकाळी ठरविल्याप्रमाणे आम्ही द्वारकामाईत गेलो व मी तिथे बाबांची व्यवस्थित पूजा केली. नंतर समाधिमंदीराकडे आलो. गर्दी अलोट होती. दर्शनाला जायला अजून मोठी रांग होती. आता दुपारची आरती होणार होती. मला अजून एक गोष्ट खटकत होती. सकाळपासून समाधीचे व बाबांच्या भव्य मूर्तीचे दुरून सुद्धा दर्शन झाले नव्हते. आरतीचा भोंगा वाजला. आत जाणे शक्यच नव्हते. मी सभामंडपाच्या बाहेर चौकातच आरतीला थांबलो. तिथून काहीच दिसत नव्हते. पण नाइलाज होता. इतक्यात काय झाले कुणास ठाऊक माझ्या मागून गर्दीचा लोंढा जोरात आला, व आम्ही पुढे ढकलले गेलो. कशी काय वाट मिळत गेली कुणास ठाऊक मी अगदी समाधीच्या चबुतऱ्याजवळ जाऊन पोहोचलो. सबंध आरतीत समाधीचे व बाबांचे ( माझ्या सद्‌गुरूंचे ) डोळेभरून दर्शन झाले. इतकेच नव्हे तर आरती नंतर समाधीला स्पर्श करता येऊन पादुकांवर मनसोक्तपणे डोके टेकवून नमस्कारही करता आला. अशा प्रकारे बाबांनी माझी दर्शनाची इच्छाही पूर्ण केली आणि माझा गुरुपूजेचा आनंद द्विगुणित करून सकाळी निराश झालेले मन अगदी प्रफुल्लित करून मला अगदी धन्य करून सोडले.

यावरून मी एक गोष्ट शिकलो. कधी कधी आपल्या मनाप्रमाणे बाबांची सेवा घडली नाही किंवा एकादी गोष्ट आपल्या इच्छेप्रमाणे झाली नाही तरी 'बलीयस मनोगत बाबांचे' असे मानून वाईट वाटून घ्यावयाचे नाही. बाबा त्रिकालज्ञानी आहेत. त्यांना आपले बरेवाईट कळते. कधीकधी कदाचित् ते आपल्या भक्तीची परीक्षा पण पहात असतात.

# जया मनी जैसा भाव।
# तया तैसा अनुभव॥

—ह. भ. प. **सौ. पद्मजा रघुनाथ सहस्रबुद्धे**
इ. ४२, वृन्दावन, लालबहादूरशास्त्री मार्ग,
घाटकोपर, मुंबई ४०००८६

● साईमाऊलीच्या आरतीतील मनाला आनंद व शांती देणाऱ्या वरील पंक्तीचा जिवंत जागता अनुभव पुढे देत आहे.

साईमाऊलीचे परमभक्त डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर यांची मी शिष्या. गेले ५०–५२ वर्षे ते शिर्डीच्या साईमंदिरात कोजागिरी पौर्णिमेचा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करीत आहेत. ऑक्टोबर १९८० मध्ये ति. अण्णांनी मला घरी बोलावले व सांगितले की, 'या वेळच्या कोजागिरीला तुला बाबांच्या समोर शिर्डीच्या मंदिरात कीर्तनास उभे रहावयाचे आहे तरी तयारीला लाग कसलीही काळजी करू नकोस. बाबा सर्व बरोबर करून घेतील.'

बाबांसमोर हरिकीर्तनाचा योग या कल्पनेने मी तर भारावून गेले. मनरूपी सागरात आनंदाच्या लाटा पौर्णिमेच्या उधाणानी उसळू लागल्या. साहजिकच ही गोड बातमी सर्वांना कळू लागली. कुणीतरी विचारलं, 'शिरडीला कीर्तन ! काय बिदागि घेणार ?' मनात आलं, कीर्तनापूर्वीच खूप मोठी बिदागि मला मिळाली होती. आजवर केलेल्या सेवेचे फळच मला मिळाले होते आणि ते म्हणजे बाबांच्या दरबारात कीर्तन करण्याचा मान. केवढी मोठी बिदागि—आणि तीही कीर्तनापूर्वीच—आणि कीर्तनानंतरची ... मन बाबांशी बोलू लागले— 'बाबा, कीर्तनानंतर जन्मोजन्मी तुमची कृपा मिळावी आणि त्याचे प्रतिक म्हणून श्रीफळ मिळावे इतकीच अंतरीची इच्छा.'

झाले. मनातील विषय इथेच संपला. नुसताच संपला नाही तर कीर्तनाची तयारी करताना सर्व काही विसरूनच गेले. पहाता पहाता कोजागिरीचा दिवस उजाडला. २३–१०–१९८०—अण्णांनी चालविलेल्या कोजागिरी उत्सवाचा पन्नासावा वाढदिवस, सोनियाचा दिवस आजी अमृते पाहिला. ज्यांच्या भरवशावर कीर्तनाला उभी राहिले त्या गुरुमाऊलीने माझ्याकडून कीर्तन व्यवस्थित करून घेतले. हेचि दान देगा देवा म्हणून कीर्तनाची सांगता केली. बाबांना, ति. अण्णांना व तेथे जमलेल्या प्रचंड श्रोतृवृंदाला नमस्कार केला, तोच एक नऊवारी लुगडे नेसलेल्या बाई गर्दीतून

वाट काढीत माझ्यासमोर आल्या आणि म्हणाल्या, 'बाई, तुम्हाला नारळ द्यावा अशी माझी फार इच्छा आहे, तरी एवढे श्रीफळ आपण घ्यावे' त्यांची इच्छा जाणून मी हात पुढे केला आणि श्रीफळाचा स्वीकार केला. वास्तविक मागील मनातील विचार मी केव्हाच विसरून गेले होते व श्रीफळ घेतल्यावर देखील त्याचे मला स्मरण झाले नाही. परंतु हा नारळ मी आठवणीने वेगळा ठेवला. त्यानंतर श्री शिर्डी संस्थानातर्फे दुसरे दिवशी एक रुपया आणि नारळ कीर्तनाचा म्हणून मिळाला. शिर्डीहून घरी आल्यावर आठवणीने त्या बाईंनी दिलेला नारळ देवाजवळ ठेवून दिला, व शिर्डी संस्थानाचा नारळ प्रसाद म्हणून सर्वांनी खाल्ला.

दहा बारा दिवसांनी माझ्या दोन्ही मुली माझ्याजवळ आल्या आणि म्हणाल्या, 'आई, दडपे पोहे किती दिवसात केले नाहीस आज कर ना, खूप भूक लागली आहे'. दडपे पोहे म्हणजे नारळ हवाच. तो आणण्यापासून तयारी करावी लागणार होती. पण माझ्या लबाड मुलींचा देवाजवळ ठेवलेल्या नारळावर डोळा होताच. तो नारळ पाहूनच तर त्यांना दडपे पोहे आठवले होते. माझी अनुमती घेऊन त्यांनी तो नारळ देवाजवळून नमस्कार करून आणला व त्यांच्या वडिलांच्या हातात दिला. माझे यजमान तो नारळ फोडीत असताना माझ्या तोंडून 'सच्चिदानंद सद्गुरु श्री साईनाथ महाराज की जय' असा गजर आपोआपच निघाला. फोडलेला नारळ पोह्यांवर धरताच त्यातून काळसर रंगाचे पाणी निघू लागले. आम्हाला वाटले बरेच दिवस झाल्यामुळे नारळ खराब झाला. मन नाराज झाले. नारळ पूर्ण फोडला व पाणी एका भांड्यात काढले. पहातो तो नारळाला व पाण्याला उदीचा सुगंध येत होता व नारळाचे खोबरेही उदीसारख्या रंगाचे निघाले. त्या खोबऱ्याची व पाण्याची चव तर अमृताहूनही गोडच अशी म्हणावी लागेल. नारळाच्या दोन्ही वाट्यांना संपूर्णतया उदीचा लेप होता आणि अचानकपणे शिरडीला जाण्यापूर्वी बाबांजवळ व्यक्त केलेल्या अंतरीच्या इच्छेची आठवण झाली. सर्वसाक्षी, सर्वज्ञ प्रभूने मी अगदी सांगितल्याप्रमाणे कृपेसहीत श्रीफळ मला दिले होते व तेही एका स्त्रीच्या रूपाने–अगदी कीर्तन झाल्या झाल्या. स्त्रीच्या रूपाने येऊन परमेश्वर सर्वभूती आहे हे दाखवून दिले होते आणि माझ्या मनीचा भाव पुरवला होता. बाबांचा जयजयकार करीत आम्ही सर्वांनी तो प्रसाद सेवन केला. जया मनी जैसा भाव । तया तैसा अनुभव ॥ याचा अनुभव मला अशा रितीने आला.

★

# राम तो मीच ! आणि कृष्ण तोही मीच !

☆☆☆☆ ☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆

—प्रा. र. श्री. पुजारी
९९२ सदाशिव, पुणे ३०

● सुमारे सहा वर्षापूर्वी एका साईभक्त स्नेह्यानी शिरडीहून येताना मजसाठी श्रीबाबांचा एक फोटो आणला. भेट म्हणून तो फोटो त्यांनी मला दिला. त्यावेळी भिंती-वर लावण्यासारखा एकही फोटो मजकडे नव्हता. साहजिकच तो फोटो पाहून मला आनंद झाला. पण आनंद शतगुणित होण्याचे कारण असे की श्रीबाबांचे त्याच वेषा-तील हे 'पुनरागमन' होते. थोडक्यात म्हणजे ही माझी इच्छापूर्ती होती.

हा फोटो फ्रेम करवून मी बैठकीच्या खोलीत लावला. पण फ्रेम पुठ्ठ्याची केल्यामुळे सहा वर्षाच्या कालावधीत हाराच्या भारामुळे ती निसटण्याच्या मार्गावर आली. म्हणून हा फोटो मी तेथून काढला व तो आतील काचेच्या कपाटात नेऊन ठेवला. साहजिकच ती जागा रिकामी झाली. गंधफूल, हार, 'सच्चरिताचे' वाचन या फोटोमुळे घडल्यामुळे त्या स्थानाकडे पाहाताच भित ओकी ओकी दिसू लागली. तरीही आळशी स्वभावामुळे फोटो कोपऱ्यावरून फ्रेम करून आणावा ही बुद्धी काही होईना.

फोटो मला आणून देणारे ते स्नेही एक दिवस घरी आले. १९८२ सालचे एक उत्कृष्ट रंगीत कॅलेंडर त्यांनी मला भेट म्हणून दिले. 'निरमा' या वॉशिंग पावडर कंपनीचे ते कॅलेंडर होते. त्यात देवादिकांची सहा उत्कृष्ट रंगीत चित्रे होती. ते कॅलेंडर मी एका खिळयास अडकवून दिले.

फोटोची जागा ओकी पडली ही बोच अजून मनास होतीच. पण आळस सुटत नव्हता. एक दिवस मनात विचार आला की ते कॅलेंडर या ओक्या जागी अड-कवावे. वर राधाकृष्णाचे व एका भक्ताचे चित्र होते. ओकेपण संपण्यास एवढे एक चित्रही पुरे होते.

एक दिवस मी लक्ष देऊन पाहिले तर कॅलेंडरवर जानेवारी आणि फेब्रुवारी हे दोन महिने जोडीने झळकत होते ! प्रत्यक्षात मात्र मार्च महिनाही संपत आला होता ! तरीही मला ते चित्र उलटावे असे वाटेना. म्हणून ते चित्र मी उलटले नाही हा सर्व आळस होता.

पुढे एक दिवस आळशीपणाची लाज वाटून मोठ्या उद्योगी माणसाप्रमाणे ते चित्र मी उलटले. तर राम–लक्ष्मण–सीता–मारुती असे ते सुंदर चित्र होते. दुसऱ्या कॅलेंडरवरून मी दिनविशेष पाहातो तर तो दिवस रामनवमीचा होता. एप्रिल महिना सुरू झाला होता. तारीख २ एप्रिल १९८२ ही होती.

त्यानंतर एप्रिल, मे, जून असे तीन महिने लोटले. तरी त्या चित्राकडे माझे लक्ष गेले नाही. आषाढी एकादशीच्या दिवशी लक्ष गेले. चातुर्मास आषाढ एकादशीपासून सुरू होतो. या काळात श्री ज्ञानेश्वरी वाचावी असे मनाने घेतले. ज्ञानेश्वरीची प्रत उचलून हाती घेतली. आता श्रीरामरूपी बाबांची आज्ञा घ्यावी म्हणून कॅलेंडरकडे वळलो. तर जुलै–ऑगस्ट हे दोन महिने निघाले वरील नवीन चित्र पाहातो तर कुरुक्षेत्रावरील प्रसंग! भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला श्रीगीता सांगत असून पार्श्वभूमीस विश्वरूपदर्शनाचे चित्र! ही तारीख १ जुलै होती.

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे कॅलेंडरवरील चित्रांच्या माध्यमामधून त्या त्या प्रसंगी श्रीबाबांनी माझ्या मनातील अप्रकट शंकेचे समाधान केले. जणू सांगितले, 'राम तो मीच! आणि कृष्ण तोही मीच!'

●

# श्रद्धे, तुला परमेश्वर मरू देत नाही

—सौ. वर्षा विजय हजारे बी. ए.
सी/६ गुंफादर्शन फर्स्टकार्टर रोड
बोरीवली पूर्व मुंबई ६६

● मी काही मोठी देवभक्त नाही तसेच नास्तिकही नाही. निसर्गात काही तरी शक्ती आहे तिच्या पुढे आजच्या सुधारीत मानवालाही झुकावे लागते. ती शक्ती म्हणजेच परमेश्वर असे माझे सरळसोट मत. लहानपणापासून शिरडीच्या साईबाबांवर माझी श्रद्धा परंतु पूजा–पाठ, आरती–भजने वगैरे मला अवडंबर वाटे. माझे यजमान श्री. विजय हजारे निस्सीम साईभक्त आहेत. ते नित्य साई-स्मरण करतात तेव्हा त्यांना मी चिडवीत असे. तेव्हा ते मला म्हणत 'स्वतःला पटत नसेल तर करू नये परंतु दुसऱ्याच्या श्रद्धेची टवाळी मुळीच करू नये. माणूस सुखात असला की त्यास

परमेश्वर आठवत नाही परंतु त्याच्यावर प्रसंग आला की त्यास परमेश्वर आठवतो. तेव्हा टवाळकी करण्यापेक्षा साई नाम-स्मरण कर तेच तुझ्या उपयोगाला येईल. ह्या त्यांच्या सांगण्याची प्रचीती मला खरोखरच मिळाली व अंतःकरणात असलेल्या श्रद्धेच्या अंकुराचे रोपटे झाले.

आमचे घर बोरीवलीला आहे व माझे कार्यालय बोरीबंदरला असल्यामुळे सकाळच्यावेळी वेळेवर हजेरी पट गाठणे म्हणजे तारेवरची कसरतच. गेल्या पावसाळ्यातील प्रसंग, मला घरातून निघण्यास दहा मिनीटे उशीर झाल्यामुळे माझी नेहमीची गाडी मिळणे शक्यच नव्हते. परंतु त्यानंतरची गाडी चुकली तर मात्र उशीर हमखास होणार व चौथ्या क्रॉसमुळे ½ नै. रजा कापून जाणार हा विचार सतावित होता म्हणून गाडी मिळवण्याचा मी निर्धार केला. ब्रीज उतरून, महिलांच्या डब्याच्या जेमतेम दारापर्यंतच गेले असेन नसेन तो गाडीला सिग्नल मिळून ती चालू झालेली होती. मी घाईघाईने कसाबसा गाडीचा दांडा पकडला व डब्यात चढण्याचा प्रयत्न करू लागले, व तेथेच मला माझी चूक उमगली ती म्हणजे मी गाडी उलट्या दिशेने पकडली होती व ती सुद्धा डाव्या हाताने. डाव्या हाताला उजव्या हातासारखा जोर नसल्यामुळे मला काही डब्यात चढता आले नाही. गाडी मात्र वेग घेऊ लागली होती, व मी प्लॅटफॉर्मवरून गाडीबरोबर फरफटत चालले होते. गाडीतल्या बायका व प्लॅटफॉर्मवरचे लोक ओरडत होते. प्लॅटफॉर्म सुटल्यावर आपल्या जगण्याची काडीमात्र शाश्वती नाही तेव्हा जे काही होईल ते होवो असा विचार करून, मी माझ्या डाव्या हाताच्या बोटातील साईबाबांच्या अंगठीकडे पाहून ' बाबा तुम्हीच आता तारा अथवा मारा असे म्हटले व हात सोडून दिला. डोळे गच्च मिटून परमेश्वराला शरण गेले. परंतु काय आश्चर्य मी अगदी झोपल्यासारखी प्लॅटफॉर्मवर पडले होते. गाडीबरोबर फरफटत जाऊन देखील मला जराही इजा झाली नव्हती. नाही म्हटल्यास पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे साडीला व ब्लाऊजला चिखल लागला होता. झालेल्या आरडाओरडीमुळे मोटरमनने गाडी थांबविली होती. माझ्याभोवती बघ्यांची गर्दी जमा झाली होती. गाडीचा मोटरमन उतरून आला व म्हणाला बाई गाडी पकडण्यासाठी एवढी धावपळ केलीत ना. आता गाडीत चढा. पण मला धीरच झाला नाही.

जरी हे शरीर गेलो मी टाकून ! तरी मी धावेन भक्तांसाठी !! ह्या आपल्या वचनाची प्रचीती बाबांनी मला पुरेपूर दिली.

श्रद्धेने परमेश्वराला शरण गेलेल्याला परमेश्वर मरू देत नाही हेच खरे.

★

# मुलाची गेलेली दृष्टी श्रीसाईबाबांच्या कृपेने परत आली

—श्री. मनोहर नागेशराव सावंत
'उन्मेष' ८२/सी,
जुना प्रभादेवी रस्ता, वरळी मुंबई २५

● माझा दोन नंबरचा मुलगा चि. सुहास घाटकोपर येथे पंतनगर मध्ये राहतो व जॉन्सन ॲन्ड जॉन्सन या कंपनीच्या भांडुप प्लँट मध्ये प्लँट इंजिनियर म्हणून काम करतो. तो पवई येथील आय. आय. टी. मधून डिस्टींक्शन मिळवून १९७४ मध्ये वयाच्या २१ साव्या वर्षी उत्तीर्ण झाला. त्याची पत्नी सौ. वीणा हिचा वाढदिवस दि. ५ जून ८१ रोजी होता. म्हणून त्या दिवशी सकाळीच मी तिला शुभेच्छा देण्यासाठी टेलिफोन केला. माझा टेलिफोन आहे असे समजल्यानंतर ती एकदम रडूच लागली. हिच्या वाढदिवशी सकाळीच ही का रडत आहे याचा उलगडा मला होईना. टेलिफोन वर मी तिचे सांत्वन करू लागलो. भावनांचा उद्वेग संपल्यावर ती म्हणाली की आदल्या दिवशी रात्रौ माझा मुलगा काम करीत असलेल्या प्लँटमध्ये काही बिघाड झाला होता व तो दुरुस्त करण्यासाठी म्हणून चि. सुहास पाहाणी करीत असताना कोठेतरी आगीचे स्पार्क्स डोळ्यावर एकदम आले व त्याची दृष्टी गेली. मध्यरात्री त्या प्लँटचे प्रमुख श्री. कोल्हटकर यांनी त्याला धरून सांभाळून घरी आणले. त्यावेळी त्याला अजिबात दिसत नव्हते. पण आता झोप लागली आहे. ही तिची हकिगत ऐकून मी हादरलोच. एका २८ वर्षाच्या हुशार तरुण इंजिनियरची दृष्टी गेली म्हणजे सर्वस्वच गेले. त्याच्या कौशल्याचा व हुषारीचा दृष्टी अभावी काय उपयोग! मलाही माझे दुःख आवरेना पण तसे न दाखविता सौ. वीणाचे मी कसेतरी सांत्वन केले व तिला धीर दिला.

शेवटचा पण हमखास उपाय म्हणजे श्री साईबाबा. आमच्या घरातील पूजेच्या यांच्या तसविरीसमोर येऊन प्रार्थना केली की बाबा आता तुम्हीच माझ्या मुलाचे त्राते आहात व तुम्हीच त्याची दृष्टी वाचवा. आम्ही कोण काय करणार! श्री साई-बाबांना प्रार्थना केल्यावर लगेच मी जॉन्सन ॲन्ड जॉन्सनचे जनरल मॅनेजर श्री. शिर्के यांना टेलिफोन केला. रात्रौ घडलेल्या घटनेची त्यांना अजिबात कल्पना नव्हती. त्यांना तसे कोणी कळविले नव्हते. श्री. शिर्के मला लगेच म्हणाले की, मी स्वतः

तुमच्या मुलाच्या घरी घाटकोपर येथे जातो व या जगातील सर्व वैद्यकीय मदत तुमच्या मुलाच्या मागे उभी करतो. तुम्ही काही काळजी करू नका. माझ्यावर सर्व सोपवा. श्री. शिर्के यांच्या दिलाशाने मला खूप बरे वाटले व आधारही मिळाला.

त्याच दिवशी दुपारी श्री. शिर्के यांनी मुंबईतील एक विख्यात नेत्रतज्ञ डॉ. मांद्रेकर यांची वेळ ठरवून चि. सुहास यास तपासून घेतले. पहिल्या दिवशी काही औषधे देऊन दुसऱ्या दिवशी सविस्तर तपासणी केली. डॉ. मांद्रेकर यांच्या मते डोळ्यातील कॉर्निया डॅमेज झाला आहे. पण आतील बिंदु शाबीत आहे त्यामुळे डोळे बरे होण्याची त्यांना खात्री वाटते. मात्र पहिले काही दिवस शक्यतो डोळे बंद ठेवावयाचे. काळोखाच्या खोलीत रहावयाचे, अजिबात वाचन करावयाचे नाही. वगैरे बंधने घातली. मुले कितीही मोठी झाली तरी शेवटी अडचणीच्या वेळी त्यांना त्यांचे आई-वडीलच आठवतात. सुहासही याला अपवाद नव्हता. तो म्हणाला की अशा प्रसंगात मी माझ्या आईकडेच प्रभादेवीला ( आमच्या घरी ) राहीन. अर्थात आमची तिन्ही मुले चि. हेमंत, चि. सुहास व सौ. शुभांगी आपल्या आईवडिलांना फार मानतात, व त्या दृष्टीने आम्ही दोघेही फार भाग्यवान समजतो. दुसऱ्या दिवसापासून चि. सुहास आमच्या घरी येऊन राहिला. त्याची पत्नी सौ. वीणा व मुलगी चि. सोनल अधून मधून प्रभादेवीला येऊन त्याला भेटत असत.

१५ दिवसानंतर चि. सुहास याची तपासणी डॉ. मांद्रेकर यांनी केली व त्याला ५० टक्के दिसू लागले. डॉक्टरांच्या मते डोळ्याची जखम व्यवस्थितरित्या भरून येत होती व त्यामुळे त्यांनी तीच ट्रीटमेंट पुढे चालू ठेवली. मात्र प्रकाशाकडे, टी. व्ही. वगैरे न पाहाणे, वाचन न करणे ही बंधने कायमच ठेवली. पुढे काही दिवसानी तपासले असता डॉक्टरानी किमान वाचन करण्याची परवानगी दिली मात्र ड्रायव्हिंग न करण्याची ताकीद दिली. सुमारे दोन महिन्या नंतर चि. सुहास कामावर पूर्ववत् रुजू झाला व त्याची दृष्टीही संपूर्णपणे परत आली व पुन्हा पहिल्या सारखे तो ड्रायव्हिंग वगैरे करू लागला.

या दरम्यान आम्ही रोज श्रीसाईबाबांच्या चरणी दररोज चि. सुहास यांस बरे वाटावें व त्याची गेलेली दृष्टी संपूर्णपणे यावी म्हणून प्रार्थना करीत होतोच. श्री साईबाबांनी आमची हाक नेहमी प्रमाणेच ऐकली व ते आमच्या पाठीशी उभे राहिले. संपूर्ण बरे वाटल्यावर चि. सुहास व सौ. वीणा यांच्या कडून आमच्या घरी श्री सत्य-नारायण पूजा करून घेतली व त्या दोघांना शिर्डीला जाऊन श्रीसाईबाबांचे दर्शन घेऊन येण्यास सांगितले व त्याप्रमाणे त्यांनी ते पार पाडले.

# पावते समाधी तुझी साईनाथा !

लावणी सम्राज्ञी **सौ. आसावरी वायकूळ**
संगीत विशारद इ-९/८ बर्वेनगर,
घाटकोपर (प.) मुंबई ८४

● श्रीसाईबाबा हेच माझे गुरु, बाबांचे अनुभव मला आले व त्यामुळे माझी भक्ती दृढ होत चालली. माझ्या घरी बाबांचा मोठा फोटो आहे. संसार व नोकरी यातून जसा वेळ मिळेल तसे मी मनापासून बाबांचे नुसते स्मरण करते. पूजाअर्चा माझ्याकडून नित्यनियमाने होतेच असे नाही. या पूर्वी मी शिरडीला कधी गेले नव्हते त्यामुळे शिरडीला जाऊन बाबांचे दर्शन डोळे भरून कधी घेईन असे मला सारखे वाटे. सर्व भक्त शिरडीला जातात, मला मात्र इतकी वर्षे एकदाही जाता येत नाही, योग येत नाही म्हणून मला अतिशय वाईट वाटे. शिरडी मी पाहिली नाही मग बाबांचे दर्शन कोठून घडणार ! गेल्या डिसेंबर मधील गोष्ट एकदा रात्री मला स्वप्नात बाबांनी स्वतःचे व समाधीचे साक्षात् दर्शन दिले. मी त्यांची ती भव्य, विलोभनीय मूर्ती पाहून तर आनंदूनच गेले. मला बाबा भेटले. मी स्वतःला विसरून गेले. समोरची समाधी पुष्पहारांनी वेढून गेली होती. आनंदातिशयाने मी बाबांच्या मूर्तीला मिठी मारली आणि समाधीला दोन्ही हातानी भक्तिभावाने आलिंगन देण्यास गेले. माझे दोन्ही हात एवढ्या मोठ्या समाधीस पुरतील काय असे मला वाटत होते तोच माझे दोन्ही हात लांब लांब होऊन पूर्ण समाधीला मी प्रेमभराने मिठी मारली. माझी दर्शनाची इच्छा तृप्त झाली. मी जागी झाले. त्यानंतर दोन चार दिवस शिरडीला जाण्यासाठी माझे मन बेचैन झाले. महिना अखेरीचे दिवस असल्याने पुरेसे पैसेही नव्हते. तेव्हा कर्जाऊ पैसे घेऊन मी, माझे पति व माझा मुलगा अशी तिघे शिरडीला आलो. शिरडीला येण्याची ही माझी पहिलीच वेळ. मी समाधीमंदिरात प्रवेश केला.

बाबांची मूर्ती व बाबांनी समाधीमंदिरातील ज्या ज्या गोष्टींचे दर्शन दिले त्या सर्व जशाच्या तशा साक्षात् माझ्यासमोर उभ्या होत्या. मी अवाक् झाले. कारण बाबांनी माझी इच्छा आधीच फलद्रुप केली होती. श्रद्धा व सबुरी या त्यांच्या महान तत्वांची मला पूर्ण प्रचिती आली. मी गायिका आहे. त्या रात्री बाबांच्या चरणी साईगीतांची पुष्पांजली वाहण्याची सेवा देखील मला विनासायास लाभली हे माझे भाग्यच ! बाबांची लीला अगाध आहे. बाबांच्या विषयी मी असंच म्हणेन "श्रद्धा सबुरीची फुले तुज वाहता, पावते समाधी तुझी साईनाथा !"

● ● ●

# श्रीसाई येऊन बसले देव्हारी

—श्री. दत्ताराम आ. बारस्कर
सहसंपादक ' नवाकाळ '
१६ संत सेनामहाराज मार्ग, खो. नं. ३४,
५ वा मजला, गिरगाव मुं. ४

● आपल्याकडे श्रीसाईबाबा कृपादृष्टीने पहात आहेत, एका हाताने आपल्याला ते आशिर्वाद देत आहेत अशा रूपाचे त्यांचे सुंदर देखणे छायाचित्र असलेले एक मोठे कॅलेंडर कुणीतरी मला भेट दिले. कुणी दिले ते आता आठवत नाही पण ते कॅलेंडर मला मनापासून आवडले.

माझी खोली अतिशय लहान आहे. खोलीत मला तसबिरी, कॅलेंडर्स लावण्याकरिता पुरेशी जागा नाही. त्यामुळे इच्छा असूनही मला काही फोटो, कॅलेंडर्स लावता येत नाहीत. असे असले तरी मी श्री गणपती आणि श्री साईबाबांचा निःस्सीम भक्त असल्याने श्रीगणेशाचा आणि श्री साईनाथांचा मला कुणीही फोटो दिला, कॅलेंडर्स दिली तर ती मात्र घरात दर्शनी भागी लावतोच. रोज या दैवतांचे दर्शन घेतल्याशिवाय मी घराबाहेर पडत नाही.

मला त्या अज्ञाताने दिलेले श्रीसाईबाबांचे चित्र असलेले ते कॅलेंडर मी दाराच्या बाजूला लावले. दुसऱ्या दिवशी सकाळी मी ऑफीसला निघण्यापूर्वी श्री साईबाबांचे दर्शन घेण्यासाठी त्या कॅलेंडरकडे दृष्टी टाकली. तो काय ! ते सुंदर कॅलेंडर बरेच फाटले होते. माझ्या मनाला यातना झाल्या. मी हळहळलो. ' अरेरे, हे सुंदर कॅलेंडर फाटले ! ' मी उद्‌गारलो. काहीही करून या कॅलेंडरच्या जागी तसलेच श्रीसाईबाबांचे चित्र लावायला हवे असे मला वाटले. मी ठरविलेदेखील.

मी माझ्या ऑफिसला गेलो आणि दुपारच्या वेळी मला फोन आला.

' कोण बोलतोय ! ' मी फोन करणाऱ्या व्यक्तिला प्रश्न केला. ' मी सुधाकर सामंत बोलतोय ! '

' बोला ! '

' बारस्कर, मी आज तुम्हाला एक भेट पाठवतोय. ती स्वीकारा. अहो, रात्री श्री साईबाबा माझ्या स्वप्नात आले आणि ते मला म्हणाले, कसंही करा आणि मला बारस्करांच्या घरी पोचवा. मला तिथं जायचय ! '

'अच्छा!'

'म्हणूनच श्री साईबाबांच्या फोटोची फ्रेम मी तुम्हाला भेट म्हणून पाठवतोय.'

'पाठवा, जरूर पाठवा!' मी आनंदातिशयानं उत्तरलो.

चार वाजण्याच्या सुमारास माझे बंधुतुल्य मित्र 'भक्तिसंगम' मासिकाचे संपादक श्री. सुधाकर रावजी सामंत यांनी दादर येथल्या आपल्या निवास स्थानाहून माझ्या ऑफिसमध्ये एका माणसाकरवी श्री साईबाबांच्या फोटोची सुंदर भव्य फ्रेम मला भेट म्हणून पाठवून दिली. मी तिचा स्वानंदाने स्वीकार केला.

सकाळच्या प्रसंगाने मी निराश झालो होतो. पण सायंकाळी ती फ्रेम माझ्या हाती पडताच मी पुरता हरखून गेलो. आनंदाने फुलून मी ती फ्रेम घेऊन घरी परतलो. घरच्या देव्हाऱ्यात ती फ्रेम बसविली. आश्चर्य म्हणजे माझ्या घरी सकाळी जे कॅलेंडर फाटले होते, आणि त्या कॅलेंडरवर ज्या रूपात श्री साईबाबांचे चित्र होते नेमके तेच चित्र फ्रेममध्ये बंद केले होते.

श्री साईबाबांवरील माझी निःस्सिम भक्ती फळाला आली होती. साईनाथ माऊलीने माझे अंतःकरण जाणले होते. तिने आपला साक्षात्कार दाखविला होता. श्री. सुधाकर सामंत यांना दृष्टांत देऊन आपणाला माझ्या घरी पोहचते करायला सांगितले होते त्याप्रमाणे त्यांनी सद्गुरू श्री साईमाऊलीला माझ्या घरी पोहचते केले होते.

भक्तजन हो, आजही ती तसबीर माझ्या घरी देव्हाऱ्यात आहे. रोज नित्य सकाळी त्या तसबिरीला मी भक्तीभावाने पुष्पहार घालीत असतो. श्रद्धेने तिला नमस्कार करीत असतो. श्री प्रभुंकडे आशीर्वाद मागत असतो. डोळे मिटून डोळे उघडले की त्या तसबिरीच्या खालील दोन वाक्ये नजरेस पडतात.

'सब धर्म एकसमान'

श्री. दत्ताराम बारस्कर यास–सुधाकर सामंत याजकडून...

ही वाक्ये वाचली की श्री साईबाबांच्या आगमनाचा प्रत्यय येतो.

# अघटीत लीला

卐——卐

—सौ. अस्मिता कमलाकर दांडेकर
६९ बी, खाडिलकर मार्ग,
गिरगाव, मुंबई ४०० ००४

[ खाली दिलेला अनुभव हा माझ्या परमपूज्य मातोश्री सौ. सुशिलाबाई द. हजारे हिला आलेला असून तो मी लिहून पाठविला आहे कारण सध्या ती खूपच आजारी असून अत्यंत अशक्त झालेली आहे. ]

● श्रावण महिना सुरू झाला. आईचे आजारपण चालूच होते. गुरुवारी पहाटेचीच गोष्ट. आई मनाशीच बोलतेय—बाबा श्रावण महिना सुरू झाला. उद्या श्रावणातला पहिला शुक्रवार. मी अशी अंथरुणाला खिळले आहे, उठायची पण ताकद नाही. मला उद्या काहीच देवाचं करता येणार नाही. उद्या सवाष्णी बोलवायच्या. आपण हळदीकुंकवाला जायचं पण मी पहा आपली राहिलेय झोपून. असं करता करता जरा तिचा डोळा लागला—तर एवढ्यात एक सवाष्ण हातात तबक, त्यात मोगऱ्याचे पांढरे शुभ्र घमघमणारे गजरे व कुयरी घेऊन आली. सवाष्णींना व आईला तिने हळदकुंकू, गजरा दिला व गेली.

शुक्रवार उगवला. बाजूची एक सवाष्ण आली, 'मोठी बाई तुम्ही अगदीच झोपून का हो, जरा पण उठवत नाही का तुम्हाला.' तर—का ग, आई तिला बोलली, असं का विचारतेस, तर ती म्हणाली, मी तर तुम्हाला आज शुक्रवारची सवाष्ण म्हणून जेवायला बोलवायला आले होते.' तर आई तिला म्हणाली, 'अग मला तर डॉक्टरनी फक्त दूध, पेज ह्यावर ठेवलंय, मला उठून बसायची बिलकुल शक्ती नाही, कशी ग मी येवू, तू काय कर तुझं देवाचं झालं की मला थोडा प्रसाद व हळदकुंकू फक्त दे.'

ती निघून गेली. प्रत्येकजण आपल्या उद्योगाला लागले. दुपारी ११॥–१२ च्या सुमारास आईची धाकटी बहीण तिच्या जवळ गेली व 'मोठीबाई, मी माझ्या कामावर निघाले ग, तुला कसं वाटतं बघ, झोपूनच रहा. तुला उठायचं नाही असं डॉ. नी बजावलं आहे.' अशी विचारपूस करत होती. आई तिला म्हणाली, अग अग माई, जरा बाजूला हो. हे बघ इथे पिंजर, (लाल कुंकू) कुणी टाकलीय, अग पाय पडेल

बघ तुझा. तर काय चमत्कार त्या फरशी लावलेल्या जमिनीतून दुसऱ्या मजल्यावरच्या खोलीत दोन फरशांच्या मधल्या फटीतून भुरुभुरु पिंजर आपली वर येतेय. अगदी आईच्या हाताजवळ, गादीच्या बाहेरच्या बाजूने. ते दृष्य पाहून माई ताडकन् उठली व 'अग अग मोठीबाई, बघ बघ तुला सारखी कालपासून रुखरुख लागली होती ना, शुक्रवारच्या कुंकवाची. हे बघ तुझ्या बाबांनी तुला उठवत नाही तर तुझ्या हाताशीच कुंकू पाठवलं बघ तुला!' तशी आई उठली. त्यातलं कुंकू आपल्या कपाळी लावलं. माईने सर्वांना हाका मारल्या. सगळ्याजणी आल्या व त्यातलं कुंकू घेतलं, तरी कुंकू बाहेर येतच होतं. मग आई म्हणाली, 'अग माई तू आता ह्यावर पाट ठेव. मुलं खेळतात, त्यांना काय कळतंय. पाय पडेल कुणाचा' सर्वांनी हात जोडले. पाट ठेवला. सर्व आपापल्या उद्योगाला गेली. थोड्या अवकाशाने माईने पाट बाजूला सारून बघितले तर जमिनीवर कुंकवाचा कण पण नाही. थोड्या वेळापूर्वी येथे कुंकू होतं असं वाटणार पण नाही कुणाला. इतकी जागा स्वच्छ!

'श्री सद्‌गुरु साईनाथबाबा महाराज की जय!'

★

# माझी जन्मकथा

—श्री. डी. आर. खडके
१४ सहवास बिल्डिंग, आर. सी. मार्ग,
चेंबूर मुंबई ७१

● माझी जन्मकथा ६६ वर्षांची जुनी आहे. जुन्या गोष्टी उकरून काढण्यात काही और मजा असते. घरातली वडीलधारी माणसे जुन्या जमान्यातील स्वस्ताईचे वर्णन करू लागली की अरबी सुरस कथा ऐकल्याप्रमाणे वाटू लागते. माझ्या मातोश्री कै. श्रीमती जानकीबाई खडके ७ वर्षांपूर्वी ९४ वर्षांच्या होऊन वारल्या. त्यांच्या लहानपणी दोन पैशाचे तांब्याचे नाणे होते. त्याचे नाव ढब्बू, बाजारात एक ढब्बू घेऊन गेले की ३०/४० माणसांना पुरेल एवढी मोठा हाराभर भाजी यायची. कारण सर्व खरेदी दोन-दोन, चार-चार कवड्यांच्या हिशेबात व्हायची. एक रुपयाला १६ पायल्या तांदूळ, एक पायली म्हणजे चार शेर, रुपयाला १६ शेर दूध, वगैरे गोष्टी माझ्या आईच्या तोंडून ऐकू लागले की स्वप्नसृष्टीत तरंगत असल्यासारखे आम्हाला वाटायचे.

माझी जन्मकथा अशीच मी न पाहिलेली पण माझ्या मातोश्रींच्या तोंडून ऐकलेली आहे. ही कथा १९१६ सालची आहे. त्यावेळी माझे वास्तव्य मातोश्रींच्या पोटात होते, व माझ्या वडील, मातोश्रीचे वास्तव्य शिर्डीत होते. त्या काळात शिर्डी एक उजाड खेडे होते तिथे आजुबाजूला काटेरी निवडुंगाची खूप रेलचेल होती. आमच्या गावाहून म्हणजे साताऱ्याहून आईवडील शिर्डीला नेहमीच्या सरावाप्रमाणे श्री साईबाबांच्या दर्शनाला गेले होते व तेथे काही दिवस मुक्काम करुन होते. बाबांनी परवानगी दिल्याखेरीज भक्तांना शिर्डी सोडता येत नसे.

माझ्या आईवडलांचा श्री साईबाबांशी संबंध. त्यांचे जुन्या पिढीतले निस्सीम भक्त कै. प्रोफेसर गणपतराव नारके यांच्यामुळे आला. प्रो. नारके हे शेवटी पुण्यात त्या काळच्या एकमेव इंजिनियरिंग कॉलेजमध्ये जिऑलॉजी व मायनिंगचे प्रोफेसर होते. त्यांच्या विद्यार्थीदशेत ते अत्यंत बुद्धिमान म्हणून प्रसिद्धीस आले. प्रखर बुद्धिमत्तेच्या जोरावर, आर्थिक पाठबळ नसताना, परदेशात उच्च शिक्षण त्यांनी पुरे केले, व परत आल्यावर जुन्या काळातील रीतीप्रमाणे शास्त्रोक्त प्रायश्चित्त घेतले. त्यांची बुद्धिमत्ता पाहून नागपूरचे कै. श्रीमंत बापूसाहेब बुट्टी यांनी त्यांना जावई करून घेतले. माझे वडील नोकरी निमित्त कलकत्त्याला असत. तेथे त्यांचा व श्री. नारके यांचा संबंध येऊन त्याचे मैत्रीत रुपांतर झाले. माझ्या वडलांची मूळची तब्बेत कणखर होती. पण १९१० सालापासून त्यांच्यामागे व्याधी लागल्या. कोणी त्यांच्यावर साताऱ्यात करणी केली असे ते म्हणत. अनेक उपाय केले पण फायदा न होता त्यांची तब्बेत खालावत गेली. त्या सुमारास श्री. नारके यांच्या आग्रहावरून ते शिरडीस बाबांच्या दर्शनास गेले. ते सुरवातीस नास्तिक होते पण ते बाबांचे भक्त बनले. बाबांची उदी हेच त्यांचे औषध बनले.

वर सांगितल्याप्रमाणे १९१६ साली मातोश्रींचा मुक्काम शिरडीत असताना माझा मुक्काम त्यांच्या पोटात होता. मुलगा व्हावा अशी त्यांची तीव्र इच्छा होती. त्या रोज मशिदीत बाबांच्या दर्शनाला जायच्या अनेक थोर आणि विद्वान मंडळी बाबांच्या भोवती बसलेली असायची त्यामुळे आपली इच्छा बोलून दाखवायला मातोश्रीना धीर झाला नाही. पण बाबा अंतर्ज्ञानी होते. त्यांनी मातोश्रींच्या मनातील भाव ओळखला मला चर्मचक्षूनी कोणी पाहू शकत नव्हते. पण अंतर्ज्ञानाने बाबांनी मातोश्रीच्या पोटात मला पाहिले व दर्शनासाठी माझ्या मातोश्री समोर आल्याबरोबर बाबा उद्गारले 'आला, गणपती आला.' याचा अर्थ माझ्या मातोश्री समजल्या, त्यांची खात्री झाली की आपल्याला मुलगा होणार व तेच झाले.

१९१६ सालच्या डिसेंबरमध्ये माझा जन्म साताऱ्ला झाला. बाबांच्या आशिर्वादाचे फळ म्हणून माझे पाळण्यातले नाव 'साईनाथ' ठेवले. हेच माझे घरातले

नाव पण पुढे मला शाळेत घालताना माझे नाव दामोदर म्हणून कोणीतरी लावले याचा पत्ता माझ्या मातुश्रीनादेखील मी १०/११ वर्षांचा होईपर्यंत नव्हता. पुढे कागदोपत्री माझे नाव दामोदर चालू राहिले.

असा आहे माझ्या साईनाथ नावाचा इतिहास आणि असा आहे माझ्या आईला आलेला श्रीबाबांच्या बद्दलचा अनुभव.

## माझे पति मला परत दिले

—सौ. शालन मुरलीधरराव कौरवार
पेठ अमरापूर मु. देगलूर जि. नांदेड

● शिरडीस ज्याचे लागतील पाय । टळती अपाय सर्व त्याचे ॥

या वचनाची मला खरोखरी सत्यता पटली आहे. माझी नणंद नांदायला जात नव्हती म्हणून मी साईबाबांना नवस केला की, 'ती जर तिच्या घरी गेली तर मी त्यांना जोडीने पाया पडायला आणीन.' कारण तिचा संसार जोडणे अशक्य आहे असेच सर्वजण म्हणत होते. पण बाबांच्या इच्छेपुढे कुणाचे चालते !

बाबांच्या कृपेने ती नांदायला गेली. मलाही तीन मुलींवर मुलगा झाला म्हणून आम्ही सर्वजण नवसपूर्तीसाठी शिरडीस गेलो. ३/४ दिवस राहून दर्शन घेऊन कृत-कृत्य झाल्यासारखे वाटले. पण शिरडीस गेल्यानेच माझ्यावर पुढे येणारे संकट बाबांनी टाळले.

पुढे दोनच महिन्यांनी माझ्या पतींने मूळव्याधीचे खाजगी ऑपरेशन केले. त्यात त्यांना धनुर्वात झाला. ८ दिवसपर्यंत डॉक्टर काहीच सांगू शकत नाही म्हणत होते. फारच चिंताजनक प्रकृति होती. त्यावेळी मी बाबांच्या पहाटेच्या काकडा आरतीचे ( अभिषेकाचे ) चित्र डोळ्यापुढे उभे करून मनोमन प्रार्थना केली की, 'बाबा माझे पति मला द्या.' त्या दयाघन माऊलीने मला उत्तर दिले, 'बेटी जा तुझा नवरा तुला परत दिला आहे.' एवढेच नव्हे तर बहिणीच्या जावयाचा गुत्तेदार मला अगदी अपरिचित 'खान' नावाच्या व्यक्तीस माझ्या मदतीला पाठवून दिले. तो मला धीर द्यायचा. झटके आले की, डॉक्टरला बोलावणे, औषध इंजेक्शन आणून देणे, लागेल

ते सामान आणणे. घर बघून देणे अशी १ ना २ कितीतरी कामे बिचाऱ्याने केली. बाबांशिवाय ही सद्‌बुद्धि त्याला कोण देणार ? पुढे २।४ दिवसांनी माझी आई, नणंद आली. या सर्वांचे सहकार्य देऊन बाबांनी कृतांताच्या दाढेतून । काढीन मी निजभक्ता ओढून । हे वचन खरे केले. बाबांची ही आठवण मी मरेपर्यंत विसरु शकणार नाही. त्यांना कोटी कोटी प्रणाम केले तरी ते कमीच.

●

# ॥ हरिःॐ बाबा ॥ ह्या मंत्राने तारले ॥

--श्री. पांडुरंग शंकरराव मुजबळ
३७७ सोमवार पेठ सातारा

● निपाणीचे डॉ. श्री. व्ही. व्ही. नाईक यांच्या साईनंद बंगल्याचे उद्‌घाटन करण्यासाठी व नवीन वास्तूत प्रवेश ता. २–९–८२ रोजी करण्याचे समारंभास त्यांनी खास दूत पाठवून निमंत्रण दिले होते. पण गुरुवारचा श्री साईदरबार असूनही ते जर गुरुवारी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सातारला स्पेशल गाडीने आणून पोहोचवत असतील तरच आम्ही निपाणीस येऊ. त्याप्रमाणे हे त्यांनी मान्य केल्यामुळे मी चि. जयंतराव कौलवकर रा. कागल यांना समक्ष सांगितले की कोणत्याही परिस्थितीत मी बुधवारी ता. १–९–८२ रोजी रात्री आपणाकडे कागलला मुक्कामाला नक्की येतो, त्याप्रमाणे शब्द दिल्यामुळे मी, पत्नी व जावई डॉ. शिंदे असे तिघेजण ता. १–९–८२ रोजी रात्री ८.३५ चे मुंबई मंगलोर गाडीने कोल्हापूरला गेलो. गाडी फक्त कोल्हापूरला व निपाणीला थांबणार होती पण कंडक्टर काही गाडीत बसू देत नव्हता. पण ड्रायव्हरच्या सौजन्याने आम्ही तिघांनी निपाणीची तिकीटे काढली व कागलला उतरवू ह्या ड्रायव्हरचे आश्वासनावर विश्वास ठेवून आम्ही तिघे गाडीत बसलो. गाडी भर वेगाने चालू लागली. कागल गेले तरी ड्रायव्हरने गाडी थांबवली नाही. मला एकदम शंका आली व आम्ही ड्रायव्हरला कागलला थांबण्यास सांगितले तर ड्रायव्हर म्हणाला, कागल मागेच अर्धा किलो मीटर गेले आहे. आम्ही ताबडतोब गाडी थांबवली व खाली उतरलो. वेळ रात्रीची ११–२० ची होती. रस्त्यावर कोणीही नव्हते. फक्त वहानांची वहातूक जोरात चालू होती. आम्ही रात्री भरभर चालू लागलो. त्या भयाण

रात्री आपण कोठे आहोत ह्याची काहीच कल्पना नव्हती. पत्नीचे अंगावर दागिने, आमचे जवळ घड्याळे, आंगठ्या व रोकड रक्कम अशा अवस्थेत आम्ही पुढे दिसणाऱ्या चमकत असलेल्या टयुबा पहात आम्ही रस्ता काटू लागलो. पण कागल काही येईना. माझे सारखे लक्ष घड्याळाकडे होते. खिशात असलेल्या श्री साईबाबांच्या मूर्तीवर सारखा हात ठेवून मुखात श्री साईबाबांनी दिलेला ॥ हरिःॐबाबा ॥ हा जप सारखा करीत-करीत व सर्वांना धीर देत-देत रस्ता कापत होतो. रस्त्यावर कोणीही मनुष्य नाही. फक्त गाड्याच जात येत होत्या. मनात भयंकर वाईट विचार येत होते पण तरीही कोणासही काही कल्पना न देता सर्वांना आले कागल, ते पहा कागल असे म्हणत व सारखा जप करीत आमचे सर्वांचे चालणे चालू होते. रात्रीचे बारा वाजले तरी कागल येईना. रस्त्यात तर एक ट्रक पुढे जाऊन हाका मारू लागला पण आम्हीही त्यांना नको म्हणून सांगितले व कसेतरी करून जाण्यास सांगितले. श्रीसाईबाबांची कृपा व हरिःॐबाबा ह्या जपानेच तारले व भयंकर प्रसंग टळला. तो ट्रक सरळ निघून गेला. आम्ही रस्ता काटीतच होतो. तरीही कागल येईना. रात्रीचे १२-१५ झाले आणि एकदाचे कागलचे जकात नाके लागले. आम्ही आनंदाने कागल गावात जाण्याचे रस्त्याला लागलो. आम्हाला धीर आला व आम्ही रात्री १२-३० वा. चि. जयंतराव कौलवकर ह्याचे घरी पोहचलो, व महान संकटातून पार पडलो. बरोबर पत्नी व जावई या तिघांशिवाय रस्त्यावर कोणीच नव्हते. जवळ जवळ ३½ मैल पायी प्रवास १। तास करून आम्ही सर्वांनी कागल गाठले व श्री. कौलवकर ह्यांना दिलेला शब्द पाळला. यातही श्री साईबाबांनी माझी परीक्षा घेतली. मी त्याही परिक्षेत पास झालो. दिलेला शब्द पाळताना किती यातना होतात, किती कष्ट पडतात याची कल्पना त्याचवेळी आली. आमच्या तत्वाप्रमाणे दिलेला शब्द कितीही यातना झाल्या तरी पाळला जातो असा माझा निर्णय आहे. त्या रात्रीची भयानक अवस्था पाहून जर काही वाईट घटना घडली असती तर ती हानी कधीही भरून आली नसती व आयुष्याचा नाश झाला असता. अशी भयानक अवस्था होती. पण माझा विश्वास, श्रद्धा श्रीसाईबाबांचेवर व 'हरिःॐबाबा' ह्या जपावर असल्यामुळे मी अजिबात धीर न सोडता भयानक प्रसंगातून यशस्वीपणे पार पडलो. अशी ही श्री साईबाबांची कृपा आहे, म्हणून मी म्हणतो की हरिःॐबाबा ह्या जपानेच आम्हा सर्वांना महान संकटातून वाचवले. निपाणीला जाणे जरूर असूनही फक्त आम्ही श्री. कौलवकर यांना शब्द दिल्यामुळे तो शब्द पाळण्यासाठी निपाणीचे तिकीट काढूनही 'कागलला' उतरलो का तर शब्दाची किंमत किती असते हे महान तत्वज्ञान पटवून देणे हे विचार करण्यासारखे आहे. त्याच करिता हा एवढा उपद्व्याप करणे भाग पडले.

354

# मातृ सुखाची इच्छा बाबांनी पूर्ण केली

—सौ. वासंती नांदेडकर
४३ पार्क व्ह्यू बोरीवली पूर्व मुंबई ६६

● मला श्रीबाबांच्या कृपेने अनेक अनुभव आले आहेत. बाबा आपल्या वचनात म्हणतात त्याप्रमाणे प्रेमळ भक्तांच्या निर्वाणीच्या हाकेला ओ दिल्याखेरीज खरोखरच राहात नाहीत. त्याचप्रमाणे स्वप्नात येऊन साक्षात्कार देणे हेही माझ्या अनुभवास आले, ते पुढीलप्रमाणे—

लग्नानंतर सहा वर्षे आम्हाला मूल झालेले नव्हते. कुठल्याही स्त्रीमनाप्रमाणे माझेही मन मातृसुखासाठी आतुरले होते. एके दिवशी स्वप्नात मला सेंट्रल रेल्वेच्या दादर स्थानकाबाहेरचा भाग दिसला. तिथे बरीच गर्दी होती. सर्व लोकांच्या हातात काहीतरी होते. माझ्याही हाताला काहीतरी लागले, व मी ते पकडून ठेवले. बघते तर तो रीळाच्या दोऱ्याप्रमाणे बारीक दोरा होता. सर्वांचे हात हलत होते. माझाही हात पुढेमागे होत होता. क्षणातच सर्व गर्दी नाहीशी झाली; व मी एकटीच तिथे राहीले. दोरा हातात तसाच !

आणि समोर माझे लक्ष गेले, पाहते तो शिरडीच्या साईबाबांची भव्य मूर्ति ! माझ्या हातीच्या दोऱ्याचे दुसरे टोक बाबांच्या शेजारीच ठेवलेल्या लहान सुरेखशा चांदीच्या पाळण्याला बांधलेले होते ! तो पाळणा मी हलवत होते. मला आणि काय हवे होते !

थोडे दिवसातच मी बाबांना सांगितले बाबा स्वप्नात दिसला तसा चांदीचा पाळणा, माझे बाळ वर्षाचे होण्यापूर्वी, दादरच्या मंदीरात देईन. आणि माझी मातृत्वाची अपेक्षा पूर्ण झाली. बाबांना मी चांदीचा पाळणा दिला आणि आम्हाला बाबांनी सोन्यासारखे एक कन्यारत्न दिले !

आज आमची मुलगी ५ वर्षाची आहे. हे लिहितानासुद्धा अंतःकरण गहिवरून येते, आणि डोळे आनंदाश्रूंनी भरून आल्याशिवाय राहात नाहीत. श्रीसाईंचा असाच कृपालोभ असावा व आयुरारोग्याचा आशिर्वाद मिळावा, इतकीच साईचरणी प्रामाणिक प्रार्थना.

# नाम माझे करा स्मरण

—श्री. के. के. थिटे
बी. एस्सी. बी. एड. एल. एल. एम. (अॅडव्होकेट)
२५८, कसबा पेठ, पुणे ११

● मी मास्टर ऑफ लॉज या परीक्षेला मे १९८२ मध्ये बसलो होतो. परीक्षे-विषयी मनात अतिशय भिती वाटत होती व यावेळी परीक्षेत पास होईन किंवा नाही या विषयी मन साशंक होते. परंतु परीक्षेपूर्वी महिनाभर व त्यापूर्वीही श्रीसाईबाबांचे समाधीचे दररोज दर्शन घेत होतो. परीक्षेचे पेपर्सही अवघड गेले होते. परीक्षेचा निकाल लागे पर्यंत मनात सारखी हुरहुर होती परंतु ता. २०–८–८२ रोजी परीक्षेचा निकाल लागला व एल. एल. एम चा निकाल वाचून आश्चर्याचा धक्का बसला. कारण ज्या पेपरांत केवळ ४० टक्के मार्क्स मिळण्याची खात्री नव्हती त्या पेपर्समध्ये ७० टक्के मार्क्स होते. श्री साईबाबांनी माझी केवळ परीक्षेविषयी काळजीच दूर केली नाही तर कायद्याच्या अत्युच्च पदवी परीक्षेत केवळ साईबाबांच्या कृपेने जीवनातील उत्कर्षाची एक नवीन पायरी निर्माण झाली. श्रीसाईसमर्थ मनुष्य प्राण्याला कधी व कशा रीतीने मदत करतील याचा नेम नाही. श्रीसाईसचरित ग्रंथातील अध्याय २५ ओवी १०८ मध्ये वर्णिलेले आहे की, :–

'नाम माझे करा स्मरण। विश्वासयुक्त अंतःकरण ॥
ठेवा करा निष्काम भजन। कृतकल्याण पावाल ॥'

व श्रीसाईबाबा वरील माझ्या केवळ दृढ विश्वासामुळेच मला श्रीसाईबाबांनी आपल्या अनाकलनीय कृपादृष्टिने एका साईभक्तावर अपार कृपा वर्षाव करून मला कृतकृत्य केले याची जाणीव मी जन्मभर विसरणे शक्य नाही, व श्रीसाईसमर्थांचे कोणतीही मनात इच्छा न धरता केलेले मनन व चिंतन हे निश्चितच फलदायी ठरते. याचा कोणीही अनुभव घेऊन पाहिल्यास वरील अध्यायातील ओवीची सार्थकता पुरेपुर अनुभववायास मिळते व अध्यात्मिक मानसिक आनंद उपभोगावयास मिळतो. आतापर्यंत मी साईभक्तांचे अनुभव वाचीत होतो परंतु मला स्वतःलाच अनुभव आल्यास श्रीसाईबाबांवरील भक्तीभावात अधिकच दिवसे दिवस वाढ होत आहे. माझ्याप्रमाणे इतर साईभक्तांनाही श्रीबाबा असेच सुखद अनुभव देवोत ही श्रीसाईबाबा चरणी प्रार्थना. ।

# शरण मज आला दाखवा दाखव।

—सौ. रेखा भा
२२/१६ गुरुन
अंधेरी (पश्चिम

● माझ्या माहेरी तसे साईबाबांचे महत्व होते पण सासरी
'बाबा' हेच सर्वांचे सर्वस्व. कोणतीही गोष्ट असू दे ती प्रथ
नंतर करायची. लग्नाची आमंत्रणे तर शिरडीला जावून बाबांना
प्रथा होती.

असे हे 'बाबा' आमच्या घरातील प्रमुख व्यक्ती होते. मग शिरडीला जाताना कितीही अडचण आली तरी ते आम्हाला आपल्याकडे घेऊन येणारच. माझा मुलगा १॥ वर्षाचा असेल पुण्याला जाऊन मग शिरडीला जावयाचे ठरवले म्हणून एस. टी. आरक्षणासाठी मित्राकडे पैसे पाठविले. आम्ही पुण्याहून सकाळी पुणे एस. टी. स्टॅण्डवर बरोबर ५॥ वाजता सकाळी पोहचलो. तर काय! सारं कसं शांत! समोरच फलकावर लिहिले होते 'काल मध्यरात्रीपासून एस. टीचा संप आहे.' तो फलक वाचून माझ्या पायातील त्राणच गेले पण माझे यजमान अगदी सहजपणे म्हणाले 'आज आता शिरडीला जायचेच' इथून तिथून चौकशी अंती समजले की एक एस. टी. ७ वाजता बाहेरून येणार आहे, आणि खरोखरच बरोबर सात वाजता ती आलीही. आम्ही धक्का बुक्की करून तीन सीट असलेल्या लांब सीटवर ३ मोठी माणसे व २ छोटी दाटीदाटीने बसलो आणि मागून आवाज आला. 'अहो हे रिझर्वेशन आमचे आहे' कारण आमच्याकडे असलेले रिझर्वेशन आधीच्या गाडीचे होते. 'तुमची माणसं आली की आम्ही उठू' असे माझ्या यजमानांनी सांगितले. कंडक्टर आला आणि त्यांच्यापैकीच एकाने विचारले 'आमच्याकडे या तीन सीटचे रिझर्वेशन आहे. तुम्हाला हवे का? आमची माणसं येणार नाहीत.' आम्ही १॥ रुपया देऊन आरक्षणाची तिकिटे घेतली. कंडक्टरकडून तिकिटा घेतल्या. वाटेत संपाचा काही एक त्रास न होता आम्ही सुखरुप वेळेवर शिरडीला पोहचलो. पण त्या रिझर्वेशनच्या ३ तिकिटा मात्र आम्हाला नंतर शोधूनही सापडल्या नाहीत. आम्ही परतताना सुद्धा संप चालूच होता. तरी सुद्धा आम्हाला अगदी चांगले रिझर्वेशन मिळाले आणि बुधवारी रात्री घरी आलो कारण गुरुवारपासून सप्ताह करावयाचा होता ना!

आमच्या उभयताची व्यक्तीगत अथवा कौटुंबिक गोष्ट असू दे. आम्ही ती बाबांना सांगावी आणि ती त्यांनी इच्छा पूर्ण करावी असे आज १६ वर्षे सतत चालू आहे. तेव्हा कोणतीही अडचण आली तरी आमचा दोघांचा पाठीराखा म्हणजेच 'बाबा' आम्हाला वडिलधाऱ्याप्रमाणे वाट दाखविणारे तसेच रक्षण ही तेच करणार. बाबांशिवाय आम्हाला आहे तरी कोण!

गेल्या वर्षी माझ्याकडे (म्युनि.) ७ वीचा वर्ग होता. म्युनिसिपालिटीत ७ वी च्या वर्गाला एस. एस. सी. प्रमाणे मानले जाते. पण सर्व विषय एकाच शिक्षकाकडे. खेळ, स्पर्धा यांची तयारीसुद्धा त्याच शिक्षकाकडे. स्कॉलरशिपचा वर्गसुद्धा त्यांनीच घ्यायचा. हे सर्व नियमांचे पालन करून वर्ग घ्यायचा असतो. शिवाय मुलांना शिकवणे, त्यांच्याकडून करून घेणे, पालक या नात्याने त्यांच्या समस्या सोडवणे सारं काही आम्हालाच करावे लागते. सुदैवाने माझे बरेच विद्यार्थी फारच चांगले होते. त्यामुळे प्रत्येक स्पर्धा, प्रत्येक परीक्षासाठी माझ्याच वर्गातील मुले असायची. अर्थात् स्पर्धांच्या तयारीसाठी मुले सतत वर्गाबाहेर कधी ही तर कधी ती. अशा परिस्थितीत डिसेंबर महिना आला. इन्स्पेक्शनची चिंता वाटत होती. कारण मुलेच कुठे वर्गात. नेहमीप्रमाणे बाबांना सांगितले की, 'सारं व्यवस्थित होऊ दे. मी साईलीला अंकातून प्रसिद्ध करेन.' बाहेरील बीटचे इन्स्पेक्टर आले. कधी नव्हे इतकी मी घाबरले. त्यामुळे माझे व्यक्तीगत काम मी दाखविलेच नाही. पण समोर दिसणारे माझे काम व माझ्या वर्गावर ते खूष झाले. मला खूप आनंद झाला. पण माझ्या मणक्याचा आजार व इतर आजार यांनी उचल घेतली. दिवसेंदिवस आजार वाढतच होता. मे महिन्याची रजा सुद्धा आजारात गेली. आता तर एकातून एक असा नवीन आजार उद्भवला आहे तरी सुद्धा बाबांच्या आशिर्वादाने मी शाळेत जाते. माझे नित्य व्यवहार करते. बाबांच्या कृपेनेच मला आता खूप बरे वाटते. तेव्हा बसून मनातील विचार, त्यांचे आशिर्वाद लिहून काढले. असाच बाबांचा आशिर्वाद सदैव पाठीशी असावा हीच त्यांच्या चरणी आमची सर्वांची इच्छा.

★

356

# ती मद्रासी व्यक्ती

—श्री. श्रीराम सातार्डेकर
विजित निवास परळ, मुं. १२

● १९४५ साली मी माझ्या आजोबांबरोबर प्रथम शिरडीस गेलो. त्यानंतर १९४६ पासून बाबांच्या तिनही उत्सवास मी नियमीत जावू लागलो. गायनाची आवड होती. भावगीत गायक म्हणून थोडीफार प्रसिद्धीही लाभली होती. मुंबई रेडिओ केंद्रावरून २।३ महिन्यांच्या अवधीत माझा कार्यक्रम व्हायचा! शिरडीस प्रत्येक उत्सवास जायचो त्यावेळी रामनवमी, गुरुपौर्णिमा आणि दसरा या तिनही उत्सवात मला गायनाची संधी मिळायची श्रीफळ आणि १ रुपया असा प्रसाद मिळायचा! केवढा आनंद लाभायचा त्यावेळी! रेडिओवर मिळणाऱ्या २० रुपयांपेक्षा किंवा भावगीत गायन करून मिळणाऱ्या ५०/७५ रुपयांपेक्षा हा १ रुपया कितीतरी मोलाचा वाटायचा। कारण याच रुपयाने कधी कधी आमचा चरितार्थ चालविला आहे. महिन्याच्या शेवटच्या तारखेस पैसे नसते, की शेवटी पूजेसाठी ठेवलेले पैसे वाण्याला द्यायचे त्याला सांगायचे हे पैसे वेगळे ठेव! मी संध्याकाळी दुसरे देवून हे घेवून जाईन! असे २/४ वेळा झालेले आठवणीत आहे. त्याचप्रमाणे शिर्डीस उत्सवास जाताना कधी कधी उसनवार करूनच जावे लागे. त्यावेळी २० रुपये म्हणजे पुष्कळ झाले. परंतु शिर्डीहून मुंबईस येताच रेडीओचे कॉन्ट्रक्ट किंवा एखादा सत्यनारायण पूजेत माझा भावगीत गायनाचा कार्यक्रम ठरलेला असायचाच! अशा प्रकारे बाबांच्या सेवेचे फळ मिळायचे. या ३६ वर्षांच्या सेवेत फक्त २ वेळा मी उत्सवास हजर राहू शकलो नाही. एकावर्षी गुरुपौर्णिमेस माझ्या आई एकाएकी अर्धांगवायूने आजारी झाल्या. त्यावेळी आणि एक वर्षी माझे धाकटे बंधू गुढीपाडव्यास निवर्तल्यामुळे रामनवमी उत्सवास मला जाता आले नाही. ४ वर्षांपूर्वी असाच अचानक आजारी झालो. रामनवमी उत्सव जवळ आला होता. प्रकृति पूर्ण सुधारली नव्हती. तरी डॉ. खांडेपारकरांच्या परवानगीने मी उत्सवास जायचे ठरविले. उत्सवाचा आदला दिवस माझ्या कार्यक्रमासाठी राखून ठेवलेला असतो. यापूर्वी कै. मराठे संस्थान गवई यांनी आणि आताचे मंदिर व्यवस्थापक श्री. बागवे साहेब यांनी ही परंपरा कायम ठेवली आहे. रामनवमी उत्सवासाठी मी शिर्डीस आलो. परंतु नुकताच हिंडू फिरू लागलो होतो. तेव्हा नेहमी प्रमाणे १/१॥ तास गायनाच्या द्वारे बाबांची सेवा करणे शक्य होणार नाही. म्हणून वाईट ही वाटले. परवा रामनवमी आहे. तेव्हा रात्रभर मंदीर उघडे राहील. त्यावेळी कलाकारांच्या हजेरीत १/२ गीते म्हणून सेवा करावी. असे मनाशी ठरविले. श्री बागवे

साहेबानी माझ्यासाठी वेळ ठेवला होता. पण मी त्यास नेहमी प्रमाणे भेटलो नाही. सायंकाळी आरती पूर्वी लेंडी बागेत दत्तमंदिराजवळ एका बाकावर बसून मनाशी म्हणत होतो ! बाबा नेहमी प्रमाणे माझा आज रात्री कार्यक्रम असता. कोण धावपळ असायची माझी ! पण मी आज इथे असा स्वस्थ बसलोय ! या विचारात मी असता शेजारी एक वृद्ध मद्रासी गृहस्थ येवून बसले. आणि म्हणू लागले इकडे स्वस्थ का बसले ! अभी आरती शुरु होगी ! और रातको भजन नहीं करेंगा. मी त्यास म्हटले की, आपने हमको कैसे पहेचाना ! अरे आप तो हमेशा बाबाके दरबारमें बहोत अच्छे भजन गाते है, हमने सुना है, आज आप ऐसे उदास क्यों मी म्हणालो की, मेरी तबियत अच्छी नहीं. मैं दो महिने बिमार था । बाबाके दर्शनके लिये आया हूँ । कुछ फिकर नहीं. यहाँ तक आये हो तो १/२ भजन सुनाओ सेवा नहीं छोडना। आणि ते गृहस्थ अभी आरती शुरु होगी म्हणून निघून गेले. मीही आरतीसाठी मंदिरात गेलो. आरती संपताच श्री बागवे साहेबांस भेटलो. त्यांनीही मला विचारले तुम्ही नेहमी प्रमाणे भेटला नाही. आज कार्यक्रम करणार की नाही ! तुमची वेळ ठेवली आहे. तरी जास्त त्रास घेवू नका ! १/२ भजने म्हणा ! त्याप्रमाणे मी रात्री ९ वाजता बाबांच्या मंदिरात सेवेसाठी बसलो. १ तास कसा संपला हेच कळले नाही. श्रीबाबांनी सेवा करून घेतली. आजही श्रीबाबांच्या कृपेने माझे भक्तिसंगीताचे कार्यक्रम शिरडीस अविरत वयाच्या ६२ व्या वर्षीही नियमीत प्रत्येक उत्सवाचे वेळी होत आहेत. नुकताच माझा भक्तिसंगीताचा १०४ वा कार्यक्रम 'गुरुपौर्णिमेस' झाला. त्यांची कृपा सदैव अशीच लाभो आणि श्रीबाबांच्या सेवेत भक्तिसंगीताची मैफल रंगली असता जीवनाची पूर्तता ( भैरवी ) होवो ही श्रीसाई चरणी प्रार्थना. लेंडीबागेत दिसलेली मद्रासी व्यक्ती मात्र आजपर्यंत मला पुन्हा दिसलीच नाही. कोण होते ते ! प्रत्यक्ष बाबाच !

☆

# ॥ जरी हे शरीर गेलो मी सोडून तरी मी धावेन भक्तांसाठी ॥

**सौ. शशिकला विठ्ठल याळगी**
१९७० कडोलकर गल्ली, बेळगाव

● ३१ मार्च १९८२ (बुधवार) चा दिवस म्हणजे माझ्या जीवनातील एक अविस्मरणीय दिवस. माझी ज्येष्ठ कन्या पहिल्या बाळंतपणासाठी माहेरी माझ्याकडे येऊन राहिली होती. प्रसूतीची तारीख डॉक्टरांनी ८ एप्रिल १९८२ ही दिली होती. परंतु ३१ मार्च रोजीच सकाळपासून तिच्या पोटात दुखू लागले. सायंकाळी ६ वाजेपर्यंत वाट पहावी म्हणून आम्ही घरीच थांबलो. त्यानंतर वेदना असह्य होऊ लागल्या. म्हणून जवळच असलेल्या प्रसूतीगृहात मुलीला दाखल केले. तपासणी झाली. त्यात मूल आडवे असल्याचे डॉक्टरांच्या ध्यानात आले. त्यांनी लागलीच तिचा एक्सरे काढून मुलाची स्थिती काय आहे हे जाणून घेण्याचे ठरविले. तावडतोब एक्सरे काढला गेला. एक्सरे पाहून एक्सरे काढणाऱ्या तज्ज्ञांनी नकारार्थी मान हलविली व एक सुस्कारा सोडला. तेव्हाच माझ्या काळजात धस्स् झाले. एक्सरे पाहून डॉक्टरांनी रात्री दहा वाजता सिझरीन करण्याचे ठरविले, व माझ्या यजमानांना सांगितले की, आम्ही पेशंटला वाचवण्याचा शक्य तेवढा प्रयत्न करू, मूल मात्र जगणार नाही. इथे तर माझी मुलगी प्रसूती वेदनानी इतकी हैराण झाली होती की तिच्या त्या जीवघेण्या किंकाळ्या ऐकून माझा जीव वरखाली होऊ लागला. मी साईबाबांचा धावा सुरू केला. हरएक तऱ्हेने साईबाबांची विनवणी केली की, माझ्या मुलीची प्रसूती व्यवस्थित होऊ दे. आईला आणि बाळाला कोणत्याही प्रकारे धोका पोहचू देऊ नका.

ऑपरेशन थिएटरमध्ये सिझरीनची जैय्यत तयारी सुरू झाली. दोन तीन डॉक्टर्सना फोन करून अमक्यावेळी हॉस्पिटलमध्ये हजर राहण्यास हॉस्पिटलच्या डॉ. नी सांगून ठेवले. इतकेच नव्हे तर बाळासाठी कदाचित् ३०० रुपयाचे इंजेक्शन लागेल तेही आणून ठेवण्याची सूचना दिली.

मुलीच्या प्रसूतिकळा इतक्या भयंकर होत्या की माझे भानच हरपते की काय असे वाटू लागले. माझ्या डोळ्यासमोर अक्षरशः काजवे चमकू लागले. माझे पती, मुलीचे सासू-सासरे आणि माझी दुसरी कन्या मला धीर देऊ लागले. पण मला कशा-

चीच भ्रांत नव्हती. मनातल्या मनात साईबाबांचे नाव घेत राहिले. हजारोवेळा तरी साईबाबांचा धावा केला असेन. एका क्षणात मनानेच मी शिरडीत जायची तर दुसऱ्या क्षणी हॉस्पिटलमध्ये असायची असा मनाचा प्रवास सुरू झाला. मनोमन म्हणत होते की बाबा सर्व काही तुझ्यावरच सोपविले आहे. तूच यातून व्यवस्थित सुटका कर. एकदा तर वाटले की 'साईबाबा धावा' असं ओरडावं पण हॉस्पिटल-मधील लोक मला वेडी म्हणतील म्हणून तेथेच मनाला आवरले.

रात्री दहा वाजता सिझरीन करण्याचे ठरविले. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे १० वाजण्यास केवळ दहा मिनिटे कमी होती. माझ्या मुलीला ऑपरेशन थिएटरकडे नेण्यात येणार होते. इतक्यात ती प्रसूत झाली आणि साईबाबांनी तिला प्रसाद म्हणून छानसा मुलगा दिला. मुलगा पायाळू झाला. सिझरीन करावे लागले नाही ते नाहीच पण बाळाला इंजेक्शनसुद्धा द्यावे लागले नाही. सर्व डॉक्टर्स मंडळी आश्चर्याने थक्क झाली.

ज्या हॉस्पिटलमध्ये आम्ही मुलीला दाखल केले होते. त्या हॉस्पिटलचे डॉक्टर पती–पत्नी देखील साईबाबांचेच भक्त आहेत. हॉस्पिटलमध्ये भिंतीवर साईबाबांचे फोटो असून नित्यनेमाने डॉक्टरीणबाई पूजा करीत असतात. मी पण साईबाबांची अनेक वर्षांपासून पूजा करते. त्याचे हे सुंदर फळ मला मिळाले. मला नातू मिळाला. बाबांचे ते बोल आजही मला ऐकू येतात....

'जरी हे शरीर गेलो मी सोडूनी
तरी मी धावेन भक्तांसाठी.'

# देव दीना घरी धावला

—श्री. डी. बी. पोतनीस
२६/७ एच. बी. पिंपरी, पुणे १७

● सत्-आई ही सर्वांचीच आहे. या आईला सर्व बाळांच्याकडे लक्ष पुरवावे लागते. एखाद्या बाळाला काही कमी उणे पडले म्हणजे बाळ आपल्या आईवर रुसून बसतो तसाच मी सुद्धा या साई माउलीवर रुसून बसलो होतो.

श्री साईसद्भक्तांनो ही अतिशयोक्ती नाही. खरी सत्य परिस्थिती मी देत आहे. सरकारी सेवेमधून दिनांक ३१–७–७६ रोजी मी निवृत्त झालो, व पुन्हा एका खाजगी कार्यालयामध्ये दरमहा रुपये ३५० पगारावर नोकरी लागली. घरातील सर्व जबाबदारी माझेवर असल्यामुळे पेन्शन व खाजगी नोकरीचा पगार जेमतेम तोंड मिळवणी करीत असे. महागाई प्रमाणे पगारही वाढत गेला. दिवस आनंदात जात परंतु दैवाचा फेरा म्हणा किंवा श्री साईमाऊलीच्या सेवेत माझी काही चूक झाली असेल म्हणून म्हणा, माझे जून १९८१ पासून खाजगी कार्यालयातील सहकारी (पेन्शनर) यांचेशी पटेना. या सहकाऱ्याला आपला एक मित्र माझे जागेवर नोकरीस लावण्याचा इरादा होता. हा सहकारी काही ना काही कारणे काढून माझ्या वरिष्ठ अधिकारी यांना माझे विरुध्द सांगू लागला. हे वरिष्ठ अधिकारी स्वभावाने शांत असल्यामुळे त्यांनी या गोष्टीकडे दुर्लक्ष केले. परंतु मला या अशुध्द वातावरणात नोकरी करावी असे वाटेना म्हणून मी माझा राजीनामा दिनांक ४।७।१९८१ रोजी देऊन या खाजगी कार्यालयातून दिनांक ७।८।१९८१ रोजी सेवा निवृत्त झालो. सेवा निवृत्त झाल्यानंतर पहिले तीन चार दिवस बरे गेले पण मनात विचारांचे काहूर माजू लागले. आता पुढे खर्च कसा भागणार हा बिकट प्रश्न उभा राहिला. नोकरीचा प्रयत्न चालू केला 'सकाळ'मधील नोकरीविषयक जाहिराती वाचून अर्ज पाठविले परंतु दोन अडीच महिन्यात सर्वच प्रयत्न निष्फळ झाले. घरात दररोज कटकट भांडणं सुरू झाली. मी अगदी जीवाला वैतागून गेलो अन् वाईट विचार, आत्महत्येचे विचार चालू झाले कारण आता काहीच उपाय नव्हता. श्री साईबाबांची पुजाअर्चा प्रार्थना सर्व सर्व बंद झाले. लक्षच लागेना पण एक आनंदाचा दिवस उगवला माझ्या पूर्वीच्या खाजगी कार्यालयातील माझे विरुद्ध जे सहकारी (पेन्शनर) होते त्यांचे पत्र आले की, तुम्हाला पिंपरी येथेच नोकरी मिळेल तुम्ही त्वरीत या पत्यावर जाऊन भेटा. हा दिवस गुरुवार दिनांक २२।१०।८१ चा होता. मला फार आनंद झाला. मी

दुपारी दोन वाजताचे लोकलने शिवाजी नगरला गेलो व रासने चाळीतील श्रीसाई मंदीरात जाऊन श्री बाबांची क्षमा मागितली, पाय धरले, चरणावर शीर ठेवले माझ्या कपाळाला श्री बाबांचे चरणावरील पुष्प पाकळी चिकटली हीच शुभकामना हाच शुभ आशिर्वाद बाबांनी दिला. मी नोकरीसाठी ज्यांना भेटावयाचे त्यांना भेटलो व माझे नोकरीचे काम फत्ते झाले. शुक्रवार दिनांक २३।१०।८१ पासून नोकरीस सुरवात झाली. पगार पूर्वी होता तोच ठरल्याकारणाने फार आनंद झाला. श्री बाबांचे या लीलेने मी भारावून गेलो अन्तःकरण भरून आले. माझी साई माऊली या दीनाच्या घरी पत्र रुपाने धावली असे माझ्या प्रिय वाचकांना अभिमानाने सांगू इच्छितो.

जीधर देखे उधर हैं साईबाबा
जीधर बैठे उधर हैं साईबाबा

हे सत्य आहे.

# बाबांची अजब अदृश्य शक्ति

—डॉ. सौ. सुमती खानविलकर
सीताकुंज, लोनावळा,

● माझ्या परिचयातले एक गृहस्थ परदेशात ८।१० दिवसापूर्वी गेले. जातेवेळी काही खायचे पदार्थ व मुलांचे बायकोचा व आईवडील यांचे फोटो बॅगेत होते. त्यातच श्री सद्गुरू साईबाबांचा फोटो होता. विमानाने प्रवास असल्यामुळे सामान बेताचेच होते.

ठराविक ठिकाण आल्यावर विमानतळावर उतरले. नेहमीप्रमाणे सर्वांची तपासणी घेतली गेली. सर्व खाद्य पदार्थ फेकून दिले गेले व सर्व फोटो फाडून टाकण्यात आले लेटरपॅड काही २।३ पुस्तके वाचण्यासाठी घेतली होती ती सारी परत परत झटकून पाहिली. तसेच सर्व कपडे उलगडून झटकले. पाकीट पासपोर्ट अगदी बारीक सारीक सूटकेसचे कप्पे तपासले व सोडून दिले. यांनी थोड्या विषण्ण मनानेच कपडे बॅगेत भरले व आलेल्या बसने त्यांच्या ठराविक ठिकाणी गेले. तेथे थोडी विश्रांती

घेऊन मग सूटकेस व्यवस्थित लावू लागले. तर त्यांच्याबरोबर गेलेले श्रीसद्गुरु साई-बाबा मात्र त्यावेळी अदृश्य होऊन परत त्या सूटकेसच्या जेथे फोटो होते तेथेच होते, आणि हसून जणू काय सांगत होते. अरे फोटो फाडले. फाडू दे. काही काळजी करू नको.

असे हे बाबा या मानवी जीवाना काही दिसले नाहीत. जीवंतपणी त्यांनी खूप वेळा शिरडीत राहून कोणाकडे जेवायला कोणाकडे संकटकाळी कोणाकडे उदी पोचव हे सारे त्या गृहस्थाना आठवले व समाधानाने निश्वास टाकला खरच त्यांची पुण्याई व त्यांची अद्वितीय शक्ती. त्यांच्या जिवंतपणाची खात्री पटवितात.

फक्त भावभक्तीने हाक मारा. विश्वास ठेवा. मग बाबा तुमचेच व तुमच्याजवळच आहेत. आपण मर्त्य लोकातील देहधारी माणसे, बाबांची लीला कशी जाणू शकणार!

पण यापुढे आपण नामस्मरणाची कास धरून व दृढ विश्वास ठेवून बाबांना पहाण्याचा प्रयत्न करू. फोटो नुसता कागदात गुंडाळलेला होता. घरातील माणसाच्या फोटोजवळच आणि एवढे सारे विस्कटलेल्या बॅगेत सापडू नये. खरंच बाबा काय तुमची लीला!

वसे जो सदा दावया संतलीला दिसे अज्ञ लोका परी जनाला परी अंतरी ज्ञान कैवल्यदाता नमस्कार साष्टांग श्रीसाई नाथा।

●

# साई उभा पाठीशी

—श्री. गजानन कृ. निरखे
२० नंदलालपुरा, इंदूर ४५२००४

● जवळ जवळ तो धावतच आला माझे टेबला जवळ. टेबलावरील साईप्रतीमेवर डोके टेकले; अन् माझ्या पाया पडला. अन् म्हणाला 'बापूसाब आपके साईबाबाने हमारे सिस्टर को संकटसे बचा लिया' अरे पण काय झाले ते तर सांगशील! 'बापूसाब तुम्हाला माहित आहे ना गेल्या महिन्यात माझ्या सिस्टरला, पद्माला

येथील लेडी डाक्टरला दाखविले आणि तिनं हिला किडनी ट्रबल आहे. ऑपरेशन करावे लागेल म्हणून सांगितले अन् आम्ही तर इथे दोघच भाऊ बहीण, घाबरून गेलो आम्ही आणि तावडतोब तुमचे कडून कॅश ॲडव्हान्स घेऊन बहिणीला आमचे आई वडिलांकडे तिनेवेल्ली केरलामध्ये सोडून आलो होतो. तेव्हापासून 'स्टेनो' आहे, पण कामात मन लागत नव्हते. दररोज पत्राची वाट पहात होतो. कारण तिचे तिकडे किडनी ऑपरेशन होणार होते. माझा असा चेहरा पाहून तुम्ही म्हणाला होता नायर काय होत आहे तुला ? अन् मी म्हणालो होतो साब सब झूट...क्या हो गया हमारे सिस्टर को ? त्यावेळी फार दुःखी होतो. इतके झाल्यावर मी त्याला माझ्या पद्धतीने सांगितले होते, नायर तू मोठ्यावर विश्वास ठेवतो ना ? मला रोज गुडमॉर्निंग ऐवजी 'जय साई' म्हणतो ना मग ऐक मी तुझ्या ह्या बहिणीसाठी प्रार्थना करणार आहे साईला, आहे ना तुझी श्रद्धा ? तुझ्या पत्राचे दुःख खचितच तो बरे करील तुला मनात काय ठरवायचे तू ठरीव.

त्याची अधिरता पाहून नुकतेच पोस्टाने शिरडीहून आलेले माझ्या सौभाग्यवतीच्या नावाचे 'उदीप्रसादाचे पाकीट त्याचे हवाली करून म्हटले... हा सौभाग्यवतीला आलेला प्रसाद तुझ्या वडिलांकडे धाड. तुझ्या बहिणीचे संकट दूर होईल.

नायरने तावडतोब Q. M. S. ने तो प्रसाद अंगारा आपले गावी बहिणीसाठी धाडला, व लिहिले दररोज पाण्यामधून ही उदी प्राशन करावी.

बघा बापूसाब आज फादरने लिहिले आहे. आपले गावात नुकतेच बदलून आलेल्या एका वृद्ध डॉक्टराने आपल्या पद्मास तपासले. तब्बल चाळीस मिनिटे. त्याला तर काही किडनी ट्रबल भासले नाही. तथापि डॉक्टर म्हणाले, हिला इतके दिवस काय औषधपाणी केले ? वडिलांनी म्हटले ह्या खेड्यात घरचे औषध जरूर दिले पण हे एक औषध अंगारा पाण्यातून रोज तिला देत होतो. डॉक्टर हसून म्हणाले बावारे हेच तर मोठे औषध तुम्ही हिला दिले. यह शिरडी साईबाबा की दवाई है। यातच बहिणीने खाली लिहिले होते–'सॅम्' तू धाडलेल्या पुडीने बरेच दुखणे कमी झाले होते आणि डॉक्टरला दाखविले तेव्हा तर कसलाही त्रास नव्हता. मग ऑपरेशनचा प्रश्नच नाही राहिला. आपल्या आईला फार बरं वाटल त्यामुळे....मात्र मला तिकडे नोकरीस येता येणार नाही. तर बाबूजी माझ्या मनाचे केवढे दडपण कमी झालंय. कुठं आहे ही शिरडी अन् साईबाबा ? अन् हो मनात योजलेली त्या उदी प्रसादाच्या पुडीची म. ऑ. करायची आहे ना ? कृपया पत्ता लिहून द्या...बापूसाब काय असेल ही किमया ? माझे एकच उत्तर होते....नायर आपल्या बहिणीसाठी तू

साईबाबास साद घातलीस ना! म्हणूनच तो तुझ्या आजारी वहिणीच्या आहे उभा पाठीशी!

गुरुभक्ति ऐसी जयासी। उणें कैसे तयासी
इच्छील जे जे आपुले मानसी। ते ते अप्रयासी लाभेल।। १६।।

श्रीसाईसच्चरित्र अध्याय ४६

●

# श्री साईबाबांच्या उदीचा चमत्कार

—सौ. वसुंधरा रामराव चोरे
८०३ सी. डॉ. आंबेडकर मार्ग
दादर, मुंबई १४

● श्री साईबाबांच्यांच्या उदीमुळे झालेल्या चमत्काराची बरीच उदाहरणे मी साईलीला मासिकात वाचलीत व पुष्कळ लोकांकडून ऐकली. मी लहानपणापासून साईभक्त आहे व अधून मधून शिरडीला बाबांच्या दर्शनाला जाण्याचा योग मला येत असतो. तरीपण स्वतःला बाबांच्या चमत्काराचा प्रत्यक्ष असा अनुभव कधीच आला नव्हता. पण बाबांवर माझी भक्ती आणि विश्वास कधीही ढळला नाही. श्रद्धा आणि सबुरी या बाबांच्या उपदेशाचे पालन मी करीत होते व त्याचे फळ मला खरोखरच मिळाले. एकदा नव्हे तर दोन वेळा व तेही चांगल्या प्रकारे.

काही वर्षांपूर्वी माझ्या यजमानांना गुढघे दुखीचा त्रास होऊ लागला. विशेषतः एका ठिकाणी खुर्चीवर फार वेळ बसल्यानंतर उठताना गुढघे दुखत असत व लंगडत चालावे लागे. त्यांची नोकरी अत्यंत चांगल्या कंपनीत व उच्च दर्जाची असल्यामुळे डॉक्टरी इलाज कंपनीतर्फे सहज व अत्यंत चांगल्याप्रकारे होत असे. तरी पण कंपनीच्या डॉक्टरांनी त्यांना सांगितले की वयाच्या मानाने हे दुखणे तुम्हाला फार लवकर आले आहे व औषधाच्या गोळयामुळे दुखणे गेले तरी त्याचा परिणाम जास्त दिवस टिकणार नाही व परत दुखणे येत राहील. थोडक्यात म्हणजे हे दुखणे कायमचे दुरुस्त होणार नाही व त्याबरोबरच रहावे लागेल.

आम्ही साईभक्त असल्यामुळे बाबांची मनोभावे प्रार्थना केली व दररोज स्नानानंतर बाबांचे नामस्मरण करून गुढघ्याला उदी लावून हे दुखणे उदीच्या प्रभावाने कायमचे जावो अशी करुणा भाकीत होतो. साधारणतः ६ महिने हा कार्यक्रम चालू होता. बाबांनी आमची श्रद्धापूर्वक मारलेली हाक ऐकली व माझ्या यजमानांचे गुडघ्याचे दुखणे कायमचे बरे झाले. गेले कित्येक वर्षांपासून हा त्रास मुळीच होत नाही. काहीही औषधपाणी चालू नाही व एकेकाळी असा त्रास होता याची चिन्हे पण नाहीत.

दुसरे माझ्या मुलीच्या लग्नासाठी बरेच प्रयत्न चालू होते. पण योग्य ठिकाणी जुळत नव्हते. बाबांची मनात प्रार्थना केली व सांगितले की बाबा मुलीचे लग्न चांगल्या ठिकाणी होऊ द्या म्हणजे मी माझा अनुभव साईलीला मासिकात प्रसिद्ध करीन. माझ्या मुलीचे लग्न अत्यंत चांगल्या प्रकारे व मनासारखे पार पडले आणि आमचा हा आनंदमयी अनुभव साईलीला मासिकाच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध करण्याचा योग केवळ बाबांच्या कृपेमुळेच आला.

श्रद्धा आणि सबुरी या दोन गोष्टी मनात ठामपणे ठेऊन बाबांची भक्ति अखंड चालू ठेवल्यामुळे आम्हाला त्याची गोड फळे मिळाली. असा लाभ सर्व भक्तांना पण मिळेल यात तिळमात्र शंका नाही.

☆

# साईकृपेने नाटकातील भूमिका यशस्वी

—श्री. रमेश डी. चव्हाण
साईनिकेतन, गुजरलेन कॉर्नर
मु. पो. ता. नवापूर जि. धुळे
नवापूर पिन ४२५४१८

● एखाद्या नवीन क्षेत्रात पदार्पण केल्यास आपण त्यात यशस्वी होऊ किंवा नाही याबद्दल मनुष्य साशंक असतो. इतर अनेक क्षेत्रे काबीज करणाराही नवीन क्षेत्रात भीतभीतच प्रवेश करीत असतो; आणि समजा त्याने प्रवेश करायचाच ठरविले तर तो आपल्या आराध्य दैवतास अनन्यभावाने शरण जाऊन यशस्वी होण्यासाठी प्रार्थना

करतो आणि त्यानंतर त्या नवीन क्षेत्रात भरपूर यश मिळाल्यास सारे श्रेय आराध्य दैवतास देऊन मोकळा होतो.

अशाच प्रकारचा नुकताच मला एक अनुभव आला. गेल्या पंधरा वर्षापासून मी साहित्य क्षेत्रात खूपच प्रगती गाठली आहे.

साहित्य क्षेत्राशिवाय सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रातही उल्लेखनीय गिरी एक प्रसिद्ध कवि म्हणून अनेकांना परिचित. त्यामुळे सर्व स्तरात फार मित्रमंडळी लाभली आहेत.

असेच माझे एक नाट्यप्रिय मित्र डॉ. प्रल्हाद आमले हे होत. त्यांना ना जबरदस्त वेड. विदर्भात असताना त्यांनी अनेक नाटकातून प्रमुख भूमिका के होत्या. बदली निमित्ताने ते नवापूरला म्हणजे खानदेशात आलेले. खानदेश आपल्या नाट्यकलेला संधी मिळावी म्हणून नाट्यसंस्था उभी करावी ही त्यांची इच्छा त्यांनी माझ्याजवळ बऱ्याचदा बोलून दाखविली. अखेर २६ जानेवारी १९८१ च्या शुभमुहूर्तावर आम्ही नवापूरात ' हौशी नाट्य मंडळ नवापूर ' ही संस्था स्थापन केली. डॉ. आमले अध्यक्ष तर मी सरचिटणीस पदाची जबाबदारी स्वीकारली.

अनेक सरकारी खात्यातले अधिकारी, कर्मचारी संस्थेचे सदस्य बनले. मे १९८१ त नाटकाचा पहिला प्रयोग करावयाचा असे ठरले. त्या दृष्टीने आम्ही ' तरुण तुर्क म्हातारे अर्क ' हे नाटक बसवावयास घेतले. नाट्यक्षेत्रात मी कधीच शालेय जीवनातसुद्धा भाग न घेतल्यामुळे भूमिका स्वीकारली नाही. प्रॅक्टिसच्या वेळी जे कलाकार गैरहजर रहात त्यांचे संवाद वेळ निभवण्यासाठी मी म्हणू लागलो. तशात ' तरुण तुर्क म्हातारे अर्क ' हे नाटक लेखकाने चंद्रलेखा संस्थेस विकल्याने त्याचे प्रयोग करता येणार नाहीत असे कळल्यावरून आमचे बसलेले नाटक होऊ शकले नाही.

मे १९८१ त नवापूरकरांना हौशी नाट्य मंडळाच्या कलावंतांनी सादर केलेले नाटक दाखवायचेच म्हणून आम्ही प्रा. वसंत कानेटकर लिखित ' घरात फुलला पारिजात ' हे सामाजिक नाटक निवडले. डॉ. प्रल्हाद आमले यांनी कलावंत निवडायचे असे ठरले. त्याप्रमाणे नंतरच्या मिटींगमध्ये त्यांनी कलावंतांची नावे जाहीर केली त्यात ' श्रीरंग ' ची भूमिका मी करावी असा त्यांनी आग्रह केला.

आयुष्यात कधीच नाटकातील भूमिका केली नसल्यामुळे भूमिका कितपत यशस्वी करू शकेन अशी शंका होती. परंतु कोणतेही आव्हान मी नाकारायचे नाही असे ठरविल्याने दिलेली भूमिका मी स्वीकारली. नाटकाची प्रॅक्टीस जोरात सुरू झाली.

डॉ. प्रल्हाद आमले, सौ. वंदना नाईक, कु. मिनाक्षी पाठक, श्री. एकनाथ सोनवणे, श्री. तानाजी सोनवणे, श्री. मधुकर गुलवाडे, श्री. अविनाश चौघुले, श्री. चंद्रकांत दिक्षीत, श्री. शांताराम नीळ ह्या कलाकारांसोबत माझी भूमिका होती. नायकाच्या मित्राची महत्वाची भूमिका शिवाय माझ्याबरोबर स्त्री कलावंताची भूमिका असल्याने माझी श्रीरंगची भूमिका यशस्वी करण्याची जबाबदारी होती. इतर कलावंतांच्या मानाने आपली भूमिकासुद्धा चांगली व्हावी असे मनोमन वाटायचे. त्यासाठी मी भूमिकेतील बारकावे समजून घेतले. संवाद पाठांतर केले. अभिनय उत्तम जमावा म्हणून माझे धुळ्याचे मित्र जगदीश देवपूरकर यांना नवापूरला बोलावून घेतले. चांगली तयारी झाल्यावरसुद्धा ऐनवेळी काय होईल, कसे होईल अशी भीती वाटत होती.

अखेर ५ मे १९८१ नाट्यप्रयोग सादर करावयाचा दिवस उजाडला. नाटकाला तोबा गर्दी उसळली होती. भूमिका यशस्वी व्हावी, ऐनवेळी फजिती होऊ नये म्हणून मी माझे आराध्य दैवत श्री साईबाबांना प्रार्थना केली की, 'बाबा, आजवर तू माझ्या प्रत्येक कार्यात पाठीशी राहून मला यशस्वी केले आहे. नाट्यक्षेत्रात नवा असलो तरी माझी प्रतिमा उंचावली जावी यासाठी माझी भूमिका उत्तम नाही झाली तरी इतरांच्या तुलनेत नगण्य होता कामा नये. भूमिका चांगली झाल्यास साईमंडळात गुरुवारी प्रसाद चढवीन. अशी प्रार्थना केल्यावर बाबांची उदी कपाळाला लावली व उदीची पुडी खिशात ठेवून आत्मविश्वासाने स्टेजवर गेलो आणि काय आश्चर्य !

माझी भीती कुठच्या कुठे पळाली. मी माझ्या भूमिकेशी इतका समरस झालो की प्रेक्षकांना आमची एन्ट्री हवीशी वाटू लागली. रसिकांनी भरपूर रिसपोन्स दिला. भूमिका चांगली झाली. अनेकांनी अभिनंदन केले. दुसऱ्या दिवशी व त्यानंतर सर्व स्तरातील व्यक्ती भेटल्या व त्यांनी भूमिका उत्तम झाल्याचे सांगितल्याने मनस्वी आनंद झाला. मी बाबांचे मनोमन आभार मानले.

त्यानंतर दि. ७।९।८१ रोजी नवापूरला गणेशोत्सवात दुसरा प्रयोग व दि. ६।३।१९८२ रोजी तळोदे येथे जेसीजतर्फे तिसरा प्रयोगही झाला. त्यातसुध्दा अपेक्षेपेक्षा चांगले यश मिळाले. अर्थात् सर्व प्रयोगाच्या वेळी बाबांची उदी खिशात होती हे सांगायला नकोच.

असे आहेत माझे साईबाबा. भक्तांसाठी धावून येणारे आणि म्हणूनच नकळत गुणगुणू लागतो–

'माझ्या साईस कसा विसरू
अहो माझ्या साईस कसा विसरू

जपतोय हृदयात न् दुड्डदुड्ड धावतोय शिरडीत
कसा भक्तीत दुड्डदुड्ड धावतोय कसा कसा जातोय ह
आपल्याच नादात....ग बाई बाई आपल्याच नादात
माझ्या साईस कसा विसरू......

# साईकृपा

—सौ. उषा चितांबर
५१४७ बडवेवाडी, अहमदनगर

● श्रीसाई माऊली आपल्या पाठीशी सदैव उभी असते. हे आम्हाला पदोपदी जाणवते. एकदा माझा मुलगा चि. अमोल हा किडनीच्या विकाराने आजारी होता. तो संपूर्ण सुजला होता. काय करावे सूचत नव्हते. डॉक्टरांचे इलाज चालूच होते तरी सुद्धा गुण येत नव्हता त्यामुळे डॉक्टर सुद्धा बेचैन झाले होते. शेवटी डॉक्टरांनी शेवटचा उपाय म्हणून मुंबईस नेऊन ऑपरेशन करावे लागेल हा सल्ला दिला. पण ऑपरेशन म्हटले की मोठाली माणसं सुद्धा घाबरतात. तर मग माझा अमोल बाळ तर अवघ्या ४ चार वर्षांचा होता. त्याचे ऑपरेशन करावयाचे तर घरातील बाकीचे थोर लोक एकमेकाकडे सून्न नजरेने बघू लागले. आता करावयाचे काय ? तेव्हा आमची रोज घरात साईबाबांच्या नावाच्या जपाची सेवा करण्याचे व्रत चालूच होते. आमचे घरात बाबांविषयीची श्रद्धा वडीलोपार्जित अढळ होती. कारण माझे आजोबा, वडील सर्व चुलते शिरडीला बाबा असताना त्यांचे आंगाखांद्यावर त्यांचे समवेत वावरलेले आहेत. त्यामुळे बाबांच्या उदीचा प्रसाद म्हणून क्षणोक्षणी वापर केला जात होता वेळोवेळी उदी पाण्यातून देत होतो. मनात बाबांना प्रार्थना करून मुलास बरे वाटू दे, मी तुझ्या दरबारी येऊन श्रीसत्यनारायणाची पुजा करीन असे मनात ठरविताच खरोखरीच त्याची तब्बेत सुधारू लागली. त्यामुळे डॉक्टरांना सुद्धा धीर आला. व आज पावेतो त्याची तब्येत ठणठणीत सुधारली आहे. तो व्यवस्थित शाळेत जातो. यास श्रीसाईबाबांची आमचे घराण्यावर असणारी कृपा हेच कारण होय.

घरात रोज बाबांची पोथी वाचन चालूच आहे. उदी तर क्षणोक्षणी प्रसाद म्हणून घेत आहोत. त्याचा परीणाम म्हणूनच की काय ? चि. अमोल त्याचे वर्गात एक हुषार मुलगा म्हणून गणला जातो.

अशीच सदैव श्रीबाबांची कृपा आमचे घराण्यावर राहो ही बाबांचे चरणी प्रार्थना. ●

# जरी हे शरीर गेलो मी टाकून।
# तरी मी धावेन भक्तांसाठी॥

—श्री. अनिल नारायण रिसबूड
२२३ नवी अमृत वाडी विठ्ठलभाई
पटेल रोड, गिरगाव मुंबई—४

● शिरडीला श्रीरामनवमी, गुरुपौर्णिमा व दसरा आदी सण दरवर्षी मोठ्या दिमाखात साजरे केले जातात. त्यापैकी श्रीरामनवमी उत्सवाला आम्ही आज जवळ जवळ दहा ते बारा वर्षे नित्यनेमाने जात आहोत. चार-पाच वर्षांपूर्वीच आम्ही 'श्रीसाईनाथ मित्र-मंडळ' स्थापन केले आहे. आमच्या मित्र-मंडळात पुरुष व स्त्रियाही सभासद आहेत. दर महिन्याला प्रत्येक सभासदाकडून दहा रुपये घेऊन ते बँकेत जमा केले जातात. वर्षाला साधारण एकशे वीस रुपये प्रत्येकाचे जमा होतात. त्यामुळे सर्व सभासदांना पैशाच्या दृष्टीने सोयीचे होते. श्रीरामनवमीला शिरडीला जाण्याच्या वेळी ते पैसे बँकेतून काढून सर्व सभासदांचा शिरडीला जाण्याचा व परतीचा प्रवास, चहा-पाणी, जेवण, जागेचा वगैरे सर्व खर्च त्यामधूनच केला जातो. मंडळातर्फे श्रीबाबांना शाल, रुमाल व गुलाबांच्या फुलांचा मोठा हार अर्पण केला जातो. ह्यावर्षीही आम्ही आमच्या मंडळातर्फे श्रीरामनवमी उत्सवानिमित्त शिरडीला जाऊन आलो. परंतु ह्यावर्षी श्रीबाबांनी आमच्यावर आलेल्या एका मोठ्या बिकट व कठीण अशा प्रसंगातून आम्हाला कसे सोडवले त्याची हकीकत तर ऐका—

'माझ्या दरबारात कुणीही येवो
त्याला मी कधीही विन्मुख व
दुःखी कष्टी होऊन पाठविणार नाही'

श्रीसाईबाबांच्या वरील उक्तीची प्रचिती आम्हा सर्वांना त्यावेळी श्रीबाबांनी आणून दिली. यावर्षीचा श्रीरामनवमी उत्सव आम्हां सर्वांच्या लक्षात राहिल्याशिवाय राहणार नाही.

फेब्रुवारी महिना उजाडला आणि सर्वांचे लक्ष शिरडीकडे लागले. यावेळी श्रीरामनवमी उत्सवानिमित्त शिरडीला येणाऱ्यांची संख्या जवळ जवळ तीस ते पस्तीस इतकी झाली होती. इतक्या जणांची राहाण्याची सोय व एस. टी.चे आरक्षण

मिळणे म्हणजे कठीणच काम होते. परंतु श्रीबाबांच्या कृपेने हे दोन्हीही प्रश्न चुटकीसरशी सुटले. आम्हाला राहण्यासाठी आमच्या साईधामची जागा मिळाली व एस. टी. ची तिकीटेही मिळाली. ठरल्याप्रमाणे आम्ही बुधवार दिनांक ३१ मार्च रोजी रात्रौ पावणे-नऊच्या गाडीने शिरडीस जाण्यासाठी निघालो. आमच्या गाडीत 'श्रीसाईलीला' मासिकाचे कार्यकारी संपादक मा. श्री. सदानंद चेंदवणकर साहेब हे पण होते. त्यांच्याशी आमची सर्वांची ओळख झाली. गाडीतून जाताना आम्ही भजन करीत होतो त्यामुळे जागरणाचा व प्रवासाचा आम्हांला मुळीच त्रास झाला नाही. पहाटे चार वाजता आम्ही शिरडीला सुखरूप पोहोचलो. गाडी ठरल्यावेळेनुसार अर्धातास अगोदरच आल्यामुळे आम्हा सर्वांना स्नान वगैरे करून उत्सवाच्या पहिल्या दिवशीची काकड आरती मिळाली. ही श्रीसाईबाबांचीच कृपा. उत्सवाचे तिन्ही दिवशी श्रीसाईबाबांचे दर्शन, सर्व आरत्या सर्व कार्यक्रम श्रीराम नवमीच्या दिवशी गुरुस्थान व समाधिमंदीराला १०८ प्रदक्षिणा, अभिषेक वगैरे सर्व कार्यक्रम आम्हा सर्वांना व्यवस्थित करण्यास मिळाले. दरवर्षीप्रमाणे काल्याच्या दिवशी संध्याकाळी आम्ही सर्व म्हणजे तीसजण साकोरीला जाऊन आलो, ते सुद्धा माणशी दोन रुपये सीट अशा स्वस्त दरात. एरवी टांगेवाले चार ते पाच रुपये सीट असा दर सांगतात. अशा तऱ्हेने श्रीसाईबाबांच्या कृपेने आमचे सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडले. रविवार दिनांक चार रोजी रात्रौ साडे दहाच्या गाडीचे परतीचे आरक्षणही झालेले होते. त्यामुळे सर्वजण परत यावयाच्या तयारीत होते. परंतु...

परंतु श्रीसाईबाबांच्या मनात काही निराळेच होते असे दिसून आले. आम्ही रविवार दिनांक चार रोजी माध्यान्हची आरती झाल्यावर घरी येऊन जरा आराम करीत पडलो होतो. काहीजण खरेदीसाठी बाहेर गेले होते. आमच्या मंडळातील एक सभासद श्री. अरविंद मुसळे यांचे बरोबर एक त्यांची पाहुणी-सौ. वैशाली पावस्कर-आली होती. तिच्या एकाएकी छातीत दुखू लागले. सर्व शरीर थंडगार पडले. श्वास घेण्यास त्रास होत होता. हाताची नाडी मंद होत चालली होती. सर्वांना त्याची कल्पना आल्यामुळे आम्ही सर्वजण घाबरलो. तिच्या बरोबर तिच्या घरचे कुणीच आले नव्हते. ती सुद्धा आमच्यात नवीन, त्यामुळे काय करावे ते आम्हाला सुचत नव्हते. लगेच काही जण डॉक्टरकडे गेले. काही जणानी तिच्या तळपायांना व्हिक्स चोळले, काही जणानी श्रीसाईबाबांची उदी पाण्यात घालून ते उदी मिश्रीत पाणी तिला थोडे थोडे पाजले, सर्व अंगाला उदी लावली पण काहीच फरक पडला नाही. प्रत्येकजण आपापल्यापरीने प्रयत्न करीत होता. सौ. वैशाली बरी होण्यासाठी व मुंबईला सुखरूप परत जाण्यासाठी काहीजणानी नवस केले.

इतक्यात आमच्या मंडळातील एक सभासद श्री. रमेश पंडित हे खरेदी करून घरी आले. एकंदर सर्व परिस्थिती बघून त्यांनी लगेच त्यांच्या ओळखीच्या डॉक्टरला बोलावून आणले. त्यांनी तिला तपासले व ग्लुकोज दिले. ग्लुकोज दिल्यावर तिला जरा शांत झोप लागली. डॉक्टरांनी सांगितले की, 'हिला हॉस्पिटलमध्ये नेऊन तिचा कार्डिओग्राम काढून घ्या व नंतर ते डॉक्टर सांगतील त्या प्रमाणे करा. मी पुन्हा अर्ध्या तासाने येतो' सर्वजण विचारात पडले. रात्रीच्या गाडीने सर्वजण मुंबईस परतणार आणि आता हिला हॉस्पिटलमध्ये नेल्यावर डॉक्टरांनी तिला ह्या परिस्थितीत मुंबईला नेऊ नका असे सांगितले तर काय करावयाचे ! शेवटी विचारविनिमय करून आम्ही ठराविक तीन-चार जणांनी शिरडीलाच थांबून बाकी सर्वांनी मुंबईला जावयाचे व तिच्या घरच्या माणसांना पूर्ण कल्पना देऊन शिरडीला पाठवून द्यावयाचे असे ठरले.

शेवटी मी स्वतः श्रीसाईबाबांच्या फोटोसमोर हातात उदी घेऊन उभा राहिलो व आरती केली आणि श्रीबाबांजवळ प्रार्थना केली की, 'बाबा आमची तुमच्यावर पूर्ण श्रध्दा आहे. आजपर्यंत तुमच्या ह्या दरबारातून कोणीही विन्मुख होऊन गेला नाही. तेव्हा हिची तब्येत सुधारू दे व मुंबईला तिच्या घरी सुखरूप जाऊदे. बाबा, आता आमची लाज तुम्हीच राखा, आमच्यावर दया करा, आम्ही तुमचीच लेकरें आहोत, आम्हाला तुमच्याशिवाय कोणाचा आधार ! आमच्या हातून असा काय गुन्हा घडला म्हणून देवा हे संकट आमच्यावर आले. बाबा आमच्यावर आलेले हे संकट दूर करा. आम्ही मित्रमंडळी पुढील महिन्यात तुमच्या दर्शनाला शिरडीला परत येऊ.' अशी प्रार्थना करून ती उदी सौ. वैशालीच्या अंगाला लावण्यास माझी मोठी बहीण सौ. सुधा गोडे हिला सांगितले. उदी चोळल्यावर थोड्या वेळाने सौ. वैशालीला जरा बरे वाटू लागले.

नंतर अर्ध्या तासाने ते डॉक्टर पुन्हा आले. त्यांनी सौ. वैशालीचे ब्लडप्रेशर वगैरे तपासले व सांगितले की, 'सर्व काही ठिक आहे. परंतु तुम्ही हॉस्पिटलमध्ये जाऊन तिचा कार्डिओग्राम काढा व त्या डॉक्टरांनी परवानगी दिली तरच तिला मुंबईला घेऊन जा.' तावडतोब आम्ही त्या डॉक्टरांकडून चिठी घेतली व तिला हॉस्पिटलमध्ये नेण्यास निघालो. स्ट्रेचर न मिळाल्यामुळे तिला खुर्चीत बसवून नेण्याचे ठरले. परंतु ती स्वतः श्रीसाईनाथ हॉस्पिटलमध्ये चालत गेली. तिच्याबरोबर माझे मोठे बंधु श्री. मुकुंद रिसबूड, त्यांची पत्नी सौ. कल्पना, श्री. अरुण रेवणकर, संजय वगैरे मित्रमंडळी होती. सर्वजण मनातल्या मनात श्रीबाबांची प्रार्थना करीत होते. हॉस्पिटलमध्ये गेल्यावर दोन डॉक्टर्सनी तिला व्यवस्थित तपासले व औषधांची नावे

लिहून दिली आणि ताबडतोब ती औषधे तिला देण्यास सांगितले. तसेच कार्डिओग्राम वगैरे काढण्याची मुळीच गरज नाही. तुम्ही तिला मुंबईला नेण्यास मुळीच हरकत नाही. काहीही घाबरण्याचे कारण नाही असे सांगितले. ताबडतोब आमचा एक मित्र श्री. सुरेश केळसकर ही आनंदाची बातमी घेऊन आला. ती बातमी ऐकल्यावर आमचा सर्वांचा जीव भांड्यात पडला. लगेच आम्ही सर्वांनी प्रत्येकाकडून एक-एक रुपया जमा केला व पेढे आणि हार आणून सर्वांनी मिळून श्रीसाईबाबांची आरती केली. श्रीसाईबाबांची जी अकरा वचने आहेत त्यातील एका वचनाची प्रचिती आम्हाला त्यांनी दिली ते वचन असे-

जरी हे शरीर गेलो मी टाकून।
तरी मी धांवेन भक्तांसाठी ॥

नंतर आम्ही सर्वजण सौ. वैशालीला घेऊन गुरुस्थान व समाधीमंदिरात गेलो तेथे श्रीबाबांची स्तुती करून श्रीबाबांची करुणा भाकली, 'देवा, तू आज आमची लाज राखलीस, आता ती तिच्या घरी सुखरूप जाऊ दे. वाटेत कुठल्याही प्रकारे त्रास होऊ देऊ नका.' अशा प्रकारे करुणा भाकल्यावर ज्यांनी सौ. वैशाली बरी होण्यासाठी जे नवस बोलले होते ते त्यांनी लगेच तेथे फेडून घेतले. नंतर संस्थान मध्ये जेवण करून रात्रीच्या साडेदहाच्या गाडीने मुंबईस परतलो. वाटेत सौ. वैशालीला श्रीसाईबाबांच्या कृपेने कुठल्याही प्रकारे त्रास झाला नाही.

अशा रितीने श्रीसाईबाबांनी आमच्यावर आलेल्या ह्या कठीण प्रसंगातून आम्हाला सहीसलामत सोडवले. आम्ही कृतज्ञतेने श्रीसाईबाबांना हात जोडले.

येथे एक गोष्ट मला प्रामुख्याने नमूद करावीशी वाटते की, आम्हाला तिसऱ्या मजल्यावर जागा मिळाली होती. रविवार सकाळपासून एक कुत्री-आमच्याबरोबर ज्या महिला आल्या होत्या-त्यांना एक वेगळी बारा नंबरची खोली देण्यात आली होती-त्या खोलीच्या दारात बसून होती. दुपारी आम्ही जेवून आल्यावर सौ. वैशाली आमच्या अकरा नंबरच्या खोलीत येऊन आराम करीत होती. त्यावेळी ती कुत्रीसुद्धा बारा नंबरच्या खोलीच्या दारातून उठून अकरा नंबरच्या खोलीच्या दारात आतल्या बाजूला तोंड करून बसली होती. आम्ही कोणीच तिला घालवून दिली नाही तर उलट तिला बिस्किटे वगैरे खायला घातली. ज्यावेळी सौ. वैशालीला हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलो त्यावेळी ती कुत्रीपण त्यांच्याबरोबर खाली गेली. त्यानंतर ती कुत्री कोणालाच दिसली नाही. सर्वांनाच आश्चर्य वाटले. दोन-तीन वर्षांपूर्वी आमच्याबरोबर श्रीरामनवमीला आलेले श्री. हुले यांनी आम्हाला त्यावेळी असे सांगितले होते की, 'श्रीसाई

बाबा श्रीरामनवमीच्या उत्सवाला शिरडीत कुठल्या ना कुठल्या रूपात वास करीत असतात.’ काय सांगावे, श्रीबाबांनी त्या कुत्रीच्या रूपात येऊन आमच्यावरील आलेले संकट दूर केले असण्याची शक्यता आहे–नव्हे ते आम्ही सत्यच मानतो. नाहीतरी आरतीमध्ये सांगितलेच आहे—

दाविसी नाना लीला असंख्य रूपांनी ।
हरिसी दीनांचे तू संकट दिनरजनी ॥

श्रीसाईबाबांनी आम्हा सर्वांवर अशीच कृपा ठेवावी ही श्रीसाईचरणी प्रार्थना! न कळतच मुखातून उद्‌गार बाहेर पडतात–

‘ श्रीसद्‌गुरु बाबा साईऽऽहोऽऽश्रीसद्‌गुरु बाबा साई ।
तुजवाचुन आश्रय नाही भूतली ॥

अशा तऱ्हेने त्या वर्षीचा श्रीरामनवमी उत्सव आमच्या–श्रीसाईनाथ मित्र मंडळाच्या–कायम लक्षात राहिल्याशिवाय राहणार नाही.

★

# श्री साईबाबांनी प्रसाद ग्रहण केला

—सौ. लीलादेवी पंडित
सुदर्शन, घनश्याम पंडित रोड, राजकोट

● आपल्या पूज्य श्री साईबाबांनी क्षणात भूल पाडून भक्तांना वेळोवेळी दर्शन देऊन मनोकामना पूरी करण्याचे अनेक प्रसंग आणले व म्हणून त्यापैकी एक प्रसंग देते तो असा– काही वर्षापूर्वी माझे मनात श्री साईसप्ताह करण्याचे आले. परंतु आमचे संयुक्त कुटुंबामुळे या ना त्या कारणाने सप्ताह करण्याचे लांबणीवर पडत गेले. त्याच सुमारास ह्यांच्या मनात आलेला सप्ताह करण्याचा विचार ह्यांनी मला सांगितला. मला खूपच आनंद झाला, व त्या दिवशी मंगळवार असल्याने लगेच परवाच गुरुवारी सुरवात करू या सांगून सप्ताह बसविला. दुसऱ्या गुरुवारी गुरुजीकडून यथासांग पूर्णाहुती करून शिऱ्याचा नैवेद्य केला होता. आरती चालू असतानाच एक म्हातारे साधुमहाराज पुढच्या दारी येऊन ठेपले व आवाज दिला. मी शिधा देऊ केला पण उपवास आहे दुसरे काहीतरी दे म्हणाले, म्हणून मी सव्वापाच रुपये दिले. तेहि नको म्हणून प्रसाद दे म्हणाले. माझे तर खरे लक्ष आरतीकडे होते. तेव्हा मी आरती

संपताच नैवेद्य दाखवून प्रसाद देते तोपर्यंत बसा म्हणून सांगितले. त्याप्रमाणे चांगला मोठा द्रोण भरून प्रसाद दिल्यावर 'अल्ला भला करेगा' असा आशिर्वाद दिला. ह्यांना ते साधुमहाराज आलेले सांगण्यासाठी बोलविले पण साधुमहाराज बघता बघता अदृष्य झाले. संबंध कंपाउंडात बघून चारहि दिशेला बघण्यासाठी नोकरास पाठविले. पण कुठेच दिसले नाहीत. आणि मग मला रुखरुख लागली की श्री साईबाबाच तर ह्या साधुमहाराजांच्या रूपाने आले नसतील ना? शंकाच नाही. हा असा अनुपम आनंद देणारा दृष्टांतच होता, आणि म्हणूनच सर्व भक्तांना असा आनंद मिळावा हीच इच्छा. अशा आमच्या श्री बाबांना आमचे शतशः प्रणाम.

# श्री साईबाबांनी माझी इच्छा पुरी केली

—श्री. रमाकांत पंडित
माटुंगा मुं. १९

● माझ्या 'साईगीत अर्चना' या भक्ती गीताच्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ फेब्रुवारी १९८२ मध्ये शिरडीला भरलेल्या कवि संमेलनात करून एक प्रत श्री साईबाबांच्या चरणी अर्पण करण्याचा माझा मानस होता परंतु काही अडचणीमुळे ते शक्य झाले नाही त्याबद्दल मनाला अत्यंत रुखरुख लागलेली व वाटले की कदाचित बाबांचीच इच्छा नसेल.

कवि संमेलन संपल्यावर श्री मुंबईत परत आलो. काही दिवसांनी दोन साईभक्त श्री. पडवळ व श्री. कांदळगावकर हे माझा पत्ता शोधीत माझ्या घरी आले. तो दिवस २३ मार्च होता ते म्हणाले उद्या आमची श्री साईबाबांची पालखी शिरडीला जाण्यासाठी साई निकेतन दादर येथून चार वाजता निघणार आहे. तेव्हा 'साई गीत अर्चना' हे तुमचे पुस्तक पालखीतून नेतो व शिरडीला श्री साईबाबांच्या पायावर घालतो. तेव्हा तुम्ही आमच्या घरी हे पुस्तक घेऊन २ वाजता या. हे शब्द ऐकताच मला फार आनंद झाला. मी दुसरे दिवशी श्री कांदळगावकरच्या घरी गेलो तेथून श्री साईबाबांची पोथी व भगवे निशाण निघणार होते. त्या पोथी समवेत माझे पुस्तक ठेवण्यात आले बरोबर २॥ वाजता श्री साईबाबांची पोथी व निशाणाची मिरवणूक

निघाली व तीन वाजता साईनिकेतनमध्ये पोहचली. तेथे चांदीची पालखी फुलांनी सजवली होती. त्या पालखीत श्री साईबाबांचा फोटो, बाबांची पोथी व माझे पुस्तक ठेवले गेले व ठीक ४॥ वाजता पालखी वाजत गाजत निघाली. सुमारे १०० लोक पालखीबरोबर श्री साईबाबांचा जयघोष करीत निघाले होते. ती पालखी रामनवमीच्या दिवशी शिरडीला पोहचली व श्री कांदळगावकर ह्यांनी माझे पुस्तक बाबांच्या पायावर घातले. अशा रीतीने श्री. पडवळ व श्री. कांदळगावकर ह्यांना माझ्या घरी येऊन निरोप देण्याची प्रेरणा बाबांनीच दिली व माझे पुस्तक बाबांच्या चरणकमली पडण्याची माझी इच्छा त्यांनी पुरी केली व मी धन्य झालो. आपल्या भक्तांची इच्छा पुरी करणाऱ्या श्री साईबाबांना माझे लाख प्रणाम.

●

# मी साईभक्तीला कशी लागले !

—श्रीम. **मनोरमाबाई श्रीधर परुळेकर**
लीलाशंकर सोसायटी, ब्लॉक नं. १८, लोकमान्य
टिळकनगर रोड नं. ६ मुंबई ४०० ०६२

● १९५० सालची गोष्ट. माझे धाकटे बंधू श्री. विनायक विठ्ठल देसाई हे प्रथम शिर्डीला गेले. तेथे तीन चार दिवस राहून शिरडीचा सोहळा बघून आले. येताना माझ्यासाठी 'बाबांची' प्रतिमा आणली व तिकडच्या सगळ्या गंमती-जमती आम्हांल सांगितल्या त्या ऐकून आम्हाला फार आनंद झाला. नंतर ते स्वतः श्रीसाईचरित्र पारायण करणे, रोज आरत्या म्हणणे इत्यादी करू लागले. [ अजुनही करतात ] त्यांचे बघून मलाही श्रीबाबांच्या भक्तीचे वेड लागले व मीही या भक्तिमार्गाला लागले.

१९५३ चा एप्रिल महिना मी, माझे यजमान, मुले वसई स्टेशनला राहात होतो. तेथे आमच्या शेजारी प्रधान आडनावाचे गृहस्थ राहात असत. त्यांचे वडील अतिशय साईभक्त होते. ते लोकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यायचे. मला शिर्डीला जाण्याची खूप दिवसांची इच्छा होती. मी त्यांच्या घरी गेले व विचारले, 'मला शिरडीला जायचे फार दिवस मनात आहे. पण जाणे काही होत नाही. तर केव्हा जाण्याचा योग येईल!' त्यांनी मला प्रसाद म्हणून एक फळ खावयाला दिले. ते आम्ही

सर्वांनी खाल्ले. नंतर ते म्हणाले, ' एक दीड महिन्यात तुम्ही शिरडीला जाल. ' मी म्हटले, ' ते शक्यच नाही. खर्चाच्या दृष्टीने मला जमणार नाही ' नंतर ते म्हणाले, ' पाच गुरुवारी पिठले भाकरी करून कुत्र्याला घाला व मग आपण स्वतः जेवा ' आणि खरोखर काय आश्चर्य ! पाच गुरुवारी मी पिठले भाकरी करून कुत्र्याला घातली आणि ' सहावा ' गुरुवार माझा शिरडीतच झाला. हे असे कसे घडले ? तत्पूर्वी १५ दिवस अगोदर माझ्या बहिणीचे पत्र आले की आम्ही शिरडीला जात आहोत व तुला पण नेणार आहोत. तर तू येशील का ? त्यावेळी माझी एखादेवेळी महिन्याची अडचण येईल म्हणून मी निरोप पाठवला, जमले तर येईन, श्रीसाईबाबांची इच्छा ! आणि खरोखरच तारखेअगोदर माझी अडचण निभावून मला वर सांगितल्याप्रमाणे शिरडीस जाण्याचा योग आला. आणि शिरडीला प्रथम जाऊन आल्यावर शिरडीच्या साई-बाबांचे वेडच लागले. शिवाय स्तवनमंजिरी, साईमहात्म्य वाचणे, आरत्या म्हणणे हे चालू केले. आता सुद्धा मी कोणत्याही प्रसंगाला श्रीगणपती, श्रीसाईबाबा व श्रीदत्त गुरु यानांच हाक मारुन त्यांच्याजवळ शरणांगती मागून माझे काम करीत असते. ' शरणांगताला बाबा कधीही अंतर देणार नाहीत ' असा माझा अजुनपर्यंतच्या अनु-भवांवरून दृढ विश्वास आहे. विशेष सांगायचे म्हणजे माझ्या पाच मुली व मुलगा देखील साईभक्ती करतात आणि त्यांना पण साई हाकेला धावतात व आपली कामे चांगली होतात यावर पूर्ण विश्वास आहे.

हे सर्व लिहिताना एक सांगायचे राहिले. माझ्या मुलाचा मुलगा ' अक्षय ' ४ वर्षांचा आहे. तो घरातील सर्व आरत्या वगैरे ऐकतच असतो. तो मला म्हणतो, ' बा, मी मोठा झालोना की तुला माझ्या ' कारमधून ' शिरडीला नेईन. तू मरू नको हां ' तेव्हा मी, माझा मुलगा, सून सगळेजण खोखो हसलो.

' सद्गुरु साईनाथांना वंदन करून सांगते,
' करी जो साईभक्ती, त्याला तारी साईशक्ती. '

# साईबाबांची लीला

—श्री. रमेश धोंडीबा शेलार
स. नं. ८, नवी खडकी
येरवडा—पुणे—६

● श्री साईबाबांचे कृपेने माझी पत्नी सुखरूप बाळंतीण होऊन सुंदर मुलगी झाली. ( दि. २ जून ८२ ) मुलगी दिवसभर खेळत असे व रात्रीचे वेळी एकसारखी तासभर न थांबता रडणे सुरू करी. रात्रभर तिच्या रडण्याने सर्वांनाच जागावे लागत असे.

गुरुवारचा दिवस होता. त्या दिवशी मुलीस सर्दी पडसे झाल्याने बरे वाटत नव्हते व ती दिवसभर रडत होती. मी कामाहून घरी आल्यानंतर माझ्या पत्नीने मुलीसाठी साईबाबांची उदी मागितली; परंतु मी दुर्लक्ष करून बाहेर निघून गेलो व त्याचक्षणी एक चमत्कार घडला.

मुलीस झोपविण्यासाठी पलंगाला उपरणे बांधून झोका केलेला होता व पत्नी मुलीला झोक्यात टाकून झोका देत होती. त्याचक्षणी एकाएकी उपरणे फाटले गेले. व त्यामधून मुलगी जोरात फेकली गेली. हे पाहून पत्नी घाबरली व जोराने ओरडली. पाहिले तर आमची ही १५ दिवसाची मुलगी जोरात खाली पडून रडण्याऐवजी हसत राहिली. तिला अजिबात लागले नाही. आजारी असताना देखील ती हसून खेळू लागली.

नंतर मी घरी आल्यावर मला सर्व हकीकत समजली. मी बाबांचे फोटोची पूजा केली व मुलीस उदी लावली.

केवळ साईबाबांची लीला म्हणून आमच्या मुलीवरचे संकट गेले.
जर केले साईबाबांचे नित्य नामस्मरण।
तर दुःख-संकटांचे होईल निवारण॥

# बाबांमुळे गाडीचे रिझर्व्हेशन मिळाले

—सौ. विनोदिनी मा. राजपूत
२०३, लेक पॅलेस, मरोल व्हिलेज,
अंधेरी ( पूर्व ) मुंबई ५९

● मी आज ६ वर्षे श्री साईबाबांची भक्ती करते. ती सुद्धा अगदी मनापासून त्यांची उदीची पुडी, त्यांचा रंगीत एक छोटा फोटो व हातात एक त्यांचीच अंगठी. हे तीघेही माझे संरक्षक !

आम्ही १ जून ८२ ला डीलक्स ( एअर कंडिशन्ड ) गाडीने दिल्लीला गेलो. १ जूनचे तर आम्हाला रिझर्व्हेशन मिळाले होते. ज्यावेळेला १ जूनचे रिझर्व्हेशन केले होते त्याचवेळेला बॉम्बे सेंट्रलवरून टेलेक्सने अमृतसरला कळविले होते. १६ जूनच्या डीलक्सचे रिझर्व्हेशन ३ बर्थ हवेत. आम्ही पानिपत, सिमला वगैरे फिरून १६ जूनला दुपारी १२ वाजता दिल्ली स्टेशनला येऊन बसलो. मी, माझे मिस्टर, सासरे व ४ वर्षाचा मुलगा. आम्ही जी टेलेक्स पाठविली होती ती अजून १६ जून-पर्यंत अमृतसर व दिल्लीला पोचली नव्हती. ३॥ ला गाडी डिलक्स प्लॅटफॉर्मवर लागत होती. माझे मिस्टर खूपच तापट ! मी ७ महिन्याची पोटाशीबाई ! माझा बंडखोर मुलगा ! व ७० वर्षाचे म्हातारे सासरे ! माझ्या मिस्टरांनी ३॥ वाजेपर्यंत वाट बघीतली. रिझर्व्हेशन मिळतं का ते ! मग शेवटी एका चालू डब्यात पैसे घेऊन जागा देणारा गुंड त्यांनी पाहिला, व त्याला २५ रु. ठरवून जागा आम्हाला त्यांनी मिळवून घ्यायची ! सासऱ्यानी पण मिस्टरांना खूप समजावले. आपण मुंबईला चालू डब्यात कसे जाणार ? पण माझे मिस्टर काय ऐकणार ? मी मनातल्या मनात बाबांचा धावा चालू केला. माझ्या मिस्टरांना चांगली बुध्दी द्या ! व चालू डब्यात न चढण्याची शक्ती द्या. रिझर्व्हेशन डब्यात चढण्याची बुध्दी द्या ! ( आमचा वेटिंग लिस्टवर १११ नं. होता म्हणजे आम्हाला आशाच नव्हती ) ३॥ ला गाडी लागली, व मी धावा करीतच होते आम्हाला ३ बर्थ पण द्या. मिस्टर आले व बाबांच्या कृपेने म्हणा त्यांनी त्या गुंडाला सांगितले. आमचे तिकिट कन्फर्म झाले. तो म्हणाला बरं ! आम्ही रिझर्व्हेशन डब्यात आलो. माझा अजूनही विश्वास नव्हता. डब्यात आलो तरी खरं वाटेना. व चटकन् मिस्टर म्हणाले. बघतेस काय ५७, ६४, ६३ हे बर्थ व सीट आपल्याला मिळाले आहेत. मी इतकी आनंदी झाले. मुख्य म्हणजे मी अवघडलेली, पाय भर-लेले अशा अवस्थेत चालू डब्यातले संकट साईबाबांच्या कृपेने ते टळले. आणि

सर्व आरामात झोपून मुंबईला परत आलो. नाहीतर माझी अवस्था काय झाली असती ह्याची कल्पनाच न केलेली बरी !

शेवटी ते रिझर्व्हेशन बर्थ आम्हाला कसे काय मिळाले ? ते साईबाबांच्या कृपेनेच ! मला असेच संकटात साईबाबा मदत करीत असतात. अशा त्या बाबांची मुलगी आहे हा मला खूप अभिमान वाटतो. माझ्या बाबांना माझे लाख लाख नमस्कार !

# बाबांच्या अंगठीमुळे प्राण वाचले

—श्री. रमेश रामराव बाबरे
गांधी रोड, डहाणु
जि. ठाणे ४०१६०१

'जरी हे शरीर गेलो मी टाकून । तरी मी धावेन भक्तांसाठी ।।'

● केवळ वचनपूर्तीकरिता हा अनुभव पाठवीत आहे. ता. २५-१०-७२ ची दुपार वेळ होती. शिपींग कॉरपोरेशनच्या 'नेताजी सुभाषचंद्र बोस' ह्या ऑइल टॅंकरवरून मी सुमारे ५० फूट उंचीवरून भर समुद्रात पडलो. माझ्या हातात साईबाबांची अंगठी होती. मी पाण्यात बुडणार इतक्यात बोटीवरून सोडलेल्या लाइफ जॅकेटच्या दोरीत ती अंगठी अडकली. त्या कारणाने माझा प्राण वाचला. ह्या दुर्घटनेत माझा डावा पाय निकामी झाला. दोन तीन वर्षे अशी गेल्यावर डॉक्टरांनी काठीचे मदतीने चालण्याची परवानगी दिली. पण ज्या अंगठीने माझे प्राण वाचले ती हातातून हरवली होती. हॉस्पिटलमधून निघताना मी नवस केला की बाबा माझ्या पायाने चालता होईन व शिर्डीला आपले दर्शन घेऊन मगच अंगठी वापरीन.

अपूर्व योगायोग फेब्रुवारी १९८० मध्ये सुमारे चार वर्षांनी संपूर्ण बरा झालो. शिरडीस जाऊन बाबांचे दर्शन घेतले व अंगठी वापरण्यास सुरवात केली. आता मी लहान अंतर चालू शकतो. पण माझे हातात श्रीसाईंची अंगठी नसती तर माझे प्राण वाचले असते का ? हा प्रश्न मनात आला की अंगावर रोमांच उभे राहतात.

अनेकांचे अनुभवापेक्षा हा अनुभव फारच रोमांचकारी आहे.

ह्या वरून वरील वचनाची प्रचीती येते. बाबांची कृपा अशीच राहो ही प्रार्थना.

३६८

# पाठीराखे बाबाच !

—सौ. शोभा सुं. पंडित
प्रभा–स्मृती भाऊ दाजी रोड,
माटुंगा मुं. ४०० ०१९

● आमची कुलदेवता श्री शांतादुर्गा असली तरी इतर देवादिकांचे फोटोही घरात आहेत. बाबांचा फोटो तर आहेच, शिवाय आशिर्वादाचा हात व त्यावरील असलेले आशेचे किरण अशा पोझमधील कॅलेंडर १९८० चे पण आहे. नित्याचा नमस्कार करण्यापलीकडे माझी बाबांवर श्रद्धा नव्हती. परंतु १९८० च्या १२ जाने. ला असा एक प्रसंग घडला व तेव्हापासून मी बाबांची झाले. त्याचे असे झाले.

माझा मोठा मुलगा चि. मयूर १५ वर्षाचा होता. तो एस. एस. सी. ला बसला होता. त्याची पूर्व परिक्षा १४ ता. सोम. पासून सुरू होणार होती. त्याच्या आदले दिवशी रवि. १३ ता. ला दुपारी तो अभ्यास करीत बसला होता. बाजूला माझे शिवणाचे सामान होते. त्यातील एक टाचणी (एका बाजूला मणी व दुसरी बाजू सुईचे टोक) चाळा म्हणून त्याने उचलून मणीची बाजू तोंडात धरून तो वाचत होता. मी झोपले होते. मध्येच तो बाथरुमला जाऊन आला. तेव्हा त्याच्या लक्षात आले की, ती टाचणी कुठेच दिसत नाही. मग आम्ही रागावल्यावर, धावाधाव केल्यावर, शोधल्यावर समजले की नकळतच ती तोंडातून गिळली गेली. मला ब्रह्मांड आठवले. एवढा मोठा मुलगा, उद्या परिक्षा आणि आता पुढे !

तावडतोब माझ्या डॉ. असलेल्या चुलत दीराला फोन केला. त्याने केळी खायला सांगितले, व लगेच एक्सरे काढायला सांगितले. रविवार असून सर्व सोय झाली. रात्री एक्सरे मध्ये ती टाचणी तिरकी ओटी पोटाकडे असलेली आढळली. डॉ. नी सांगितले की उद्या सकाळी पहिल्यांदा शौचास झाल्यावर आढळेल, नाही तर मात्र विचार करावा लागेल.

रात्रभर आम्ही बेचैन होतो सकाळी जेव्हा तो प्रथम शौचास जाऊन आला तेव्हा टाचणी काही बाहेर आलीच नव्हती. थोड्या वेळाने त्याच्या पोटात दुखू लागले. तेव्हा मी अतिशय घाबरले. परत जेव्हा तो संडासात जाऊ लागला, तेव्हा मी देवखोलीत गेले. श्रीशांतादुर्गेला नमस्कार केला, व खोलीतून बाहेर पडताना भिंतीवर

असलेले बाबांचे कॅलेंडर दिसले. जणू काही बाबा माझ्याकडे बघून हसत होते. मी जवळ गेले. आणि मनातल्या मनात रडत अक्षरशः बाबांना म्हणाले, तुम्ही म्हणे चमत्कार करून दाखविले आहेत व अजून दाखविता, तर तुमच्या त्या तळहातावर जे मला आशेचे किरण दिसत आहेत त्यातून ती टांचणी दाखवा. तर मी पण तुमची भक्ति करीन एवढे बोलून खोलीच्या बाहेर पाऊल घालते न घालते तोच मयूर ओरडला, आई पिन मिळाली. तेव्हा उलट्यापावली परतले व आनंदाने रडत बाबांना नमस्कार करून प्रथम रागावून बोलल्या बद्दल माफी मागितली. असे त्यांनी संकटातून सोडविले.

'नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य, नित्य घ्या प्रचीत अनुभवे' हे बाबांनी सिद्ध करून दाखविले.

तसेच १९८१ च्या ऑक्टो. मध्ये संपामुळे ह्यांची कंपनी दहा महिने बंद होती त्या संपकाळात आमची आर्थिक स्थिती फार खालावली होती. तरीही त्या परिस्थितीत बाबांवरील श्रध्देमुळे आम्ही तरून गेलो.

नंतर १९८२ च्या डिसें. मध्ये आम्ही उटीला गेलो होतो. एवढे सुंदर थंड हवेचे ठिकाण असून माझी मात्र तेथे प्रकृति बिघडली. डिसेंट्री झाली होती. आमच्या आनंदावर विरजण पडले. परत मुंबईला परतायचे काय असे ठरवित होतो. शेवटी ह्यांनी डिसेंट्रीवरच्या एकदम स्ट्राँग टॅब्लेटस् आणल्या. त्याचा निदान ५/६ दिवसतरी कोर्स करावयास पाहिजे. त्यातील एक गोळी घेतल्यावर माझ्याजवळ सदैव असलेली बाबांच्या उदीची आठवण झाली. मी ग्लासभर पाण्यात उदी टाकून घोट घोटभर ह्याचे पाणी बाबांना नमस्कार करून घेऊ लागले. आश्चर्य म्हणजे दोन दिवसात मी चांगलीच बरी झाले. चौथ्या दिवशी खायला प्यायला लागले. चांगले मांसाहारी, तिखट पदार्थ खाऊ लागले. तेव्हा मी मनात बोलले होते की, मी जर ह्या उदीच्या पाण्यामुळे बरी झाले तर एक वर्षात लेख साईलीलेत देईन. ह्यांना मूतखड्याचा विकार आहे. मध्यंतरी जेव्हा मध्यरात्री अटॅक आला तेव्हा उदीचेच पाणी रात्रभर दिले. त्यामुळे मध्यरात्री डॉक्टरना बोलवायचे ते सकाळी बोलाविले. कारण बाबांना सांगितलेच होते की ४/५ तास तरी 'उदी' ने दुखणे थांबू दे. रात्रीची टॅक्सी मिळत नाही. तेव्हा पहाटेपर्यंत दुखणे थांबवा. त्याप्रमाणे बाबांनी मनासारखेच केले. असे कितीतरी लहानमोठे अनुभव आले व अजून येतात, व बाबाच सुटका करतात. आता मी लोकांना पण उदीचेच औषध सांगते. असे आहेत बाबा सदैव भक्तांच्या पाठीमागे रहाणारे व त्यांची काळजी घेणारे.

☆

# श्री साई समर्थ

—श्री. भालचंद्र पोटकुळे
आनंद, कोळीवाडा, मुंब्रा, ठाणे

● डिसेंबर ८१ मध्ये मुर्तिजापूरच्या परमहंस पुंडलिक महाराजांची सोमवार यात्रा करून मी परतलो. इकडे आल्यानंतर दुसऱ्या दिवशीच रात्री १२ नंतर माझी तब्बेत अचानक बिघडली. मला खुप वांत्या झाल्या. पोटातील अन्न-पाणी संपल्यानंतर अक्षरशः तोंडावाटे रक्त पडू लागले. मी शुध्दीवर असेपर्यंत मोरीत जात असे. परंतु तासा–दिडतासाने बेशुद्ध होऊन बिछान्यातच मृत्यूच्या यातना सहन करू लागलो. सकाळी ९ वाजता आमच्या शेजाऱ्यांना चाहूल लागून त्यांनी डॉ. शहा यांना ट्रीट-मेंटसाठी घरीच बोलावले. इंजक्शने, औषध देऊन मी दुपारी ११–३० वाजता शुद्धीवर आलो. दोन वाजता शेजारच्या वहिनींनी जेवण आणले. दोन घास खाल्या-नंतर परत अस्वस्थ झालो. तावडतोब औषध घेऊन जरा हायसे वाटले. परंतु रात्री १० नंतर माझी चक्रे पुन्हा उलट फिरू लागली. शेवटी डॉ. साहिल सिंघ यांची ट्रीटमेंट घेऊन त्यांनी सांगितले की ही केस आमच्या हातात येण्यासारखी नाही. लवकरात लवकर ठाण्याला डॉ. कारखानीसकडे जा. त्याप्रमाणे त्यांनी चिठ्ठी दिली.

माझे काका, मित्र परिवार ह्या मंडळींनी मला रात्री ११ वाजता मुंब्र्याहून रिक्षा करून ठाण्याला डॉ. कारखानिसांकडे आणले, ॲडमिट केले. रात्री १० नंतर माझ्या सर्व हालचाली बेशुद्धावस्थेत झाल्या. साधारण १० टक्के शुद्ध असेल. ज्या वेळेला माझी कॉटवर बॉडी ट्रीटमेंट चाललेली होती. तेव्हा अचानक भय, चिंता कमी झाल्यासारखे वाटले, आणि खरोखर डोक्याच्यावर भिंतीला एक श्री साईबाबांची आशिर्वादरुपी सुंदर तसबिर दिसली. मला आश्चर्य वाटून मी बडबडलो, अरे...! साईबाबा...बाबा....बाबा.

तेथून मला दुसरीकडे हलविण्यात आले. उपचार वगैरे होऊन सकाळी ७ वाजता मी इतका बरा झालो की, अरे हे काय ! स्वप्नात तर नाही ना.. ! जवळच माझा भाऊ बसलेला होता. त्याला म्हणालो. ठाण्याला आणलेस खरे पण मला इथेच का ठेवले ! मी तर पूर्ण बरा आहे. भावाने दुध आणल्यानंतर मी घेतले आणि खूप उत्साह वाटू लागला. चला...घरी चला. मी खूप घाई करू लागलो. दुपारी १२ वाजता डॉ. नी सोडले. घरी आल्यानंतर पूर्वीसारखा ठणठणीत बरा झालो. फक्त १५ दिवस डॉ. ची पथ्ये आणि औषध घेतली इतकेच.

माझ्या एकाकी आजारामुळे सर्वांनाच वाईट वाटले. मित्र मंडळी खूपच नाराज होती, हळहळ करत होते. धीर धरून मी म्हणायचो. अहो ज्याला साई तारतो त्याला कोण मारू शकतो.

आता माझी तब्बेत साई कृपेने खूपच बरी आहे. नव्हे पूर्वीपेक्षा माझ्यात खूपच बदल होऊन वजन सुद्धा वाढले. स्वानुभवावरून खरोखर श्रीसाई समर्थ आहेत. विश्वाच्या प्रत्येक अणुरेणूत ज्याचं अस्तित्व आहे, भूतमात्रात ज्याचे वास्तव्य आहे. अशा सर्व साक्षी परमेश्वरास ( श्री साईबाबांस ) काय अशक्य आहे ! म्हणूनच,

बाबा सद्‌गुरु साई, समर्थ ।
जय जय साई, समर्थ ॥

• • •

# ती जोत जागृत आहे

—श्री. वीरागानंद सरस्वती
१४४ जठार बंगला दहिसर ( पश्चिम )
मुंबई ६८

[ साई साधना आणि शिकवणूक ग्रंथामधून ]

● पुष्कळशे देव व संत त्या त्या युगात होऊन गेले. त्यांची नावे व इतिहास राहून गेली पण श्री साईबाबांचे जीवन पूर्वाध्याय व उत्तर अध्याय फार मोठा आश्चर्यकारक व अनुभवही आज देणारा आहे.

आजही साईबाबांचा अनुभव त्यांच्या हयातीसारखा भक्तांना येतो.
देवापेक्षा कलीयुगात सद्‌गुरु आज श्रेष्ठ आहेत. माऊली ती खरीच.

मी स्वतः जरा जराजर्जर झालों असताना बाबांना गाऱ्हाणे गाईले. 'बाबा माझा लोळागोळा झाला आहे. चालता येत नाही. बी. पी. २८० पर्यंत पोहचले आहे. बारीक ताप आहे. डोके भणभणते. बुद्धी चालत नाही. कृपया मरेपर्यंत तुझी भक्ती करावयास, प्रवचन करण्यास, प्रचार करण्यास शक्ती दे. पूर्ण गुण रोज बाबांची विभूती पाण्यात घेऊन आला आहे. म्हणून हा कृतज्ञ पूर्वक प्रणाम. भक्तांची बाबा कशी काळजी घेतात ह्याची ही सत्यकथा.

# पोथी वाचून दर्शन झाले

—सौ. मंगला शु.
५३/बी सिंधीकॉलनी, उज्जैन (म

● संकटाच्या क्षणी आर्त हाक मारली असता 'श्रीसाईबाबा' धावून कशाही प्रकारचे संकट असले तरी ते दूर करतात असा अनुभव सर्वच भक्त परंतु आनंदाच्या वेळीही लडिवाळ हट्ट केले तर बाबा ते पुरवतात अ अनुभव आहे.

दरवेळे प्रमाणे एकदा मी एक अध्याय रोज वाचून 'श्रीसाई सच्चरित' संपूर्ण करण्याचे ठरविले व ते प्रारंभ करण्यापूर्वी बाबांच्या जवळ प्रार्थना केली की 'ही पोथी माझ्या कडून संपूर्ण करवून घ्या व ती पूर्ण होई पर्यंतच्या मुदतीत कशाही प्रकारे कशाही रुपात मला दर्शन द्या, तसे तर आपण कणाकणात व्यापून आहांत परंतु म्या पामराला जाणवेल अशा रुपात दर्शन द्या.'

पोथी संपूर्ण झाली परंतु दर्शन लाभ झाला नाही. अवतरणीकावाला अध्याय वाचून झाल्यावर पोथी संपूर्ण झाल्याचा आनंद मनात असताही उदास वाटू लागले. तशाच अवस्थेत आटा भिजवून पोळया करण्यास सुरुवात केली एक पोळी भाजून झाल्यावर अचानक दारावर 'झांज' वाजल्याचा आवाज मोठ्याने येवू लागला व बरोबर मानवीय आवाजही. साईबाबा आलेऽऽ. माझी विचित्र मनःस्थिती झाली. चटकन् गॅस बंद करून दार उघडून बघितले तर एक फकीर झांजा वाजवून बाबांचा गजर करीत होता त्याने गळयात बाबांचा मोठा फोटो घातला होता. फोटोतील बाबांचे डोळे हसून जणू विचारत होते 'पटला का विश्वास' माझे मन एकदम गहिवरून आले व आनंदाच्या सागरात बुडाले. दोन क्षण 'किं कर्तव्य विमूढ' अवस्थेत गेल्यावर मी नुकतीच बनवलेली गरम पोळी तूप लावून बाबांच्या हातावर ठेवली व माघारी वळले. माघारी वळल्यावर 'केलेल्या पेक्षा जास्त काही करावयास हवे होते' असा विचार मनात आला. पुनः जावून बघितले तर तेथे कोणीही नव्हते. त्या प्रसंगाच्या नंतर किंवा त्याच्या आधी कधीही अशा प्रकारच्या फकीरास मी बघितले नाही. असा बालहट्ट पुरविणाऱ्या साई माउलीस शतशः प्रणाम.

# श्री साईबाबा माझ्याकडे रक्षाबंधनाला आले

—लीलाताई गोलतकर
अभंग बिल्डिंग, परळ व्हिलेज, मुंबई

● बुधवार दिनांक ४ रोजी नारळीपौर्णिमा होती. त्या दिवशी रक्षाबंधन होतं. बहीण भावाच्या हातात राखी बांधते. मी बाबांना हात जोडून म्हटलं. बाबा, रक्षाबंधनाला या...माझी खात्री होतीच. बाबा कसेही येणारच म्हणून. मी वाट पहात होते. सकाळी ८-३० वाजता सर्व देवांना राखी बांधायला घेतली इतक्यात ९ वाजता पोष्टमनने दार ठोकले, आणि हातात साईलीला मासिकाचा अंक दिला. इतक्यात माझे जिथे देव आहेत, त्यादिशेकडून कलाबुतीच्या फुलांचा वर्षाव मी ज्या ठिकाणी अंक हातात घेत होते, तिथपर्यंत एखाद्या ज्योतीप्रमाणे आला. माझे डोळे चमकले. आनंद झाला मला बाबा आले म्हणून रक्षाबंधनाला. बाबांनी म्हटलेच आहे. माझे छायारुप म्हणजे प्रत्यक्ष मीच आहे. परंतु चांदीसारखा फुलांचा वर्षाव होणे म्हणजे मनाला आश्चर्याचा धक्का बसतो. पण बाबांची लीला अगाध आहे. ह्यातली एक उडालेली चांदीची पाकळी मी माझ्या हातात पकडली कारण राखी बांधल्यानंतर भाऊबहीणीला प्रेमाची भेट काही तरी देत असतो. मला एकदम बाबांच्या वचनाची आठवण झाली....

नित्य मी जीवंत जाणा हेची सत्य ।
नित्य ध्या प्रचित अनुभवे ।।

माझे डोळे पाणावले आणि ह्या साईलीला अंकालाच मी राखी बांधली...माझा आनंद गगनात मावेनासा झाला....आणि संध्याकाळी माझ्या सारख्याच बाबांच्या बहीणीची राखी बांधायला रीघ लागली....माझे एक भाऊ विलास पडवळ साईभक्त आहेत ते माझ्याकडे राखी बांधून घ्यायला आले होते ते म्हणाले, ताई आज इथे वेगळच काही तरी वाटतं. मी म्हणाले हो, आज रक्षाबंधन आहेना...

★

# तुमचा मी भार वाहीन सर्वथा।
# नव्हे हे अन्यथा वचन माझे ।।

—सौ. शशिकला रा. रेवणकर
कुंटोली, अंबरनाथ

● नुकतीच सातव्या लेखक-कवी संमेलनाहून येवून १०–१५ दिवस झालेले. अन् अचानकच माझा छोटा चि. मनोज डिसेंन्ट्रीच्या आजाराने अत्यंत सिरियस झाल्याने डोंबीवलीला डॉ. आचार्य यांच्या हॉस्पीटलमध्ये त्याला ॲडमीट केले. तो ४–५ दिवसा नंतर बरा झाला म्हणून डिसचार्ज घेऊन त्याला घरी आणले. परत तिसऱ्या दिवशी त्याची तब्बेत बिघडली म्हणून पुन्हा ॲडमीट केले. पण तेव्हा डॉ. आचार्य नव्हते. ८–१० दिवसांच्या रजेवर बाहेरगावी गेलेले त्यांचे असि. डॉ. मराठे होते. त्यांनी मनोजवर व्यवस्थित ट्रिटमेंट चालू ठेवली होती. ४–५ दिवसानंतर मनोजला थोडं फार बरे वाटायला लागले अन् अचानकच काही अपरिहार्य कारणाने डॉ. मराठेही बाहेरगावी गेले. त्याच्या दुसऱ्याच दिवशी बुधवार होता. मनोजही बरा आहे म्हणून मी घरी अंबरनाथला जावून येते म्हणून सिस्टरना सांगून व माझ्या मोठ्या मुलाला चि. दिपकला, मनोज जवळ बसवून घरी गेले. अन् ३–४ तासानंतर लगेच परत आले, अन् पाहते तर मनोज सलाईनवर बेशुद्धावस्थेत होता. मी घरी गेल्यानंतर त्याला खूपच जुलाब वांत्या झाल्याने सलाईन लावले होते. त्याला पाहताच मला एकदम धस्स् झालं. कारण डॉ. आचार्यही नव्हते. आमची पुरी श्रद्धा-विश्वास डॉ. आचार्य यांच्यावर होती. अन् तेच अशा संकटकाळी नाहीत आणि आता आम्ही कोणाकडे अन् कुठे जावे. शिवाय डोंबिवलीतील इतर डॉ. च्या बद्दल काहीच माहिती ही नव्हती त्यामुळे आम्ही उभयता खूपच घाबरलो. त्याच दिवशी सकाळी माझा भाऊ चि. सुभाष चेंदवणकर हा मनोजला पाहण्यास आलेला. त्याने सांगितलेले तसे काही कमी जास्त झाल्यास मला फोनने कळव आपण मुंबईला नेवून डॉ. मर्चंटना दाखवू. त्यामुळे फोनने त्याला कळवावे किंवा काय हाच विचार करत होते. एवढ्यात कल्याणच्या डॉ. आचार्यांच्याच हॉस्पिटलच्या असि. डॉ. निकतेबाई ह्यांनी फोनवरून मनोजला डॉ. राव यांचेकडे नेण्यास आपल्या सिस्टरना कळवले. त्याप्रमाणे जायचे ठरवले पण डॉ. राव यांचे बद्दल काहीच माहिती नसल्याने ते मनोजला बरे करतील की नाही हीच शंका सारखी वाटत होती. एवढ्यात माझ्या मैत्रिणीचे यजमान श्री.

रमेश नागोटकर हे आले. व ते म्हणाले, डॉ. राव चांगले डोंबिवलीतील फेमस डॉ. आहेत. ते नक्कीच मनोजला बरे करतील तुम्ही घावरू नका. पण काय म्हणतात ना ! 'जे न चिंती वैरी, ते ते चिंती मनी' तसंच मनात अनेक विचार येत होते. अन् कोणी काही काही भयानकच सांगत होते. तशातच आम्ही डॉ. राव हॉस्पिटल मध्ये गेलो. मनातून सारखा बाबांचाच धावा चालला होता. बाबा तुम्हीच आता माझ्या मनोजला वाचवू शकाल ! डॉ. रावनी मनोजला सर्व व्यवस्थित तपासले, व ते अचानकच माझ्याशी कोकणीत बोलू लागले की काही घाबरु नकोस उद्यापर्यंत तो ठीक होईल. मला एकदमच डॉ. रावांच्या ठिकाणी साईबाबाच बोलत असल्याचा भास झाला. अन् हिम्मतही आली. नंतर त्यांनी मनोजला औषधेही बदलून दिली व परत हॉस्पीटलमध्ये आणून सलाईन लावले. नंतर २–३ तासांनी रात्री १० च्या दरम्यान मनोजला खूपच जास्त त्रास होवू लागला व तो खूप रडू लागला. त्याचे सलाईनही चढेनासे झाले. अजून भिती वाटू लागली सिस्टरही घाबरून गेल्या व परत डॉ. ना फोन करण्यास गेल्या तेवढ्यात कसं काय समजेना माझ्या डोळ्यावर झोपेची झापड आली, व समोरच एक दाढीवाला म्हातारा (श्रीबाबा) मला सांगत होता. अग उद्या गुरुवार आहे. मनोज उद्या तुझ्याशी खेळू लागेल बघ. तू कशाला घाबरते. मी आहे ना ? असं सांगत असतानाच मी एकदम सिस्टरच्या आलेल्या आवाजाने भानावर आले. तर सिस्टर म्हणाल्या त्याचे सलाईनच आपण थोड्या वेळा पुरते काढून पाहू, वाटल्यास नंतर लावू म्हणून त्यांनी सलाईन काढले. मी ही मग मनोजला थोडीशी बाबांची उदी लावली, व सिस्टरना न सांगताच बाबांची उदी तिर्थ करून मनोजला पिण्यास दिली, व बाबांना परत परत मनोजला वांति जुलाब न होण्याबद्दल विनवले. नंतर थोड्या वेळांनी मनोज आरामशिर झोपी गेला. परत त्याला सकाळ पर्यंत जुलाब झालेच नाहीत व वांतीतर नाहीच नाही. सकाळी तर तो आरामशीर उठूनही बसला. त्याच्या तब्बेतीत खूप आराम पडला होता. संध्याकाळी तो माझ्याशी पत्तेही खेळू लागला. मला खुपखुप आनंद झाला. व बाबांच्या कृपावर्षावाने परत एकदा गहीवरून आले. त्यानंतर २–३ दिवसांनी आमचे डॉ. आचार्य आले. त्यांनी त्याला तपासून आता काही काळजी करण्यासारखे नसल्याचे सांगून ५–६ दिवसानंतर पूर्ण बरा झाल्यानंतर डिसचार्ज दिला. मनोज श्रीसाईबाबांच्या कृपेनेच वाचला व पूर्वीसारखा हसता खेळता झाला. अशीच श्रीसाईची कृपा आम्हाप्रमाणे सर्वांवर निरंतर राहो, हीच साई चरणी प्रार्थना !

# श्रद्धेचे फळ

372

—कु. नीता प्रभाकर शानभाग
लक्ष्मी निवास, महागिरी ठाणे

● सव्वीस जानेवारी १९८९ हा दिवस मी कधीच विसरणार नाही. त्या दिवशी आमच्या घरी सत्यनारायणाची पूजा होती. दुपारी टी. व्ही. वर 'हम दोनों' हा चित्रपट होता. चित्रपट चालू असताना मला हुडहुडी भरून ताप आला. संध्याकाळ-पर्यंत ताप जरा उतरला त्यामुळे डॉक्टरांकडे जाण्याची आवश्यकता वाटली नाही. परंतु रात्री पुन्हा ताप चढला. दुसऱ्या दिवशी आमच्या फॅमिली डॉक्टरांकडे गेले. आणि दोन दिवसांचे औषध घेऊन आले. कारण आमचे फॅमिली डॉक्टर त्यानंतर चार ते पाच दिवस बाहेरगावी जाणार होते म्हणून त्यांनी दवाखान्यात दुसरे डॉक्टर नेमले होते. त्यांची औषधे लागू पडेनात.

सुरुवातीला हा साधा ताप म्हणून उपचार झाले. नंतर मलेरिया असेल म्हणून औषधे सुरू झाली. परंतु ताप काही उतरण्याचे लक्षणच दिसेना. तो नेहमीच्या वेळी म्हणजे साधारण संध्याकाळी चढायचा तो रात्री पुन्हा उतरायचा. पण दिवसभर ताप अजिबात नसे.

असेच सात-आठ दिवस गेले. नंतर मुंबईच्या एका स्त्री डॉक्टरांना प्रकृती दाखविली. त्यावर त्यांनी पॅराटायफॉइड असल्याचे निदान केले. ते कळताच माझे असलेले धैर्यही गळाले. गेल्या सतरा-अठरा वर्षात मला असा आजार झालेला नव्हता. आणि मी जवळजवळ एक महिना बिछान्यावर होते. फेब्रुवारी महिन्याच्या शेवटी माझी प्रिलिम परीक्षा होती आणि मी एफ. वाय. बी. कॉम या वर्गात असल्यामुळे विद्यापिठाची परीक्षा प्रथमच देणार होते. त्यातच एक एप्रिल ही अंतिम परीक्षेची तारीखसुद्धा निश्चित झाली होती. घरातील सर्व मला धीर देत होते. मी मनातून पूर्ण पणे धीर गाळून बसले होते. माझ्या मैत्रिणी कॉलेजमधल्या नोटस् मला आणून देत होत्या. मी त्या मला दिवसभर ताप नसल्यामुळे उतरवून घेत होते. त्यामुळे अतिशय थकवा येत होता.

पूर्णपणे ताप बरा झाल्यावर मी अतिशय मन लावून अभ्यास करत होते. संपूर्ण दिवस जवळजवळ रोजच कॉलेज लायब्ररीत बसून अपुरा राहिलेला अभ्यास पूर्ण करीत होते.

तरी मानसिक तणावामुळे प्रिलिम सुरू व्हायच्या दोन दिवस आधी पुन्हा ताप आला. त्यामुळे आता प्रिलिमला बसता येईल की नाही अशी शंका वाटू लागली. पण मी निर्धार करून पूर्ण परीक्षा दिली आणि त्यात पास झाले.

घरातील सर्वांनी मला सांगितले होते जेवढा जमेल तेवढाच अभ्यास कर. मी प्रिलिम परीक्षेत पास झाल्यामुळे मला स्वतःला आत्मविश्वास आला की मी अंतिम परीक्षेत पास होईन.

एक एप्रिलला परीक्षा सुरू झाली. मला तीन-चार पेपर्स कठीण गेले होते. अकाऊंटस आणि भूगोलसारखे विषय कठीण गेल्यामुळे मी पूर्ण घाबरून गेले आणि त्यातच भर म्हणून आमचे गणिताचे पेपर फुटल्यामुळे ती परीक्षा पुन्हा 'दोन मे'ला घेण्यात आली. आधीच्या पेपरपेक्षा नंतरचा पेपर कठीण गेल्यामुळे यावर्षी पास होणार नाही अशी खात्री झाली. तेव्हाच मी मनातल्या मनात म्हटले, 'जर मी यावर्षी पास झाले तर माझ्या श्रध्देचा अनुभव म्हणून मी साईलीला मासिकात देईन.' रिझल्ट ३१ जुलैला जाहीर झाला. पूर्ण पास असलेल्यांमध्ये माझा नंबर पाहून मला साईबाबांच्या कृपेची प्रचिती आली. कारण माझ्यापेक्षा हुशार मुली ए. टी. के. टी मध्ये पास झाल्या होत्या आणि मी मात्र पूर्ण पास होते. आजारामध्ये जवळजवळ सर्व अभ्यास विसरल्यात जमा झालेला होता त्यामुळे परीक्षेच्या आधी एक महिना जेवढा अभ्यास केला जातो त्यावरच मी पास झाले.

ही केवळ साईकृपाच म्हणावी लागेल की एवढी मोठी आपत्ती ऐन परीक्षेच्या वेळी येऊनसुद्धा त्यातून मी निभावून गेले.

घरातील लोकांनी मला सांगितले होते की तू परीक्षा दे, जो काही निकाल लागेल तो लागू देत, तुझे वर्ष फुकट घालवू नकोस. साईबाबा, काहीही वाईट करणार नाहीत. आलेल्या संकटातून चांगली वाट काढतील.

माझ्या रिझल्टच्या दिवशी मी सकाळी 'साईसच्चरित्' या पोथीतील अध्याय क्रमांक २९ वाचत होते त्यात पान ३९१ वरील प्रसंग वाचून माझ्या मनाला धीर आला. हा केवळ योगायोगच म्हणावा लागेल. साईंनी केवळ मला धीर देण्यासाठीच हा प्रसंग दृष्टोत्पतीस आणून दिला असावा,

अशीच साईंची कृपा माझ्यावर रहावी हीच साईचरणी प्रार्थना !
येथे साईवचनाची प्रचिती येते.

नवसासी माझी पावेल समाधी।
धरा दृढ बुध्दी माझ्या ठायीं ॥

# द्वारकामाईतील ताजा अनुभव

—श्री. सु. र. दळवी
विश्वमोहिनी, पंतनगर घाटकोपर

● मी मे महिन्याच्या १२ तारखेला शिर्डीस गेलो होतो माझ्या बरोबर माझे मोठे बंधु उनयतांसह आले होते. त्यांची पण पहिलीच वेळ असल्यामुळे त्यांना फारच आनंद झाला. माझ्या चार मुलांना व सौ. पत्नीस शिरडीस नेण्याची पहिलीच वेळ होती. माझी पत्नी नास्तीक भावनेची आहे. श्रीबाबांवर तर मुळीच श्रद्धा नाही. चार दिवसापूर्वी तिकीट बुकिंग केले होते. शिरडीला निघणार त्याच दिवशी सौ. पत्नीची कंबर व पाठीचा कणा जास्त दुखत होता. मी शिरडीला येत नाही तुम्ही सर्व जा असे सौ. पत्नीने सांगितले. मला द्वारकामाईतील श्रीबाबा ज्या खांबाला टेकून बसत त्या खांबाची आठवण झाली. मी सौ. पत्नीस सांगितले हा योग चांगला आहे. तू शिर्डीस पोहचल्यावर त्या खांबाला टेकून बस मग पाहू कणा कंबर दुखते काय? ठरल्या तारखेला आम्ही सर्व मंडळी शिरडीस निघालो व सुखरूप येवून शिरडीस पोहचलो श्रीबाबांचे दर्शन चांगल्या प्रकारे झाले. तो पर्यंत पत्नीची कंबर कणा दुखतच होता. द्वारकामाईतील बाबा ज्या खांबाला टेकून बसत तेथे टेकून सौ. पत्नीला बसण्यास सांगितले सतत दोन दिवस खांबाला टेकून ती बसत असे तिसऱ्या दिवशी कंबर व कणा साफ पूर्वी सारखा बरा झाला तो आज पर्यंत बरा आहे. त्यावेळी पासून आता सौ. पत्नीची श्रीसाईबाबांवर श्रद्धा बसली. तेव्हा अनेक नास्तीक माणसाना असेच आपल्या जवळ श्रीबाबांनी येण्याची बुद्धी द्यावी हिच प्रार्थना. साईबाबांना आम्हा कुटुंबीयांचे कोटी कोटी प्रणाम....

# पैसे मिळवून दिले बाबांनीच

—सौ. वायंगणकर
साईनिवास, रत्नागिरी

● पाप जयाचे विलया गेले, ऐसे जे पुण्यात्मे वहिले, तेचि माझे भजनी लागले, खुण लाधले ते माझी। साई साई नित्य म्हणाल सात समुद्र करीन न्याहाळाया बोला विश्वास ठेवाल पावाल कल्याण निश्चये ॥

श्री बाबा आपल्या वचनाप्रमाणे सतत आपल्या भक्तांच्या हाकेला धावतात. आपण त्यांना श्रद्धेने हाक मारावी मात्र. मग मनाला असे वाटते की येऊ देत किती संकटे आपणावर, घाबरण्याचे कारणच नाही. संकटाचे निरसन करणारी एक महान शक्ती साईरूपाने आपल्या सदैव पाठीशी आहे. आपण लीन होऊन त्या माऊलीचे कौतुक पहात रहावयाचे. श्रीबाबांविषयी आपणाला जर अनुभवच घ्यावयाचे म्हटले तर ते साई भक्तांना पावलोपावलीच येत असतात. त्यातील सांगावे किती आणि ठेवावे किती ! जेव्हा ते आम्हाला बुद्धी देतात तेव्हा मात्र बोलल्याशिवाय रहावत नाही, आणि संकटसमयी प्रार्थना केल्याशिवाय उपाय नाही.

त्यावेळी मी अशीच लीन होऊन बाबांना प्रार्थना करत होते. माझे मालक पोस्टात नोकरीला असल्यामुळे मी त्यांचे बरोबर पोस्टात रहात होते. दसऱ्याचे दिवस होते ते. आम्ही त्यावेळी साईलीलेचे पारायण सुरू केले होते. त्यांनीही मोठ्या आवडीने ऑफिसकाम आटोपून जेवढा वेळ मिळेल तेवढा तो ग्रंथ वाचण्यासाठी घेतला होता. अगदी आनंदी वातावरणात दोन दिवस गेले. तिसऱ्या दिवशी ऑफिसमध्ये त्यांच्या लक्षात आले की आपल्या कॅशमध्ये २०० रुपये कमी आहेत. पैसे गेले. शोधाशोध सुरू झाली. सर्व ऑफिसमधले लोक हिरमुसले झाले. माझेही मन उदास झाले. काहीच सुचेना. पण नंतर लक्षात आले की आज ३ दिवस बाबा आपलेच घरी आहेत. मी बाबांच्या ग्रंथासमोरील फोटोला प्रार्थना करत होते. बाबा तुम्ही सर्वसाक्षी आहात. गेलेले पैसे तुम्हीच मिळवून दिले पाहिजेत. माझी प्रार्थना बाबांनी ऐकली, व दुसऱ्याच दिवशी कोल्हापूरवरून आलेल्या बॅगेतून २०० रुपये परत पाठविण्यात आले होते ते मिळाले. पाचल नाव असल्यामुळे आपलेच ऑफिसचे पैसे समजून पाठविले एवढीच चिठी होती. सर्व आफिस स्टाफला आनंद झाला. जो तो बाबांच्या फोटोला नमस्कार करून सांगू लागला, बाबा आज तुम्हीच आम्हाला संकटातून तारलेत. मी

श्री बाबांना साष्टांग नमस्कार घातला. बाबा ही सर्व तुमचीच किमया आहे. अशीच तुमची कृपा आम्हा अनाथावर ठेवा.

★

# साईनामाने बाळाचे रडणे थांबले

—श्री. पि. एम. मिराशे
कनिष्ठ अभियंता बारूळ (कॅम्प)
ता. कंधार जि. नांदेड

● साईबाबांना भक्ताने अंतःकरणपूर्वक हाक मारल्यास ते कसे धाऊन येतात मग काम क्षुल्लक असो किंवा मोठे असो हे मला आलेल्या खालील सत्य अनुभवावरुन सिद्ध होते.

मी बारूळ येथील बस स्टॅंडवर एस. टी. ची वाट पहात बसलो होतो. प्रवासी बरेच होते. एका प्रवासी बाईचे लहान तान्हे मुल रडत होते. ती बाई मुलाचे रडणे थांबविण्यासाठी त्यास इकडून तिकडे घेऊन फिरवीत होती. समजावित होती व तान्ह्यास पाजविण्याचा प्रयत्नही करीत होती. परंतु ते छोटे मुल काही केल्या आपले रडणे थांबवित नव्हते. बाई व इतर प्रवासी, मुलाचे रडणे थांबावे म्हणून नाना प्रयत्न करीत होते परंतु १ तास होऊन गेला तरी त्या मुलाचे रडणे काही थांबेना मला सुद्धा त्या मुलाचे रडणे थांबत नसल्यामुळे दुःख वाटत होते. तोच माझ्या अंतःकरणात साई-बाबांची एकाएकी आठवण झाली. त्या मुलाचे रडणे थांबावे यासाठी मी बाबांकडे प्रार्थना करू लागलो व बाबांचे नामाचा जप मनातल्या मनात करू लागलो. साधारण २ मिनीटे झाली असतील इतक्यात एकदमच त्या बाळाचे रडणे थांबले. सर्व प्रवासी नवल करीत होते की तासापासून रडत असलेला बाळ एकाएकी रडण्याचे कां थांबला परंतु त्याचे जवळ त्यासाठी एकही उत्तर नव्हते. मला मात्र साईच्या कृपेची खात्री झाली व माझ्या डोळ्यातून आनंदाश्रू झीरपू लागले. किती कृपाळू माझी साईमाऊली. यावरून हेच सिद्ध होते की भक्ताने बाबास कुठेही कोणत्याही वेळी अंतःकरणातून प्रेमाने हाक दिल्यास ते भक्तावरील संकट निवारण्यास क्षणाचाही विलंब न लावता धाऊन येतात. तेव्हा साईभक्तानो तुमच्यावर आलेल्या संकटास न घाबरता साईबाबांचे नामस्मरण करा.

# साईचरणी मागावे ते मिळते

—कल्पना वि. शृंगारपुरे
वाल्मिकी निवास, धोबी आळी,
टेंभी नाका, ठाणे

● या धकाबुकी आणि धाईगर्दीच्या जगात प्रत्येकाच्या आयुष्यात संकटे वारंवार येतच असतात. काही संकटे मोठी असतात तर काही क्षुल्लक. पण अशा ह्या संकटाच्या वेळी माझ्या डोळ्यासमोर येते ती आपल्या साईबाबांची प्रसन्न चित्त मूर्ती. त्यांचे हसरे व बोलके डोळे जणू मला सांगत असतात, 'घाबरू नकोस मी तुझ्या पाठीशी सदैव उभा आहे.' आणि असा विचार मनात आला की त्या येणाऱ्या संकटाची भिती पार पळून जाते. खरंच बाबा माझ्याच नाही तर सर्वांच्याच मनात वास करीत असले पाहिजेत नाही तर त्यांना माझ्या मनातील प्रत्येक क्षुल्लक गोष्ट अथवा विचार कसे कळतात? साध्या क्षुल्लक संकटात सुद्धा मी बाबांनाच हाक मारते आणि सांगते, 'बाबा हे असं होऊ दे आणि खरंच त्याच क्षणी बाबा मला त्याची प्रचिती देतात.

साईबाबांजवळ आपण अगदी काहीही मागावे ते ते आपणास ते देतातच ह्याची मला खात्री पटली आहे. फक्त विश्वास व सबुरी मात्र हवीच. खरं म्हणजे आपण न मागताच आपल्या मनातील विचार ओळखून आपल्याला पाहिजे ते देतातच.

आता हेच पहा ना, जुलै १९८२ महिन्याच्या 'श्री साईलीला' अंकामध्ये असे होते की आपले बाबांच्या विषयीचे आलेले स्वानुभव दिवाळी अंकाकरिता २५ जुलै पर्यंत आमच्याकडे पाठवावेत त्याच्यानंतर आलेल्या अनुभव मजकूरांचा स्वीकार करणार नाही. हे मी वाचले व म्हटले की मी सुद्धा माझे अनुभव पाठवीन. पण आज लिहू उद्या लिहू करता करता २५ जुलै तारीख निघून गेली आणि मग माझ्या लक्षात आले की आता आपण पाठवले तरी ते स्वीकारणार नाही. त्यामुळे मी तशीच निराश मनाने गप्प बसले. पण माझ्या मनात येऊन ते बाबांना कळले नाही असं होईलच कसं? पाच सहा दिवसांनी ऑगस्ट १९८२ महिन्याचा 'श्री साईलीला' अंक घरी आला तो पाहिला आणि खरंच काय सांगू त्यात त्यांनी शेवटची अनुभव पाठविण्याची तारीख २५ जुलैच्या ऐवजी १५ ऑगस्ट केली होती म्हणून मी लगेच थोड्याच वेळात बाबांचे नाव घेऊन हा अनुभव लिहिला. खरंच त्यावेळी मला इतका आनंद झाला की मी तो वर्णन करूच शकणार नाही.

खरंच बाबांजवळ काहीही विश्वासाने मागावे त्याला ते ते बाबांनी दिलेच म्हणून समजावे.

जो जो मज मागे, त्यांस ते ते लाभे

ह्या ओळीची प्रचिती आपल्याला क्षणोक्षणी येते. अशा ह्या आपल्या बाबांना माझे शतशः प्रणाम.

★

# साई माऊली धावत येई

—सौ. वसुधा दत्तात्रय दळी
जी ९६/१ मु. पो. पोफळी जि. रत्नागिरी

● मी लग्नापूर्वी म्हणजे साधारण १४ ते १५ वर्षाची असल्यापासून माझी श्री बाबांवर श्रद्धा आहे. संसाररुपी सागरात प्रत्येक मानवावर अनेक संकटे येतात पण त्यातून मुक्त करणारे फक्त श्रीसाईनाथ हे होत.

सन १९५८ सालची गोष्ट. माझे पती विषमज्वराने आजारी होते. डॉक्टरने शिकस्त केली. शेवटी रात्रौ १२ पर्यंत वेळ दिली होती. नाहीतर केसचा भरवसा नाही मी श्रीबाबांना हाक मारून सांगितले की, यावेळी माझे सौभाग्य राखलेत तर मी यापुढे तुमची सेवा करीन नाहीतर तोंड सुद्धा बघणार नाही. आणि उदी आणून कपाळाला लावली. ताप उतरला नंतर संपूर्ण बरे वाटल्यानंतर श्रीसाईनाथ सतचरीत्राचा पाठ लावला व तेव्हापासून आतापर्यंत श्रीबाबांच्या पुण्यतिथी दिवशी श्रीसाईनाथांची पुजा आमच्या घरी चालू आहे.

माझ्या जीवनात असे बाबांचे अनेक अनुभव सांगता येतील. त्यांचा दुसरा ताजा अनुभव म्हणजे सन १९७९ मध्ये माझे पती, त्यांच्या डोळयांत डायाबिटीज्मुळे पू झाला. डोळा संपूर्ण बारीक झाला. डॉक्टरचे म्हणणे कोठेही गेलात तरी या डोळयाने दिसणार नाही. परंतु आम्ही आता सर्व औषधे बंद करून फक्त श्रीबाबांची

संजीवनी उदी याचा उपयोग करीत आहोत. श्रीबाबांच्या कृपेमुळे डोळयात नवीन मास भरत असून डोळा मोठा होत आहे. विश्वास ठेवा अगर ठेवू नका परंतु आमचे बाबा आमच्यासाठीं धावून येतात हेच खरे.

तिसरा ठळक अनुभव म्हणजे माझा मोठा मुलगा श्रीश हा जिल्हा मध्यवर्ती बँकेत आहे. दोन तीन मित्र मिळून त्यांनी आंब्याचा धंदा करावा असे ठरले. परंतु अनुभव नसल्याने कच्चा आंबा काढून पेट्या भरल्या. त्यामुळे भयंकर नुकसान होणार असे जाणकाराकडून समजल्यामुळे सर्व घाबरले. मला मुलाचे पत्र आले. मी श्रीबाबांना सांगितले बाबा प्रथमच मुलगा धंद्यात पडला आहे. यश द्या निराश करू नका, व त्याप्रमाणे पायाशी चिठ्या टाकून उत्तर घेतले. फायदा होईल चिठ्ठी आली. मुलाला पत्र घातले विश्वास ठेव व श्री शिरडीला ११। रुपयाची मनीऑर्डर कर. त्याप्रमाणे त्याने केली. यश मिळाले व मी साईलीलेला अनुभव देईन म्हणून म्हटले होते. तो आज देत आहे. अशीच आमच्या कुटुंबावर श्रीसाईनाथांनी कृपादृष्टी ठेवावी. हीं श्रीसाईचरणी प्रार्थना.

# आय. टी. आय. मधे संधी बाबांनी दिली

—श्री. हितेंद्र रघुनाथ वर्तक
द्वारा—सुभाष. माणिक पाटील,
रामनाथ पाटील चाळ, एकसर
बोरिवली (प.) तळेपखाडी मुं. ९२

● श्री साईवर आमच्या कुटुंबातल्या सर्वांची श्रद्धा. बाबांनीही आम्हाला अनेक कठीण प्रसंगातून तारल्याने ती अधिकच दृढ झाली.

माझे कॉलेजशिक्षण मी अर्धवट सोडले होते. नोकरीसाठी बरीच खटपट केली पण व्यर्थ. आमच्या घरची सर्व भावंडे नोकरी करतात. माझी लहान

बहीणदेखील. त्यामुळे माझ्या मनात सारखे सलत होते. घरची माणसे माझ्या-वर नाराज आणि काळजीत होती.

मला निश्चित मार्ग सापडत नव्हता. मी भरकटत जात होतो. वय वाढत होते. शेवटी मी आय. टी. आय. प्रशिक्षणासाठी अर्ज केला. सर्व भार श्रीसाई-वर टाकला. मनोमन बाबांची प्रार्थना केली. 'बाबा हाच एक मार्ग शिल्लक आहे. तरी मला संधी मिळवून द्या.' ऐनवेळी बाबांच्या कृपेने ओळखी जमून आल्या. मुलाखतीचे वेळी उदी लावलीच होती. बाबांचे नामस्मरण चालूच होते, आणि बाबांची कृपा झाली. माझी निवड झाली.

श्रीसाईबाबांनी मला यापूर्वीही अनेक कठीण प्रसंगातून सोडविले आहे. वरील अनुभव आल्यास मी तो 'साईलीले'त प्रसिद्ध करण्याचे ठरविले होते. त्याप्रमाणे पाठवित आहे.

☆

## बाबांची अगाध लीला !

—कु. शालिनी सदाशिव देशपांडे
कमलाशिष, ११ रामदास कॉलनी
जिल्हा पेठ, जळगांव

● हा अगदी माझा ताजा अनुभव ! अनुभव म्हणण्यापेक्षा बाबांचा साक्षात्कारच म्हणू या ना ! साधारणतः जून १९८२ च्या शेवटच्या आठवड्यातील घटना ! प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही आपल्या आगमनाची वाट पहात तिष्ठत ठेवणाऱ्या पर्जन्यरायाने यंदाही तेच आरंभले होते. सुदैवाने त्या दिवशी थोडासा पाऊस पडला खरा पण त्यानंतरच्या भयंकर उकाड्याने सर्वांना अगदी त्रासून सोडले. धड पाऊस नाही, ऊन नाही. साधारण अंधःकार सर्वत्र पसरलेला. अशा सृष्टीच्या एकंदरीत निरुत्साही वातावरणामुळे का कोणास ठाऊक माझे मनही अतिशय निरुत्साही झाले होते. अतिशय कंटाळा, आळस वाटत होता. त्याच मनःस्थितींत दिवस गेला व त्यामुळे रात्रीं न जेवता व मुद्दाम उदी न घेता मीं लवकरच झोपले.

रात्री सुमारे दीड दोनची वेळ असेल आईने मला झोपेतून उठविले व तेही अगदी घाबरलेल्या मनःस्थितींतच. उठून बघते तर वडिलांची तब्येत एकदम बिघडलेली. छातींत भयंकर दुखत होते. अस्वस्थता अतिशय वाढत होती. मी चटकन घरात असलेल्या त्यासंबंधी दोन गोळया त्यांना दिल्या. त्यामुळे बरे न वाटता अस्वस्थता अधिकच वाढली. काय करावे ते सुचेना. डॉक्टरांना बोलावू म्हटले तर घरात आई व लहान बहिणींशिवाय कोणीच नाही. अशा स्थितीत कधीही धीर न सोडणाऱ्या न घाबरणाऱ्या वडिलांनीही धीर सोडला. एरवी डॉ. ना बोलावू का म्हणताच, छे! उगाचच काय! वगैरे म्हणून न डगमगता धीर देणाऱ्या वडिलांनीच शेजाऱ्यांना उठवून डॉ. बोलावण्याचे सुचविले. मग काय माझे सर्व अवसानच गळाले. मी कशीतरी शेजाऱ्यांना हाक मारली व जवळच असलेल्या डॉ. ना आणण्याची विनंती केली. इकडे वडिलांची अस्वस्थत वाढतच होती.

तेवढ्यात मला अचानक आठवले की काल दिवसभरात आपण साईस्तवन म्हटले नाही. आरतीला हजर राहिले नाही व रात्री उदी घेण्याचे तर मुद्दामच आठवण असूनही टाळले. त्याचाच तर हा परिणाम नसेल! मी चटकन उठले, डब्यातून थोडी उदी हातावर घेतली व बाबांचे नामस्मरण करून वडिलांच्या कपाळावर लावली थोडी त्यांच्या तोंडात टाकली व मीही घेतली. आणि काय आश्चर्य! बाबा चटकन धावून आलेच! वडिलांची अस्वस्थता कमी कमी होवू लागली तरतरी वाटू लागली. तितक्यात डॉक्टर आले. त्यांनी वडिलांना तपासले व ते चक्क हसू लागले. कसली अस्वस्थता! कसले छातीचे दुखणे, तुम्हाला तर काहीच झालेले नाही. सर्व अगदी व्यवस्थित आहे. असे म्हणून फक्त एक दोन किरकोळ गोळया देवून डॉक्टर निघून गेले पण त्या गोळयाही न घेताच वडिलांना शांत झोप लागली. आहे की नाही बाबांची लीला अगाध! आपल्या लेकराला ते सतत आई प्रमाणे स्वतःकडे खेचत असतात, व त्यांची काळजी घेत असतात.

# साईबाबांनी पेपर लिहिले 377

—श्री. भास्कर गोविंद जोशी
साईप्रसाद ४२ श्रीकृष्णनगर
बोरीवली (पूर्व) मुंबई ६६

● शिरडीचे श्रीसाईबाबा भक्तांच्या हाकेला तत्परतेने धावून येतात असा अनेक भक्तांचा अनुभव आहे. फक्त अंत:करणापासून ही हाक पाहिजे. श्रीबाबांवर नितांत श्रद्धा व सबूरी पाहिजे. मलाही आतापर्यंत अनेक अनुभव आले आहेत व प्रत्येक वेळी श्रीबाबांनी संकट निवारण केले आहे. त्यातीलच हा एक नुकताच आलेला अनुभव.

आमचा धाकटा मुलगा बी. एस. सी. (टेक)च्या शेवटच्या वर्षात शिकत होता. युनिव्हर्सिटीची फायनल परीक्षा २७ एप्रिल १९८१ रोजी सुरु होत होती व प्रिलिमिनरी १७ मार्चला. मी व माझी पत्नी ३० डिसेंबर १९८० रोजी पुण्याला नातेवाईकांकडे लग्नाला गेलो होतो. आमचा मुलगा १ जानेवारी १९८१ रोजी आपल्या मित्राबरोबर खंडाळयाला ट्रिपला जाणार होता म्हणून आम्ही ३१ डिसेंबर १९८० लाच मुंबईला परतलो. १ जानेवारीला रात्री ९ वाजता त्याच्या मित्राचा फोन आला ९॥ ला बोरीवली स्टेशनवर ये म्हणजे आपण बरोबर व्ही. टी. ला जाऊ गाडी रात्री ११-३५ ची. मुलगा आम्हाला म्हणाला की मला जावेसे वाटत नाही. आम्ही म्हणालो जावेसे वाटत नसेल तर जाऊ नकोस परत ९॥ वाजता दुसऱ्या मित्राचा फोन आला. मुलगा त्याला म्हणाला मला जावेसे वाटत नाही. मित्र आग्रह करू लागला तेव्हा तो जावयास तयार झाला. त्याने आमचे ऐकले नाही. होणार तशी बुद्धि होते. ३ तारखेला मुलगा परत आला व भूक लागत नाही, लघवी पिवळसर होते अशा तक्रारी सुरू झाल्या. ५ तारखेला डॉक्टरांनी पूर्ण तपासणी केली. लघवी व रक्त तपासले व डॉक्टरानी मुलाला काविळ झाल्याचा निर्णय दिला. लगेच गावठी औषधे सुरू केलीं. १५ दिवस झाले तरीं गुण येईना मुलगा पिवळा पडला. घामाने कपडे पिवळे व्हावयास लागले. अशक्तपणा वाढत जाऊ लागला. एक दिवस तर बेशुद्ध पडला. आमच्या तोंडचे पाणी पळाले आमचा एक मुलगा २॥ वर्षांचा होऊन काविळींने गेला म्हणून तर आम्हाला

जास्तच धडकी भरली. श्री साईबाबांची उदी, तीर्थ सकाळ संध्याकाळ देत जाऊ लागलो व बाबांना मनोमन प्रार्थना केली, साईबाबा! मुलाला लवकर बरा करा, तुमच्या दर्शनास घेऊन येऊ. असेच दिवस जाऊ लागले. रोज बाबांची आळवणी केली. दीड महिन्यानंतर उतार पडू लागला. बाबांनी आमची प्रार्थना ऐकली. ३ मार्चला रक्त तपासले व ५ तारखेला स्पेशालिस्टकडे जाऊन पूर्ण तपासणी केली व काविळ नाहीशी झाली असा डॉक्टरांनी निर्णय दिला. बाबांवरील श्रद्धा व सबूरीचे फळ मिळाले.

पुढे दुसरा प्रश्न उभा राहिला. दोन महिने अंथरुणावर असल्यामुळे मुलाचे कॉलेज बुडाले. प्रॅक्टिकल्स बुडाले. दोन महिने अभ्यासाचे पुस्तक हातात धरले नाही. मुलाला सांगितले, ह्या वर्षी परीक्षेस बसू नकोस. डॉक्टरांचे पण तेच मत पडले. परंतु मुलगा ऐकेना. परीक्षेला बसणारच असा हट्ट धरला. शेवटी नाइलाजाने त्याला परीक्षेस बसण्याची परवानगी दिली. मार्च १७ ला प्रिलिमिनरी व एप्रिल २७ ला फायनल परीक्षा शिवाय सेमिनार व प्रोजेक्टचे काम, डॉक्टरांनी तर परिश्रम करू नकोस असे सांगितले. काविळ उलटण्याची भीति. शिवाय क्लास मिळाला नाही तर पुढे शिकण्याकरिता किंवा नोकरी मिळण्याकरिता अडचण. शेवटी विचार केला, बाबा पाठीशी असल्यावर कळीकाळाची सुद्धा भीती नाही. बाबांना साकडे घातले. बाबा! तुमच्या ह्या लेकराला आता तुमचाच आधार आहे. त्याला काविळीतून बरे केले. आता तो परीक्षेस बसतो आहे. त्याला नुसते पास व्हायचे नाही तर फर्स्टक्लासमध्ये यावयाचे आहे. तरी प्रार्थना ही की त्याचे पेपर्स आता तुम्हीच लिहा. तुमच्याशिवाय आम्ही कुणाकडे पहायचे. सोबत श्रीसाईसच्चरिताचा सप्ताह मांडला व निश्चिंत राहिलो. प्रिलिमिनरी परीक्षा झाली. पेपर बरे गेले. प्रॅक्टिकल्सच्या परीक्षा झाल्या व शेवटी फायनल परीक्षा झाली. पेपर कसे गेले ते विचारले नाही. कारण मी निश्चिंत होतो. शेवटी रिझल्टची वेळ आली. ता. ९ जुलै गुरुवार श्री साईबाबांचा दिवस, आणि बाबांनी किमया घडवून आणली. मुलगा फर्स्टक्लासमध्ये पास झाला. आमचा आनंद गगनात मावेना. बाबांनी आमची लाज राखली. मुलाला लगेच चार ठिकाणच्या चांगल्या नोकऱ्या पण चालून आल्या, परंतु त्याला पुढे शिकायचे असल्यामुळे नोकरी करण्याचा बेत रद्द केला. व बाबांच्या कृपेमुळे त्याला एम. एस. सी. ( टेक ) ला ॲडमिशन पण मिळाली. बाबांना सांगितल्याप्रमाणे एकदा परीक्षा झाल्यावर व दुसऱ्यांदा रिझल्ट लागल्यावर त्याला बाबांच्या दर्शनाला शिर्डीला घेऊन गेलो. असे आहेत आमचे बाबा. संकटकाळी अनन्यभावेने शरण गेल्यास ते संकटापासून आपली मुक्तता करतात. फक्त श्रद्धा व सबूरी मात्र पाहिजे.

॥ सद्गुरू श्री साईनाथ महाराज की जय ॥

# ॥ नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य ॥
# ॥ नित्य घ्या प्रचित अनुभवे ॥

—श्री. रणजित लक्ष्मण पाटील
३१८ बी वॉर्ड, रविवार पेठ,
कोल्हापूर

● आम्ही प्रथमच शिरडीस गेलो होतो. साईबाबांच्या लीलेविषयी ऐकून माहीत होते, पण मला तसा अनुभव नव्हता. सुटीचा काळ घालविण्यासाठी सहज शिरडीस जाऊन यावे असा विचार करून शिरडीस जाऊन पोहचलो. साईबाबांच्या समाधी मंदिरात प्रवेश केला अन बाबांची प्रसन्न तेजस्वी मूर्ती पाहताच देहभान विसरून गेलो. माझे हात नकळतच आपोआप जोडले गेले. त्याच क्षणी माझ्या मनाला एक विचार स्पर्शून गेला की आपण शिर्डी सोडूच नये. बाबांच्या सेवेसाठी अखंडपणे येथेच रहावे. मी व माझी पत्नी त्या वेळेपासून सलग आठ दिवस बाबांच्या सर्व आरत्यांना व कार्यक्रमांना उपस्थित रहात होतो.

गुरुवारचा दिवस. धुपारती सुरू झाली होती. त्यावेळी आम्ही खोलीवर होतों. आरतीचे सूर कानी पडताच नित्याच्या सवयीप्रमाणे तावडतोब मी व पत्नी माझ्या दीड वर्षाच्या मुलीला घेऊन जवळ जवळ पळतच सुटलो. बाबांच्या समाधी मंडपाबाहेरील आवारात अतिशय गर्दी झाली होती. आम्ही दोघांनीही मुलीसह हळू हळू समाधी मंदिरात प्रवेश केला. बाबांच्या मूर्तीजवळ जाऊन उभे राहून बाबांच्याकडे पहात आरती म्हणण्याची अतिप्रबळ इच्छा मनात होती म्हणून मार्ग काढीत काढीत आम्ही दोघही मूर्तीजवळ येऊन पोहचलो. मंदीरात अतिशय चेंगराचेंगरी होत होती. तरीही मी पुढे जाऊन बाबांची मूर्ती पाहण्याचा प्रयत्न करीत होतो.

बाबांच्या समाधीमंदिरात बांधलेल्या ज्या दोन साखळ्या आहेत त्यापैकी पुरुषांच्या बाजूकडील साखळीवर एक १० ते १२ वर्षाचा मुलगा बाबांची आरती म्हणण्यात दंग झालेला होता. मीही आरती म्हणत होतो. पण पुढे जाऊन बाबांना पाहण्याची इच्छा असल्याने मी २/३ वेळा त्या छोट्या मुलाला बाजूस ओढून मी त्याच्या ठिकाणी उभा राहिलो. असे वरचेवर झाल्याने नंतर तो मुलग नाइलाजाने माझ्या मागे आरती म्हणत उभा राहिला.

आरती संपत आली त्यावेळी फुले वाटली जाऊ लागली. माझ्यासमोर ताट आले त्यावेळी मी फुले घेण्यासाठी हात पुढे केला. माझ्या आजुबाजूच्या लोकांना फुले मिळाली पण मला फुले मिळाली नाहीत. मी मनात थोडा नाराज झालो. आरती संपली व भक्तांच्यातून आरती फिरू लागली. माझ्या जवळ आरती येताच मी हात पुढे करून आरतीवरून हात फिरवण्याचा प्रयत्न केला. आरती मला न मिळताच पुढे गेली. मी निश्चय केला की आरती परत येताना आपण घ्यावयाचीच. आरती परत येऊ लागली.

माझ्या जवळ आरती येताच मी हात पुढे करून आरतीवरून फिरवण्याचा प्रयत्न केला व हात फिरवलाही. पण का कुणास ठाऊक माझ्या हाताचा संपूर्ण पंजाच आरतीवर पडला व हात अचानक जड झाला. हात वर उचलता येईना. हात कसातरी बाजूला घेऊन पहातो तो संपूर्ण पणे भाजला होता. माझ्या हातातून सारख्या झीणझीण्या येत होत्या, हाताची सारखी आग आग होत होती. तळहातावर संपूर्ण चट्टे पडून फोड येत होते त्यात पाणीपण भरू लागले होते. पाच एक मिनटातच माझा हात सुजू लागला. तेवढ्यात प्रसाद वाटप सुरु झाले मी प्रसाद घेण्याचा प्रयत्न केला मला प्रसाद सुद्धा मिळाला नाही. मी मनाशी विचार करू लागलो की माझे काय चुकले असावे की मला आज फुले व प्रसाद मिळाला नाही. आरतीने हात पोळला, थोड्याच वेळात माझी चुक मला उमगली व मी मघाच्या त्या छोट्या मुलाला बाजूस सारले तो चिमुकला बाबांच्या भक्तित तल्लीन असतानाही त्याला मी बाजूस सारून त्याच्या भावनांना दुखावले म्हणून बाबांनी मला ही शिक्षा दिली असावी.

तात्काळ मी त्या बालकाचा आजुबाजूला शोध घेऊ लागलो. पण तो काही मला दिसला नाही. तो अदृश्य झाला होता. मी मनोमन बाबांच्याकडे झालेल्या अपराधाची क्षमा मागितली व दर्शनासाठी पाळीत उभारलो पण ठणका कमी होत नव्हता. हाताच्या तळव्यावर फोड येऊन त्यात पाणी भरले होते. मी बाबांच्या समाधी जवळ गेलो. समाधीवर मस्तक ठेवले व साश्रु नयनांनी बाबांची पुन्हा एकवार क्षमा मागून बाबांच्या समाधीवरून माझा पोळलेला हात फिरवीला. पुन्हा माझ्या हातून असा प्रमाद घडणार नाही असे सांगून समाधी मंदीरातून बाहेर पडताच बाहेरील आवारात मला अचानकपणे पुजाऱ्याने तिर्थप्रसाद दिला. बाबांनी मला चमत्कार दाखविला मला मिळालेला प्रसाद मी आनंदाने सेवन केला व पत्नीसह खोलीवर आलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी पत्नीचे लक्ष माझ्या हाताकडे गेले व ती म्हणाली हा हातावर डाग कसला मी हाताकडे पाहीले अन् मला आश्चर्याचा धक्काच बसला.

माझा संपूर्णपणे पोळलेला उजवा हात पूर्णपणे बरा झाला होता. फोड नव्हते की हाताला ठणका नव्हता. मात्र तळहातावर एक छोटासा डाग शिल्लक राहीला होता. घडलेली सर्व हकिकत मी पत्नीला कथन केली व तिला ही घटना सत्य आहे हे उमजावे म्हणून हातावर राहीलेला डाग तिला दाखविला. गावी परत आल्यावर मी माझा अनुभव आजूबाजूच्या साईभक्तांना सांगितला व माझ्या हातावरील डाग सर्वांना दाखविला.

अपराध्याला शासन देऊन बाबांनी आम्हा पतिपत्नीना खरा भक्ति मार्ग दाखविला. त्या क्षणापासून आम्ही आता बाबांच्या आज्ञेशिवाय घरी कोणतीही गोष्ट करीत नाही. बाबांच्या आशिर्वादाने आम्हास आता कसलीही चिंता अथवा कमतरता भासत नाही.

"वदनी श्रीसाईचे नाम ।
हृदयी श्रीसाईचे प्रेम ।
तया नित्य आराम क्षेम ।
रक्षी स्वयंमेव साई त्या ।"

**श्रीसाईलीला**

श्रीसाई काव्यबहार विशेषांक फेब्रुवारी १९८३

शिरडी येथील लेखक–कवींच्या स्नेहसंमेलनात थाटात प्रकाशित होणार.

पृष्ठे ६४ ] [ किंमत १ रुपया

या नाविन्यपूर्ण खास अंकासाठी कुणाही साईभक्त कवीने आपले काव्य साहित्य पाठवू नये.

# देव भावाचा भुकेला

—सौ. नलिनी सुरेन्द्र चिटणीस
२४२ IV C
मु. पो. ओझर टाऊनशीप
ता. निफाड जि. नाशिक

● नुकतीच घडलेली हकिकत आहे. एक दिवस झोपायच्या वेळी माझा मुलगा मिलिंद मला म्हणाला, 'अग आई माझ्या खोलीत मी उठल्याबरोबर साईबाबा दिसतील असा एखादा फोटो लाव ना.'

त्यावर कुठला बरं लावावा ? फोटो तर घरात पुष्कळ आहेत. प्रत्येक खोलीत २–३ सुद्धा. आम्ही आपसात ठरवत होतो. त्यापैकीच कुठला तरी लावू असे म्हणून तो विषय तेवढ्यावरच राहिला.

नंतर २–३ दिवसांनी मिलिंद म्हणाला, 'अग आई आज मला काय छान स्वप्न पडले. साईबाबांचं स्वप्न पडलं. मी शिर्डीत होतो. साईबाबांची फुलापानांनी सुशोभित अशी मूर्ती दिसत होती. मी दक्षिणा म्हणून खिशातून चिल्लर १०–२० पैसे काढले. पण कुठून तरी आवाज आला एवढेच ?'

मग मी आणखी काढण्यासाठी खिशात हात घातला. रुपया टेकला नि स्वप्न संपले.

त्यानंतर लवकरच मला नाशिकला जाण्याचा योग आला. मेनरोडवर फिरताना एक जण फोटो मांडून बसलेला होता. त्याच्याकडे खूप देवदेवतांचे फोटो होते. साईबाबांचा मात्र एकच एक फोटो होता. अर्थात् मी तो घेतला. घरी आल्यावर मिलींदला जसा हवा होता तसा तो लावून दिला.

☆

# साईंची....अगाध शक्ती, अघटीत लीला

—श्री. जयप्रकाश पद्मनाभ बावरेकर
बी. ए. एल. एल. बी.
मु. पो. वाणगांव ( प. रेल्वे )
जि. ठाणे

● ग्रीष्माची उन्हे डोकावू लागली, जमिनीखालील पाणी शोधून काढण्यास हा काळ चांगला असतो असे समजतात. म्हणून ‘ महाशिवरात्र, ’ वडिलांच्या प्रथम स्मृती-दिनी पाणी शोधकाकडून अगोदरच शेतावरील जमिनीतील पाण्याचा केन्द्रबिंदू शोधून काढला. पुढे प्रश्न आला नलिका विहीर करण्याचा, म्हणजे बोअरींग कॉंट्रॅक्टरकडे हे काम देणे आवश्यक आहे. करिता अगोदर १० फूट खड्डा खणून तयार ठेवला व बोअरींग कॉंट्रॅक्टरकडे बोअरींगची मागणी करण्यास गेलो. परंतु त्याने सांगितले की, मी आधीच लोकांचे पैसे घेऊन ठेवले आहेत व त्याप्रमाणे बोअरींगचे नंबर लागलेले आहेत; करिता तुम्हास यावेळी बोअरींग मिळू शकणार नाही. तुम्ही तुमचे काम पुढील वर्षी करा. हे ऐकून मन उद्वीग्न झाले, कारण ३०० ते ४०० रुपये खर्च करून खड्डा खणून ठेवला होता. तो पावसाळ्यात धसला जाऊन सर्व नुकसान सोसावे लाग-णार. तसाच घरी परत आलो. मनात म्हटले, ‘ हे साई, आमच्याच वाट्याला सर्व ठिकाणी नकार घंटा वाजते, आता काय करायचे ? ’

दुसरे दिवशी म्हणजे ता. २१ एप्रिल १९८२ रोजी सकाळी उठून नेहमीप्रमाणे बँकेत गेलो. मन उद्वीग्न होते. त्यावेळी आमच्या मॅनेजरने सहज विचारले, ‘ काय बावरेकर, बोअरींग कुठपर्यंत आले ? ’ मी सांगितले, बोअरींग खणण्याचे ह्या वर्षी नशिबी नाही कारण कॉंट्रॅक्टर येण्यास नकार देतो. त्यावेळी माझ्या सहकर्मचाऱ्यांनी सांगितले की त्यांच्याकडे जर अनेक जणांची कामे असतील तर तुला बोअरींग कसे काय मिळणार ? इतक्यात काय झाले कुणास ठाऊक पण आमचे साहेब खुर्चीवरून उठले व मला म्हणाले, ‘ तुझे बोअरींग आपण पंधरा दिवसात त्याच्या जवळून खणवू ’ मी व सहकर्मचाऱ्यांनी मिष्कीलतेने आमच्या साहेबांना सांगितले, ‘ हे अशक्यच, तो कॉंट्रॅक्टर बाकीची कामे सोडून आला पाहिजे ना ? त्यानंतर योगायोग व साईकृपा !’

आम्ही ऑफीस बंद करून सर्व रस्त्यावर आलो तोच समोरून तो कॉंट्रॅक्टर आमच्या जवळून जात होता. त्यावेळी चेष्टा म्हणून आमच्या सहकर्मचाऱ्याने आमच्या

साहेबांना सांगितले की हाच तो कॉंट्रॅक्टर, जर असेल तुमची हिंमत तर द्या बावरेकरला पंधरा दिवसात बोअरींग! लगेच साहेबानी पुढे गेलेल्या कॉंट्रॅक्टरला हाक मारून बोलाविले व माझ्या बोअरींगचा विषय काढला. त्यामुळे तो बुचकळ्यात पडलेला कॉंट्रॅक्टर, साहेबांना लगेच बोलून गेला 'मी बावरेकरला बोअरींग देतो ना, तेव्हा कधी म्हणून विचारले असता १ मे रोजी निश्चित. आम्ही सर्व निघून गेलो. पुढे ३० एप्रिल उगवला. मन साशंक होते. कारण कॉंट्रॅक्टरचा काय भरवसा. परंतु काय आश्चर्य साईकृपेने तो त्या दिवशी दुपारी दारात दत्त म्हणून उभा राहिला व मला म्हणाला ' तुमच्या शेतावर बोअरींगची मशिनरी नेण्याकरिता आता बैलगाडी पाठवा, उद्या आपल्याला काम चालू करायचे आहे. हे ऐकून तर अधिकच आश्चर्याचा धक्का बसला कारण ज्या कॉंट्रॅक्टरच्या पाया पडायचे बाकी ठेवले होते, तो स्वतः होऊन काम चालू करायचे सांगायला आला होता. ही साई कृपाच!

१ मे उजाडला व शेतावर नारळ फोडून निर्देशलेल्या ठिकाणी बोअरींग काम चालू झाले. कधी ४ फूट तर कधी २ फूट अशा प्रकारे पहार जमिनीत उतरू लागली. तेरावा दिवस उजाडला एव्हाना पहार जमिनीत ४५ फूट खोल गेली होती, तरी पाण्याचा मोठा झरा लागण्याची चिन्हे दिसत नव्हती. तीस रुपये फूटाप्रमाणे बोअरींगच्या बीलाचा आकार वाढत होता. आमच्या सगळ्यांच्या तोंडचे पाणी पळाले कारण कॉंट्रॅक्टर व बोअरींगवर काम करणाऱ्या अनुभवी मजुरांच्या म्हणण्यावरून व त्या दिवशी लागलेल्या दगडावरून त्या जमिनीत पाणी नाही असा निष्कर्ष निघाला. कॉंट्रॅक्टरने चौदाव्या दिवशी सांगितले की पाण्याचा ठिकाणा नाही करीता तुम्ही उगाच पैसे नासू नकात, व मी उद्याच्या दिवस दोन तीन फूट खणीन व काम बंद करीन. अखेर पाणी न मिळता सर्व खर्च फुकट गेला असे समजून मी, माझा भाऊ व शेतावर काम करणारी आमची गडी माणसे डोक्यावर हात मारून बसलो.

पंधरावा शेवटच्या प्रयत्नाचा दिवस उगवला मी शेतावर जाणाऱ्या माझ्या भावास एका पुडीत श्रीसाईंची उदी बांधुन, बाबांच्या तसबीरीला लावून सांगितले की बाबा आमच्या बोअरींगला खूप पाणी लागून द्या, तुम्हाला ११। रुपये पाठविन व ती पुडी त्यास बोअरींगच्या खड्डयात टाकण्यास सांगितले.

संध्याकाळी बँक बंद झाल्यावर मी दोन साथीदारांसह मोटार सायकलवरून शेतावर ५ वाजता पोहचलो. बोअरींगचे काम चालू होते, पहार ४९ फूट खाली उतरली होती. परंतु पाण्याचा मागमुस नव्हता. अखेर डोळ्यात पाणी येण्याची वेळ आली, कारण रुपये २००० खर्च फुकट जाऊन, लोकांचे हसे झाले असते ते वेगळेच!

बँकेचे कपडे अंगावर असताना मी तसाच खाली खड्डयात उतरलो व श्रीसाईनाथांचा धावा केला की, ' हे बाबा शिरडीच्या वाण्यानी तेल नाकारले असताना तुम्ही पाण्यानी पणत्या जाळल्यात, दासगणूंच्या समाधानासाठी स्वतःच्या पायाच्या अंगुष्ठातून गंगा-यमुना प्रकट केल्या आणि त्याच पाण्या करीता आम्ही हात पसरले तर नुसते दगड माती आमच्या पुढ्यात घालता, जर तुमचे हे सत्य असेल तर ह्या भक्ताची आर्त हाक ऐका व चोवीस तास अखंड वाहणारा निर्मळ पाण्याचा मोठा झरा आमच्या बोअरींगला पाच मिनटाच्या आत लागून द्या. '

आणि अहो, काय आश्चर्य झाले ! अवघ्या तीन मिनिटात पहार एकदम एक फूट खाली उतरली. काँट्रॅक्टरचे ५० फूट काम झाले होते. पहार काढली गेली व लगेच इंजिन चालू केले आणि आमची दृष्टी पाणी फेकणाऱ्या पाईपाकडे खिळते न खिळते तोच पाईपातून जोराने पाणी फेकू लागले. घड्याळावर दृष्टी ठेऊन पाणी किती वेळ फेकले जाते हे पाहू लागलो कारण खरा झरा नसल्यास पाणी येणे पाच मिनिटाच्या आत बंद होते. परंतु आमचे येथे घड्याळाचा काटा पुढे सरकत होता व पाण्याचा जोर सुद्धा वाढत होता. त्या दिवशी दोन तास अखंड पाणी वाहत होते अखेर रात्री आठ वाजता आम्हीच इंजिन बंद केले. आज बोअरींगमधून चोवीस तास जरी इंजिन चालू ठेवले तरी अखंड पाणी वाहात आहे. काँट्रॅक्टर व पाणी शोधकाबरोबर काम करणारी अनुभवी माणसे ह्यांनी तर चक्क तोंडात बोटे घातली कारण माझ्या बाबांनी अखंड निर्मळ पाण्याचा मोठा झरा आमच्या शेतासाठी शिरडीहून पाठविला होता.

आज आठ आठ तास इंजिन चालते परंतु पाणी मात्र अधिकाधिक वाढत जाते. बाबा तुमची अशीच कृपा आमच्यावर सदैव राहू दे, व तुझी ही साईबाग अशीच अखंड बहरू दे, फुलू दे !

हे साई अगाध आहे तुझा महिमा ।

# श्रीसाईबाबांचा चमत्कार

—श्रीमती सुमती के. सावरकर
वर्षा सोसायटी, सुनीता–एफ १,
लालबहादूर शास्त्री मार्ग नौपाडा, हायवे नाक्याजवळ,
ठाणे ( प. ) ४००६०२

● मी व माझा मुलगा शशिकांत ता. ९ मे १९८२ रोजी शिर्डीस पोहोचलो. मध्याकाळ झाल्यामुळे व खोली मिळविण्याच्या धावपळीमुळे आम्ही ९ मे रोजी बाबांचे दर्शन घेऊ शकलो नाही. त्यामुळे आम्ही ता. १० मे १९८२ रोजी भल्या पहाटे ३–३० ला उठलो व आमचा बिछाना वगैरे सामान गुंडाळून व्हरांडयात ठेवले व स्नान वगैरे आटोपून श्रीसाईनाथांच्या दर्शनाला गेलो व यथाविधी अभिषेक केला.

सगळेविधी आटोपून आम्ही खोलीवर परतलो. तेवढ्यात माझ्या लक्षात चटकन आले की माझी गळ्यातील सोन्याची माळ आहे तरी कोठे ? पुष्कळ आठवण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ ! शेवटी श्री साईनाथांचा मी मनाशी धावा केला व बिछाना उचलला तो खोलीत ठेवण्यासाठी. पण काय आश्चर्य ! बिछान्यातून माळ बाहेर डोकावताना मला दिसली. मी श्री साईनाथांचे त्रिवार आभार मानले व मनातल्या मनात त्यांचा जयजयकार केला.

खरोखर ! देव हा कणाकणांत आहे व त्याची प्रचिती आणून देणारा वरील प्रसंग हा तर फारच सुखद अनुभव.

❁ साईलीला ❁
लेखक–कवी स्नेहसंमेलन – नववे – १९८३
शिरडी येथे रविवार दिनांक ३० व सोमवार दिनांक ३१
जानेवारी १९८३ रोजी थाटात साजरे होणार
विशेष माहिती श्रीसाईलीला जानेवारी १९८३ अंकात वाचा.

# भक्तांना संकटातून सोडवणारे बाबा

—श्री. मधुकर वखारे
१३/२१३ बी. पी. टी. स्टाफ क्वार्टर्स
रेनॉल्डस रोड, वडाळा मुंबई ३७

● १९८० साली साईलीला लेखक कवि संमेलनाला उपस्थित राहाण्याची जबरदस्त इच्छा असूनही ऑफीसातील अतिशय महत्वाच्या कामामुळे रजा मिळणे अशक्यप्राय गोष्ट होती. सम्मेलन रवि. सोम. असे दोन दिवस होते. मला सोम. मंगळवार दोनच दिवस रजा हवी होती. रजा मागून मिळणार नव्हती, व न कळवता रजेवर गेलो असतो तर रजेचा पगार कापण्याची व रेकॉर्ड खराब होण्याची शक्यता होती. मनातून मला खात्री होती की बाबा मला या सर्व अडचणीतून सोडवतीलच. बाबांवर माझी नितांत श्रद्धा आहे. ती श्रद्धा वाढीस लागण्याचे श्रेय केवळ बाबांनाच आहे. परमपूज्य बाबांच्या मनात भक्ताला शिरडीला ओढून आणायचं असलं की सर्व संकटे कापराच्या वातीप्रमाणे जळून भस्म होतात. सम्मेलनाला जाण्याची तीव्र इच्छा असूनही माझ्यापुढे अडचणींचा डोंगर उभा होता. मी माझ्या सेक्शन इनचार्ज गृहस्थाना माझी अडचण सांगितली. सम्मेलनाचे आमंत्रण दाखवले. योगायोगाने ते सद्गृहस्थ साईभक्तच निघाले. बाबांवर त्यांचीपण दृढ श्रद्धा होती हे तेव्हा कळले. ते म्हणाले—आताच सोमवारपासून आपलं वार्षिक कोठा तपासणीचे (Stock verification) महत्वाचे काम सुरू होणार आहे. कुणीही रजा घेऊ नये व घेतल्यास लिव्ह विदाऊट पे व सर्व्हिस शीटवर वाईट शेरा मारला जाईल असे पत्रक साहेबांनी काढले आहे. रजा मिळणे केवळ अशक्य आहे. तरीही साईभक्त म्हणून तुम्हाला मदत करणे माझे कर्तव्यच आहे. तुमची स्पेशल केस म्हणून रजा द्यायला मी साहेबांना सांगतो व तुमचे काम रजेच्या काळात मी करतो. मात्र तुम्ही शिरडीहून माझ्यासाठी एक बाबांची चांदीची अंगठी व उदी न विसरता आणा. माझी दोन दिवसांची रजा त्या साईभक्त गृहस्थांनी मंजूर करून आणली. मला अत्यानंद झाला. फक्त मला एकट्यालाच त्या काळात रजा मिळाली. आता रिझर्व्हेशन मिळणे कठीण होते. कारण त्याच दिवशी रात्री ९ च्या एस. टीने जाणं अवश्य होतं. चार वाजताच मी बसने बॉम्बे सेंट्रल एस. टी. स्टॅंडवर रिझर्व्हेशनसाठी लवकरच ऑफिसातून निघालो. शनि. असल्याने एस. टीला गर्दी असते. बुकींग ऑफिसात चौकशी केली परंतु संपूर्ण रिझर्व्हेशन भरलं होतं. जागा नाही म्हणून बुकींग क्लार्कने सांगितले. मी थोडा

निराशच झालो. परत फिरणार तेवढ्यात शुकशुक करून त्या बुकींग क्लार्कने मला बोलावलं. एकच शेवटची सीट खाली आहे चालेल का म्हणून मला विचालें. मी हो म्हणून सांगितले. जागा मिळाली हेच नशिब. कुठली का असेना मला पुन्हा आनंदाचा दुसरा धक्का बाबांनी दिला. वडाळयाला घरी जाऊन जेवण उरकून त्रेसष्ठ नंबरच्या बसने ८॥ वाजता बॉम्बे सेंट्रलला आलो. गाडीत शेवटच्या सीटवर जाऊन बसलो. तेवढ्यात माझ्याजवळ एक गृहस्थ आला आणि म्हणाला कृपया जरा जागा बदलली तर तुम्हाला चालेल का? कारण त्या गृहस्थाजवळ बरेच बोजड सामान होते. ते सर्व मागच्या सीट खाली ठेवणं त्याला सोईस्कर होणार होतं. त्याची रिझर्व्हेशनची जागा पुढच्या सीटवर होती. मी माझी संमती दर्शवली व पुढच्या सीटवर जाऊन बसलो. शेजारीच बसलेले मराठीचे विनोदी लेखक श्री. राजाराम हुमणे यांना मी ओळखलं. मला ते ओळखत नव्हते पण त्यांच्याशी माझा परिचय होता. काही महिन्यापूर्वीच आमच्या ऑफीसच्या एकांकिका स्पर्धेच्या संदर्भात त्यांना आम्ही भेटलो होतो. त्यांचे विनोदी लेखन वाचलेही होते. मी त्यांना त्या प्रसंगाची आठवण करून दिली व माझा परिचय करून दिला. शिरडीला लेखक कवि संम्मेलनाला जातो आहे असं त्यांना मी म्हणालो. ते आनंदाने म्हणाले अहो मी पण सम्मेलनालाच निघालो आहे. बरं झालं तुम्ही भेटलात आता प्रवासात कंटाळा येणार नाही. ते म्हणाले प्रवासात मला एक अडचण जाणवते ती म्हणजे मला पानाचं व्यसन आहे. मी सुद्धा पान खाणारा माझ्याजवळ पान सुपारी, तंबाखूची चंची होतीच. सबंध प्रवासात चहापाणी, तांबूलभक्षण, गप्पागोष्टी करण्यात आमचा वेळ कसा गेला कळलंच नाही. आमची चांगलीच मैत्री जमली. शिरडीला देखील श्री साईलीला मासिकाचे संपादक श्री. चेंदवणकर साहेबांनी आम्हा दोघांना एकत्रच जागा मिळवून दिली. हे सर्व परमपुज्य बाबांनीच घडवून आणले यात तिळमात्र शंका नाही. कुणी याला योगायोग म्हणतील. पण रजा मिळणे दुरापास्त असून रजा मिळवून देऊन प्रवासात विनासायास छान जागा देऊन साईभक्ताच्या सहवासात सोडून बाबांनी मला आश्चर्याचे तीन धक्के दिलेत. हे सर्व प्रसंग योगायोगाने कसे जुळून येतील? या अनंतकोटी ब्रह्माण्डनायकाच्या मनात भक्ताबद्दल किती तळमळ आहे याचा मला प्रत्यय आला. फक्त बाबांच्या ठायी दृढ श्रद्धा हवी. बाबा भक्तांना संकटातून निश्चितपणे सोडवतात.

383

# ऑपरेशनचे बिल बाबा भरतात !

—श्री. द. वि. गुप्ते
बी/१ गोविंदराम सोसायटी, इर्ला ब्रीज,
आझाद लेन, अंधेरी (प.) मुं. ४०० ०५८

● परी या संतांची ऐसीच रीती । अघटीत लीला अद्भुत कृती । भक्ता घरची कार्यस्थिती । सवेच योजिती त्या आधी । (साईसच्चरित्र ओवी १०३ अ. ४०)

श्रीसाईबाबा आमचे आराध्य दैवत पुढे येणाऱ्या संकटांची त्यांना चाहूल लागते व त्याची आगाऊ तरतूद ते कसे करतात त्याचा माझा हा ताजा अनुभव :—

मी माझ्या हाताखालील सहकाऱ्यांसह सॉलिसिटर्स कंपनी स्थावर मिळकतीचा खरेदी विक्रीच्या तपासाची कामे माझ्यावर सोपवितात व मी ती करून देतो व त्याचा वाजवी मोबदला मिळतो.

मार्च-एप्रिल महिन्यात कामाची एवढी गर्दी झाली की मी अवाक झालो, तीन चार महिन्याची प्राप्ती वसूल होणार म्हणून आनंद झाला. परंतु एकदम श्रीबाबांनी पैशाची एवढी खैरात का केली या विचारात मी पडलो. थोडासा गोंधळलोच !

आणि दि. १० एप्रिलला शनिवारी माझ्या पोटात दुखू लागून उलट्या होऊ लागल्या. रात्री अकरा वाजता डॉक्टरनी तावडतोब दुसऱ्या दिवशी ऑपरेशनसाठी नर्सिंग होममध्ये जाण्याचा सल्ला दिला.

हर्नियाचे ऑपरेशन फार मोठे होते ते डॉक्टर गरूड यांनी कौशल्याने पार पाडले. केस सिरीयस होती हे मागाहून कळले बाबांच्या कृपेने जीवदान मिळाले. अन् आठवले की बाबांनी ऑपरेशनच्या खर्चासाठीच तीन महिन्याची प्राप्ती मिळवून दिली. ऑपरेशनचे बिल फार मोठे आले.

आश्चर्याची गोष्ट ही की जवळ जवळ त्याच रकमेचा चेक माझ्या बिलापायी माझ्या सहकाऱ्याने नर्सिंग होममध्येच मला आणून दिला. तो आमच्या कामाचा मोबदला म्हणून सॉलिसिटर कंपनीकडून आला होता.

सूनबाईना तो सुपूर्द करताना मला व कुटुंबियाना बाबांच्या या लीलेने थक्क केले !

# श्री साईकृपा

—सौ. नलिनी माधव नाडकर
५ शकुंत श्रीसरस्वती बाग
जोगेश्वरी (पूर्व) मु. ६०

● पाच वर्षापूर्वीची गोष्ट. माझ्या मुलीचे लग्न ठरत होते, मुलगी दाखविण्याचा कार्यक्रम झाला होता व ४ दिवसांनी कळवितो असे त्यांनी सांगितले. तो गुरुवारचा दिवस होता. सकाळी १० वाजता फोन आला. मुलगी पसंत आहे. आम्हा सर्वांना आनंद झाला व बाबांच्या कृपेने हे लग्न जमले, म्हणून मनोभावे बाबांना नमस्कार केला व पेढ्यांचा नैवेद्य दाखविला. परंतु माझ्या आईचे मन—अनेक विचार मनात येत होते. घरातील माणसे कशी असतील? मुलीला कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही ना? मुलगी सुखी होईल का?—अशी विचारांची वावटळ माझ्या मनात येत राहिली. मला आश्वासन हवे होते.

संध्याकाळचा सुमार होता. मी बाबांना दिवा लावला. इतक्यात दार वाजले—दार उघडले. दारात एक १०/१२ वर्षे वयाचा हसतमुख, गोरापान मुलगा उभा! मला म्हणाला, 'ताई उदबत्त्या घेता का? फक्त १। रुपया.' मी लगेच पुडा घेतला. वरती तो त्यावर श्री साईबाबांचे चित्र. आशीर्वादाचा हात व 'गुरुकृपा' एवढीच अक्षरे होती. कंपनीचे नाव गाव काहीच नव्हते. मी ताबडतोब त्या मुलाला घरात बोलावले, त्याच्या हातावर १। रुपया व पेढा दिला. त्या क्षणापासून माझ्या मनातले तर्कवितर्क दूर झाले. प्रत्यक्ष बाबाच येऊन १। रुपया व पेढा घेऊन गेले. मला आशीर्वाद, दिलासा हवा होता तो देऊन गेले. माझे मन शांत केले. ह्याबद्दल मला मनोमन खात्री झाली. कारण तो मुलगा मला नंतर कधीही दिसला नाही व पूर्वी कधीही मी त्याला पाहिला नव्हता. श्री साईमाऊलीच माझ्यासाठी धावून आली होती.

माझ्या मुलीचा संसार सुखाचा चालला आहे. घरदार, पैसाअडका, पतिप्रेम, घरातील माणसे, मुलेबाळे सर्व दृष्टीने ती सुखी आहे व तिची श्रीबाबांच्यावर नितांत श्रद्धा आहे व श्रीसाईकृपा हेच तिच्या व आमच्या सुखी संसाराचे सार आहे. श्री साईनाथांना अनंत प्रणाम!

# बाबांनी मुलगा दिला

३८४

—श्री. डी. बी. जगत्पुरिया
बी. एस्सी. बी. एड. साहित्यालंकार
मु. पो. शिरूड ( सें. रेल्वे )
ता. जि. धुळे ४२४३०८

अंतरमन भक्ताचे जाणूनी,
साई श्रीहरी येई धावूनी।'

● श्री साई समर्थांचे नाव आज कुणालाही अपरिचित नाही. या मंगल नावामुळेच श्री शिर्डी संस्थान विश्वव्यापी झाले आहे. त्यामुळेच आज बाबांना भेटायला त्यांचे दर्शन घ्यायला माणसांची रीघ लागलेली असते.

भक्ताला चमत्कार दाखवून नमस्कार करायला लावणारे बाबा खरोखरच धन्य होत!

आमच्या येथे सतत तीन मुलींनी जन्म घेतल्याने आम्ही फारच नाराज होतो. तसा फक्त मुलीच होण्याचा शाप आमच्या घराण्याला पूर्वीपासूनच आहे. म्हणून मुलगा व्हावा असे आम्हाला स्वाभाविकपणे वाटायचे. या इच्छेच्या तीव्रतेने आम्हाला बेचैन करून टाकले. आम्ही दोघांनी श्री बाबांजवळ मुलगा होण्यासंबंधीची इच्छा व्यक्त केली. ऐपतीप्रमाणे देणगी व प्रसादही कबूल केला. मुलगा झाल्यास त्यास बाबांच्या पायावर टाकू असे ठरवून टाकले, आणि काय आश्चर्य! बाबांनी आमची इच्छा वर्षातच पूर्ण केली. कबूल केल्याप्रमाणे आम्ही सर्व गोष्टींची पूर्तता केली. यासारखे अनेक अनुभव आतापावेतो आलेले आहेत.

मला तर बाबांचे नाव म्हणजे संजीवनी मंत्रच वाटतो. जीवनाचे भरकटणारे तारू सावरण्याची अद्‌भुत शक्ती बाबांमध्ये आहे. मी अनेक मित्रांना बाबांविषयी सांगितले. त्यांनाही असेच अनुभव आल्याने बाबांना चमत्कारी म्हणावे की काय असा विलक्षण संभ्रम अंतरमतीत निर्माण होतो. याला कुणी चमत्कार म्हणो वा कुणी काहीही म्हणो परंतु एक गोष्ट मात्र निश्चित म्हणता येईल की–

अंतरमन भक्ताचे जाणूनी,
साई श्रीहरि येई धावूनी।

● ● ●

# बाबांनी नोकरीस लावले

—सौ. सिंधू कृष्णराव सणस
मु. पो. काटोल, गळनाका जि. नागपूर

• जीवनात मानवाला अनेकदा कठीण प्रसंगाला तोंड द्यावे लागते. अशावेळी आपण काय करावे आणि काय करू नये, असा द्वंद प्रश्न उद्‌भवतो, आपली दिशाभूल होऊन आपण कुठे भलतीकडेच जाणार नाही ना! अशा वादळात सापडल्या नंतर सर्व व्यापी जो परमेश्वर आहे. तोच आपल्याला मदत करतो.

मी फार दुर्दैवी स्त्री आहे. आता पर्यंत दुःखातच काळ घालविला. मात्र माझ्या पाठीशी बाबा असल्यामुळे माझे यत्किंचितहि वाकडे झाले नाही. ‘ साई तारी त्याला कोण मारी ’ हे वाक्य अगदी खरे आहे. बाबांनीच मला ही परिस्थिती दाखविली आहे माझा मुलगा चि. सुदाम हा २४ वर्षाचा आहे. बी. ए. झाला. त्यानंतर एम. ए. पार्ट टूला असताना नोकरीचे विचार सुरू झाले. या जगात सर्वांत श्रेष्ठ म्हणजे पैसा आणि वशीला या दोन वस्तूंचा जगाच्या बाजारात खप होत आहे. त्यामुळे हे तत्व मनाला पटत नाही, आणि पुढेही पटणार नाही. मी परमेश्वरासमोरच वाकेन हे तत्व माझ्या ठिकाणी आहे. माझा वशीला म्हणजे, माझे बाबा.

माझे पती नेहमी म्हणायचे तू काळजी करू नकोस अल्ला देगा, खटियापर, हे त्यांचे नेहमीचे ब्रीद वाक्य आहे. परंतु काही वेळा आपल्याला संताप चढतो पण बाबांच्या मूर्तीकडे बघून मन शांत होते. मला आदले दिवशी बाबांनी स्वप्नात साक्षात्कार दिला. मुलांस ऑर्डर आली एकदम जागे झाले. मी पतींना म्हणाले, सुदामला नोकरी लागेल. असे म्हणून सकाळची शाळा असल्यामुळे ते शाळेत निघून गेले. तरी १२ पावेतो परत आले. माझ्या पतीच्या हाती लिफाफा पडताच त्यांनी आतुरतेने फोडला. आणि खरोखर माझे स्वप्न खरे ठरले. मुलास नोकरी लागली तर मी द्वारकामाईत दीपज्योतीचा कार्यक्रम करीन हा नवस केला होता. यंदा जाण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु बाबांनी बांधून काढले, व येण्यास मार्ग दिला नाही. ३०० मुलां पैकी एका व्यक्तीला नोकरी लागणे कठीण आहे. हे सर्व श्रेय बाबांचेच आहेत. माझे साई चरणी शतशः प्रणाम—

# साई माझ्यावर कृपा ठेवा

--प्रा. गुंडेराव पटवारी
एन. एफ. जे. कॉलेज
बिदर (कर्नाटक)

● १९७५ पासून माझ्यावर साईने कृपा केली आहे. मी त्यांना विसरू शकत नाही. तुम्ही राम म्हणा, तुम्ही कृष्ण म्हणा, काही म्हणा, मला 'साई' ह्या शब्दामध्येच गोडी आहे. साईच माझा खुदा आहे!

१९७५ पूर्वी मला साईबाबा आणि शिर्डी माहित नव्हते. श्रीसाईलीला मासिक माहित नव्हते. विचित्र योगायोग, माझे दैव, माझी पूर्व पुण्याई, एका मित्राने मला शिर्डीची वाट दाखवली. साई दर्शनाकरिता शिरर्डीस गेलो. भाग्याचे उदय आले. श्री साईलीला प्रथम लेखक कवि संमेलनास हजर झालो. बाबांच्या कृपेने दरवर्षी संमेलनास हजेरी देतो. एक एक संकट दूर होत चालले. मुलं मुली शिकू लागली. मोठी मुलगी सौ. मीरा नाईकचे लग्न झाले. बी. ए. उत्तीर्ण झाली. मोठा मुलगा पण बी. ए. पास झाला. गत ज्येष्ठ मासात त्याचे लग्न झाले. मी रोगमुक्त झालो. आर्थिक संकटे एक एक पायरीने दूर होत गेली. ही सर्व साईची कृपा.

६ व्या लेखक कवि संमेलनाला माझ्या बरोबर माझी मुलगी आपल्या पतीबरोबर शिर्डी बाबांच्या दर्शनाला आली होती. त्यावेळी मी बाबांजवळ भीक मागितली. 'साई माझ्या मुलीला एक मुलगा द्या.' एका वर्षानी तिला मुलगा झाला. त्याचे नाव साई प्रकाश ठेवण्यात आले.

गत २० मे १९८२ च्या रोजी आमच्यावर फार भयंकर संकट आले. एक मोठे भांडे साईप्रकाशच्या पायावर पडले, आणि त्याचे डाव्या पायाचे फ्रॅक्चर झाले. दवाखान्यात डॉक्टरानी एक्सरे काढले. पायाला प्लास्टर घालून त्या लहान मुलाला बेडवर घातले. तो बेहोष होता. साईंना सोडून आता आमचे कोण? म्हणून मुलगी सौ. मीरा नाईक रडू लागली. धैर्य देऊन बाबांची उदी लावली. पाण्यातून उदी दिली. साईप्रकाश होशमध्ये आला. डॉक्टरांना धैर्य आले. एक महिन्यापर्यंत तो दवाखान्यात होता. साई प्रकाश, श्री भगवान साईबाबांच्या कृपेने वाचला. सौ. मीरा नाईक ही पण बाबांचा भक्त आहे.

आता साईप्रकाश खेळू लागला आहे. आम्ही रोज १९८३ चे श्री साईलीला मासिकाचे लेखक कवींच्या संमेलनाची वाट पहात आहोत. कारण पुन्हा साईप्रकाशला घेऊन बाबांचे दर्शन करावे ही इच्छा आहे.

मी रोज मनापासून बाबांना म्हणतो, 'बाबा अशीच कृपेची सावली आमच्यावर ठेवा.' श्रीसाईसच्चरित कारांनी म्हटले आहे–

**'आपुली माय आपुली जतन,**
**करील ती अन्य कोण करी!'**

एक ऐसी उपन्यास जिसकी बराबरी साई बाबा के जीवन पर लिखी अन्य कोई भी पुस्तक करने न पायी। यह है पाटकों की प्रतिक्रिया।

हिन्दी अनुवाद : **आद्या प्रसाद त्रिपाठी**, एम्. ए. रघुनाथ शं. जुवारकर द्वारा लिखीत मूळ मराठी उपन्यास

**प्रगटे मस्जिद में साई भगवान!** Rs. 45/-

**'मशिदीत प्रगटला परमेश्वर!'** (बिक चुकी) और अंग्रेजी

**"A MISSION DIVINE!"** Rs. 45/-

(शीघ्र ही खतम होगी)

का सुन्दर भाषान्तर दशहरा के दिन साई भक्तों के लिए एक अनोखा उपहार जो हृदय को जीत लेना है–हृदयात्मा का दर्शन कराता है। अवश्य अनुभव करें।

**प्रशान्ती प्रकाशन** : ५ वसंत अपार्टमेंटस, कस्तूर पार्क
शिंपोली रोड, बोरीवली (प.)
बंबई ४०००९२

३४६

# श्रीसाई श्रद्धा

—सौ. लता उर्फ दिपा सतीशचंद्र ढापरे
पोस्ट मोठी दमण ( केंद्रशासित )
स्टे. वापी, पीनकोड ३९६२२०

● आमचे ढापरे कुटुंब बरेच वर्षापासून श्री साईभक्तीचें सेवाभावी असल्या-कारणाने श्री बाबांच्यावर संपूर्ण श्रद्धा आहे. अशाच श्रध्देचे फळ आम्हास अलिकडेच लाभलेले आहे ती हकीगत वाचकास सादर करीत आहे.

माझे यजमान श्रीयुत सतीशचंद्र चिंतामण ढापरे हे मोठी दमण येथील गुज-राथी प्राथमिक शाळेत शिक्षकाची नोकरी सांभाळून घरचे घरी अभ्यासक्रमांचे वाचन करून गेल्या साली गुजरात युनिव्हर्सिटीची बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. नोकरी सांभाळून अभ्यास क्रमांचे वाचन करणेस योग्य समय मिळत नसल्याने व येथे टयूशन घेणे, कोचींग क्लासात जाणे वगैरे सारखी साधने नसल्याने पुढील अभ्यासक्रम कर-णेचा विचार रहित करावा लागला. परंतु ज्यावेळी पुढील अभ्यासक्रमाच्या परीक्षा देणेची मुदतीची अखेर तारीख आली त्यादिवशी एकाएकी प्रेरणा मिळाल्याने श्री बाबांचेवर श्रद्धा ठेवून, मनःपूर्वक प्रार्थना करून एम. ए. पार्ट १ परीक्षेसाठी गुजराथ युनिव्हरसिटी अहमदाबादकडे जरूरी फी रक्कम भरपाई देऊन फार्म भरून पाठविणेत आला.

परीक्षा मे १९८२ ला होणार आहे त्या समय कालात अभ्यास क्रमांची पुस्तके अहमदाबाद मुंबई, सूरत वगैरे शहरातील पुस्तकालयाकडे संपर्क साधून, पुस्तके मिळ-वून जो काही अभ्यास वाचन होईल तो करून नियतसमयी परीक्षेस हजर राहिले. परीक्षा पेपर लिहिताना पास होणेची आशा नव्हती. मात्र जे काही सुचले ते योग्य तऱ्हेने लिहिणे केले. या परीक्षेचा निकाल जुलै १९८२ चे दुसऱ्या आठवड्यात जाहिर झाला त्यात माझे यजमान श्री. एस. सी. ढापरे एम. ए. पार्ट १ गुजराथ युनिव्ह-रसिटी अमदाबाद परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वाचून ‘श्री बाबांनी श्रध्देचे फळ’ दिले याचा सर्वांस आनंद झाला.

अशीच आपल्या सर्वांवर बाबांची सदैव कृपादृष्टी असो हीच प्रार्थना.

● ● ●

# साईबाबा हेच आमचे विठोबा, ज्योतिबा, खंडोबा

—प्रा. डॉ. अ. का. पाठक
पाठकवाडी, गोरेगाव, मुंबई

● पंढरीचा विठोबा हे महाराष्ट्राचे दैवत आहे. महाराष्ट्रात अनेक घराण्याचे दैवत आहे ज्योतिबा. माझ्या आजोळच्या घराण्याचे दैवत खंडोबा आहे. पण आमच्या घराण्याचे दैवत मात्र आम्हाला अज्ञात आहे. विठोबा, ज्योतिबा, नागोबा, खंडोबा ही महाराष्ट्रात सुप्रसिद्ध दैवते आहेत. पण आमचे दैवत आहे. 'साईबा'.

साईबाबांना आम्ही आमचे दैवत मानले आहे. ते माझ्या घराण्याचे कुल दवत झाले आहेत. माझ्यावर खोटी चवकशी लादली गेली होती. प्राचार्यपद हिरावून घेण्यात आले होते. प्राध्यापकपदही धोक्यात आले होते. तेव्हा मी श्रीसाईनाथांचा धावा करू लागलो, आणि लेखक कवी सम्मेलनाच्या निमित्ताने मला आमंत्रण आले. भिवंडीत एक मालाडचा व्यापारी एस. टी. मध्ये माझ्या शेजारी बसला होता. त्याने श्री साईनाथांच्या कथा मला सांगितल्या आमची एस. टी. रात्री ११॥ नंतर शिर्डीला पोहोचली. स्टँडवर उतरलो तर अचानक थंडीची हुडहुडी भरली. त्या व्यापाऱ्याने मला चहा घेण्याचा आग्रह केला. स्टँडवरच चहा घेतला व थंडीची हुडहुडी आटोक्यात आली. गुरुस्थानी ४१ ब मध्ये जागा मिळाली.

श्रीसाईनाथांचे प्रत्यक्ष दर्शन घेतलेले तपोवृद्ध साईभक्त श्री चितांबर माझ्या खोलीत होते. त्यांचा सत्संग आम्हाला मिळाला. गुरुस्थानी क्र. ४१ मध्ये मी, श्री चितांबर व मालाडचा व्यापारी, असे तिघे होतो. मालाडच्या व्यापाऱ्याने आम्हाला रात्री सांगितले की त्याची पत्नी शिरडीची आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी सम्मेलन, अभिषेक व श्रीसाईसत्यनारायण पुजे पर्यंत हा व्यापारी बंधू माझ्याबरोबर होता. व दुपारच्या एस. टी. ने तो मुंबईला गेला. गेल्या तीन वर्षात शोध करूनही ह्या व्यापारी बंधूचा पत्ताच नाही.

साईभक्त श्री चितांबरांच्या सत्संगात शिर्डीचे दोन दिवस आनंदात गेले. श्री साईलीलाचे संपादक श्री. चेंदवणकरांचा सत्संग प्राप्त झाला. शिर्डीहून मी बाबांचे दर्शन घेऊन परतलो, आणि चौकशीचे प्रेझेंटिंग ऑफिसर काझींना काढून टाकल्याची बातमी शासनाने मला कळवली. माझा पहिला विजय श्री साईरामांच्या कृपेने असा नोंदवला गेला.

श्री. शरदराव गाळवणकरांच्या श्री साईबाबा चित्रपटाचे आमंत्रण मला मिळाले. त्या चित्रपटावर मी माझे भाष्य लिहिले. साईभक्त गाळवणकरांना ते आवडले. त्यांनी मला शिर्डीचे आमंत्रण दिले. आम्ही एस. टी. ने शिर्डीस निघालो. नासिकला हॉटेलात गेलो व परतलो तर एस. टी. निघून गेली होती. साईभक्त गाळवणकरांनी सोन्याचे दागिने समाधीवर ठेवण्यासाठी बरोबर घेतले होते. सर्वांचे सामान एस. टी. त राहिले. आमची पाचावर धारण बसली. घाबरगुंडी उडाली. स्टँड कंट्रोलर आमचे ऐकेना. आमच्या तोंडचे पाणी पळाले. हजारो रुपयाचा आमचा माल एस. टी. त होता. काय करावे ते सुचेना. श्री साईश्यामचा धावा केला. स्टँड कंट्रोलरचे मन बदलले. दुसऱ्या एस. टी. ने आम्ही निघालो. कंट्रोलरने फोन करून पुढील स्टॉपला सूचना दिल्या. आम्ही साईनाथांचे भजन गाऊ लागलो. पुढच्या स्टॉपला पूर्वीची एस. टी. मिळाली. सामान सुरक्षित होते. श्री साईबाबांचा सर्वांनी जयजयकार केला. सर्व पूर्वीच्या एस. टी.ने सुखरूप पोहचलो. साईकृपेने हजारो रुपयांच्या दागिन्यांचे रक्षण झाले. शिर्डी आली व आमचा जीव भांड्यात पडला.

शिर्डीत श्री साईनाथांची मी करुणा भाकली. अभिषेक केला. मुंबईत परतलो तर सात महिन्याची रजा मान्य झाल्याचे व पगाराचे पत्र मिळाले. तीन वर्षात, तीन वेळा श्री साईबाबांनी मला वाचवले आहे. श्रीविठोबा, खंडोबा, ज्योतिबा प्रमाणे श्री साईबा आमचे कुलदैवत आहे. जय श्री साईनाथ महाराज. ॐ श्री साई तत् सत्.

## श्रीसाईलीला

लेखक–कवींना जाहिरातदारांना महत्वाची सूचना

श्रीसाईलीलाकडे पाठविला जाणारा कोणताही मजकूर संपादक श्रीसाई लीला, साईनिकेतन, ८०४ बी डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई ४०० ०१४ याच पत्त्यावर पाठवावा.

लेखक–कवींनी आपल्या साहित्यासोबत पुरेसे टपाल हशिल पाठवावे म्हणजे साहित्य नापसंत असल्यास ते त्वरीत परत पाठविता येईल. पुरेसे टपाल हशिल नसलेले नापसंत लेख निकालात काढले जातील.

लेख पाठविताना ते कागदाच्या एकाच बाजूस भरपूर समास सोडून सुवाच्य अक्षरात नवीन शुद्धलेखन पद्धतीचे नियम लक्षात घेऊन पाठवावेत—

का. संपादक

# मला घडलेले माझ्या साईमाऊलीचे प्रत्यक्ष दर्शन

—सौ. उषाताई अधिकारी
सावित्री सदन, बंदररोड, रत्नागिरी

● २१ जून १९८० ला माझ्या एका डोळ्याचे ऑपरेशन श्रीसाई कृपेने चांगले होऊन मला चांगले दिसूही लागले. मे १९८१ ला मी शिरडीस जाऊन श्री बाबांचे मनोहारी रूपाचे दर्शनही घेऊन आले त्यावेळी दुसऱ्या डोळयात पुसटही मोतीबिंदू नव्हता पण जानेवारी १९८२ पासून मला कमी दिसू लागले. डॉ. कडे फेऱ्या सुरू झाल्या. मोतीबिंदूचे निदान झाले पण तयार झालेला नव्हता. मी बाबांची उदी पाण्यात कालवून ते पाणी गाळून डोळयात थेंब घालू लागले. एप्रिल ८२ पर्यंत मी शाळेत व्यवस्थित काम केले पण मला नंतर अगदी कमी दिसू लागले. डॉ. नी मोतीबिंदू तयार झाल्याचे सांगितले मे महिन्यात उन्हाळा फार म्हणून ऑपरेशन जूनमध्ये चांगला पाऊस पडल्यावर करायचे ठरले.

जूनचा पहिला पंधरवडा संपत आला तरी पावसाचे चिन्ह नव्हते. माझे पती चिपळूणला एस. टी. चे डेपोमॅनेजर आहेत त्यांना सिझनमुळे रजा मिळाली नव्हती ती नेमकी १६ जून ते १५ जुलै अशी मिळाली. ते १५ तारखेला इथे आले. त्याच दिवशी पुन्हा डोळे तपासून ऑपरेशन नक्की झाले. मी थोडं थांबा म्हणत होते पण ह्यांचा शब्द म्हणजे वज्रलेप. तो कोण बदलणार ? मी मोतीबिंदू तयार झाला आहे हे कळताच माझे मानस बंधू श्री. पुजारी, सदानंदभाई चेंदवणकर यांना पत्रं पाठवली होती. मनाला धीर देणारी, दिलासा देणारी त्यांची पत्रं मला आली होती. ऑपरेशनला २५ तारखेला हॉस्पिटलमध्ये संध्याकाळी admit व्हायचे होते. मी त्या दिवशीही साई-बंधू भगिनींना पत्रे पाठवली. संध्याकाळी साईनामाचा जप करून, अध्याय वाचून मी हॉस्पिटलमध्ये गेले. जाताना श्री बाबांचा सुंदर फोटो छापलेला योगसिध्दीचा अंक व श्रीबाबांचे वस्त्र बरोबर घेतले. हे प्रसाद वस्त्र कुठेही गावी जाताना माझ्याबरोबर असते आणि प्रत्येक वेळेला ते मला धीर देते असा माझा अनुभव आहे. तसेच श्री बाबांच्या वस्त्राचा मी एक ब्लाऊज पण शिवून तो संकट प्रसंगी घालते.

शनिवारी पहाटे उठून मी आंघोळ केली. श्री बाबांची मानस पूजा करून उदी घेतली. एक पुडी रुमालात बांधून कंबरेला खोचली. मी श्रीबाबांना वंदन केले. माझ्या

वृद्ध सासूबाई व पतीराज ह्यांनाही नमस्कार केला. माझी ज्येष्ठ कन्या घरी होती. पहाटे उठून तिने आंघोळ करून श्री बाबांची साग्रसंगीत पूजा करून हार घालून अध्याय वाचून ती हॉस्पिटलमध्ये आली होती. जे मला करता येणार नव्हते ते मी तिला करायला सांगितले होते. धाकटी कन्या भीतीने एकटीच घरी राहिली होती. बरोबर ७ ला डॉक्टर आले व मला ऑपरेशन थिएटरमध्ये चलायची खूण केली. मी श्री बाबांचे वस्त्र पांघरले. आत न दिसेल असा श्री बाबांचा १९१५ साली काढलेला छोटा फोटो ठेवला. उदीची पुडी घेतली. मोहपाशात मन अडकायला नको म्हणून कुणाकडेही न पाहता मी ऑपरेशन थिएटरमध्ये गेले. उशीखाली हळूच उदीची पुडी ठेऊन ऑपरेशन झाले की काढून घ्यायला कंपौंडरला सांगितले.

डॉ. आले. मी श्री बाबांना नमस्कार केला व आडवी झाले. मला श्रीसाईसच्चरिताचे ११ व १५ अध्याय पाठ आहेत त्यातला ११ वा अध्याय त्यावेळी म्हणायचे मी ठरवले होते. पण श्रीबाबांची तशी इच्छा नसावी. माझे तोंडून आपोआपच 'साई राम–साईराम' असा जप सुरू झाला. डॉ. नी ऑपरेशन सुरू केले. 'डोळा दुखला, इंजेक्शन दुखले तरी हलू नका, ओरडलात तरी चालेल.' असे डॉ. म्हणाले. मी हसले. पण काहीच बोलले नाही. माझे डोळे झाकलेले होते. ऑपरेशन पुरता तो डोळा जरूर तेवढाच त्यांनी उघडा ठेवला होता. एकंदर ३ डॉक्टर होते. एक ऑपरेशन करत होते. दुसरे माझ्या छातीवर हात ठेवून होते. तिसरे डॉ. ना मदत करीत होते. पण माझ्या निकट कुणीतरी होते. मी आठवत होते...कंपौंडर होता पण तो काम नसल्याने लांब दाराकडे उभा होता. मग माझ्या इतके जवळ कोण असेल बरे!

मनात असे विचार येतात तो भिक्षेच्या वेळी श्री बाबांचा जो फोटो आहे तो तसेच श्री बाबा माझ्या जवळ असलेले मला दिसले. आता भीती कसली? मी ऑपरेशन पूर्ण होईपर्यंत हूं का चूं केले नाही. डॉ. खूष झाले. मला नंतर माझ्या कॉटवर ट्रॉलीवरून नेण्यात आले. कंपौंडरने चलाखी करून पुडी काढून माझ्या कॉटवर उशीखाली ठेवली होती. ऑपरेशन पूर्वी डॉ. नी झोपेची गोळी दिल्याने मला झोप येऊ लागली. मी काही वेळातच झोपी गेले.

१/१॥ च्या सुमारास जाग आली. त्या दिवशी नुसते दूध घ्यायचे व दुसऱ्या दिवशी ८ वाजेपर्यंत एका स्थितीत हालचाल न करता पडून रहायचे असे सांगितलेले होते. पण ३ चे सुमारास माझे सगळे अंग दुखू लागले. ४ चे दरम्यान तर अतिशय वेदना होऊ लागल्या कंबर इतकी अनावर दुखत होती की रडू येऊ लागले पण डोळ्यात पाणी आणायचे नाही अशी डॉ. ची सक्त ताकीद. माझे हाल ह्यांना पाहवेनात. ते

म्हणाले, रडू नको जरा सोस. थोड्या वेळात डॉक्टर आले की वेदनाशामक इंजक्शन द्यायला सांगतो.' मला पित्त विकार असल्याने वेदनाशामक गोळ्या द्यायला बंदी होती मी तळमळतच होते. सहन होत नव्हते. उठावे व पळत सुटावे अशी मनाची स्थिती झाली.

शेवटी श्रीबाबांना हाक मारावी म्हणून मनातल्या मनात प्रार्थना करू लागले. बाबा, मी तुमची जमेल तशी भक्ती करीत आहे, सेवा करीत आहे. हे हाल किती सोसू ? ते सोसायला मला शक्ती द्या. या गरीब लेकीवर कृपा करा. माझी ही स्थिती फक्त आपल्यालाच कळेल. सगळ्यांच्या अंर्तयामी जी दुःखे आहेत, संकटे आहेत ती निवारण करण्याचे सामर्थ्य केवळ आपल्यालाच आहेत. बाबा, बाबा असे मी ओरडू लागले. ते ओरडणे बाहेर फुटून लोकांना ऐकू जात नव्हते. माझे पती माझ्या जवळ बसून होते.

इतक्यात चमत्कार झाला. माझ्या दोन्ही बांधलेल्या डोळ्यांना भिंतीवर श्री बाबांचे एक भलेमोठे कॅलेंडर दिसले. इतके मोठे की मी माझ्या ५० वर्षांच्या आयुष्यात एवढे कॅलेंडर बघितलेले नाही. त्या कॅलेंडरमध्ये आपल्या भक्तगणात श्री बाबा उभे होते. ते त्यांच्यात उभे होते पण त्यांचे लक्ष माझ्याकडे होते. कॅलेंडर मधून खाली उडी मारुन श्रीबाबा खाली उतरले. कितीतरी उंच, बारीक पण तेजस्वी अशी त्यांची मूर्ती होती ती ! माझ्याकडे प्रेमळ पणाने पहात ते म्हणत होते, 'रडू नको, रडू नको मी आहे ना !' म्हणता म्हणता हात हालवीत ते आपल्या छातीवर ठेवत होते. मी टक लावून पुन्हा पुन्हा त्यांचेकडे पहात होते मला गहिवरून आले. गहिवर येता येता हसूही आले. मी हसताच श्रीबाबा हसले व आशीर्वादाचा हात दाखवून गुप्त झाले. आता ते कॅलेंडरही नाहीसे झाले आणि हळूहळू माझ्या वेदना कमी होत पूर्ण नाहीशा झाल्या.

६॥ चे सुमारास डॉक्टर चौकशी करायला आले. पण मी विव्हळत नव्हते रडत नव्हते त्यांना आश्चर्य वाटले. ते म्हणाले, 'काय इंजक्शन घेणार ना !' मी चटकन् म्हणाले, 'आता इंजक्शनची आवश्यकता नाही. मला खूप बरं वाटत आहे. जवळजवळ १० तास मी एका स्थितीत आहे. थोडी कुशीवर वळायची परवानगी द्या डॉक्टरनी आपल्या नजरे समोरच मला कुशीवर वळायला लावले. थोडावेळ त्या स्थितीत रहाताच मला आणखीन बरे वाटले. डॉ. आपल्या दवाखान्यात निघून गेले. थोड्या वेळाने माझ्या कन्या आल्या त्यांना मी शांतपणे पडलेली पाहून आश्चर्य वाटले मी फक्त त्यांनाच काय घडले ते सांगितले. त्या भिंतीकडे पाहून म्हणाल्या, इथे तर

बाबांचे एकही कॅलेंडर नाही ' खरंच एका भिंतीवर गणपतीचे कॅलेंडर माझ्या कॉट-जवळ होते व इतर भिंतीवर निरनिराळ्या धर्माची द्योतक असलेली कॅलेंडर्स होती. तिथे कॅलेंडर नसले तरी श्रीबाबा माझे सर्वस्व असल्याने त्यांनी मला योग्य वेळी दर्शन देऊन कृतार्थ केले. तृप्त केले..

दुसरे दिवशी डोळा सोडला. एका डोळ्याने मला पाहता येऊ लागले. माझ्या शेजारच्या कॉटवर एक म्हातारे मुसलमान गृहस्थ होते त्यांच्या मानेची शीर दुखत होती. रक्ताभिसरण नीट झाले नाही की ती दुखे, मग ते रात्र-रात्र ओरडत जागेच असत. मी त्यांना म्हणाले, आमच्या बाबांवर आपला विश्वास आहे का ? त्यांची उदी लावा. तुम्हाला बरे वाटेल. ते त्या दुखण्याला वैतागले होते. ते म्हणाले, ' बाय, आण तुझी ती उदी. त्यांच्या पत्नीने मानेला उदी लावली त्यांना पाण्यातून पाजली. दोन रात्री ते न ओरडता शांत झोपले. तिसऱ्या दिवशी सकाळी हसत मुखाने मला म्हणाले, ताई, आजपासून तू माझी बहीण झालीस मला एकदा दादा म्हण. आज मी बरा आहे. डॉक्टर म्हणतात की किरकोळ ऑपरेशन मुंबईला जाऊन करावे लागेल पण धोका नाही. निर्धास्तपणे जा. तू तुझ्या साईबाबाची उदी दिलीस त्याचाच हा परिणाम. ऑपरेशन झाले की मी पण शिरडीस जावून त्यांचे दर्शन घेऊन येईन. मला फार बरे वाटले. त्याच दिवशी ते कोल्हापूरमार्गे रेल्वेने मुंबईला गेले. या ऑपरेशन-मुळे मला श्रीबाबांचे पुनीत दर्शन २ वेळा घडले. शिवाय परधर्मीय मनाचा कनवाळू असा एक भाऊही लाभला ! श्रीबाबांना मी कितीवेळा नमन करू ! किती वेळा केले तरी ते अपुरेच पडणार आहे.

# बाबांनीच मोटार बंद पाडली व धोका टाळला

— सौ. मंदाकिनी इनामदार
स्नेहसागर, प्रभादेवी, मुंबई

● श्री. चेंदवणकरांच्या आमंत्रणावरून लेखक-कवि संमेलनासाठी आम्ही श्रीक्षेत्र शिर्डीस चाललो होतो. दुपारी दोनच्या सुमारास मुंबईहून निघून ५॥ वाजता नासिकला पोचलो. येथपर्यंत हवा अत्यंत प्रसन्न आल्हादकारी होती. पुढे सिन्नरकडे जाताना किंचित ढगाळलेले आभाळ दिसू लागले. मग पावसाचे तुषार उडू लागले. नंतर संगमनेरला तर जोराचा पाऊस व विजांचा लखलखाटच चालू झाला. फक्त ७–७॥ चा सुमार पण अंधार गुडूप झालेला, पुढचा रस्ता अजिबातच दिसत नव्हता. रस्ता नाल्यासारखा तुडुंब भरून वाहात होता. अशात पावसाळा नसल्याने आम्ही गाडीला वायपर्स पण लावले नव्हते. गाडीत मी माझे मिस्टर इनामदार–माझ्या मुलीचे वयस्कर सासूसासरे व आमची छोटी ३॥ वर्षांची नात श्रुति. नदीरुपी रस्त्यात आमची होडीरुपी गाडी जणू तरंगतच चालली होती. आम्ही सर्वजण घाबरून गेलो होतो. पुज्य गुरूना (स्वामीजी) स्मरून साईंचा नावाचा धावा सुरू केला आणि आश्चर्य म्हणजे लोणी येईपर्यंत पाऊस थांबला आणि शिर्डीला तर पावसाचा गंधच नव्हता. आम्ही ८॥ वाजता सुखरुप गुरूस्थानाला पोहचलो. सोमवारी संध्याकाळी ७॥ वा. शिर्डीहून नाशिकला निघालो. परत येताना आमच्याबरोबर डॉ. श्री. परचुरे होते. रात्र झाल्यामुळे प्रवास करू नये असे प्रत्येकाना वाटायचे पण झोपण्यापूर्वी नाशिकला जाऊ म्हणून श्री. इनामदारांनी गाडी सुरू केली, वाटेत प्रवरानगरला आमचे एक स्नेही डॉ. देशपांडे राहतात. या पतीपत्नींची आम्हास शिर्डीत भेट झाली. (२५ वर्षानंतर) त्यांना आम्ही त्यांच्या घरी जाता जाता चहा घेऊन जाण्याचे कबूल केले म्हणून रात्री ८ च्या सुमारास शोधत शोधत त्यांच्या घरी गेलो. कुणीही गाडीतून न उतरता फक्त त्यांचा निरोप घेऊन जायचे ठरले. त्यांच्या अगदी घरासमोर गाडी थांबवून आम्ही आमची अडचण सांगितली व पुढे जाण्याकरिता यांनी गाडी सुरू केली पण...बॅटरी डाऊन. काही केल्या गाडी सुरू होईना. रात्रीचा प्रवास बरोबर लहान मुलगी म्हणून सर्वांनी रात्री प्रवरानगरला श्री. देशपांडे यांच्या घरी मुक्काम करायचा विचार केला व त्यांच्या घरी त्यांच्या प्रेमळ पाहुणचारांचा लाभ घेतला. सकाळी ६ वाजता यांनी गाडी सुरू करण्याचा नुसता प्रयत्न तरी करावा म्हणून पाहतात तो गाडी एकदम ठीक. अगदी विश्वास न बसण्यासारखा चमत्कार झाला

होता. तेथून नंतर श्रीक्षेत्र नाशिक, त्र्यंबकेश्वर वगैरे यात्रा करून आम्ही व्यवस्थित मुंबईला पोहचलो.

नंतर समजले की त्या रात्री घाटात दोघाना लुटले होते बाबांनीच आमची अशी काळजी घेतली.

## स्वामी मुक्तानंद परमहंस यांचे निर्वाण

वज्रेश्वरी येथील गणेश पुरी आश्रमाचे प्रमुख स्वामी मुक्तानंद परमहंस यांचे रविवार ता. ३ ऑक्टोबर १९८२ रोजी पौर्णिमेच्या दिवशी रात्री निर्वाण झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ७४ वर्षांचे होते.

स्वामी नित्यानंद यांचे शिष्य म्हणून परिचित झालेले स्वामी मुक्तानंदजी गेली ४० वर्षे गणेशपुरीच्या आश्रमात राहात होते तर अलिकडची वीस वर्षे ते आश्रमाचे प्रमुख होते. ते कर्नाटकातून इकडे आले. सर्व जगात त्यांचा शिष्य परिवार फार मोठा होता. गणेशपुरीचा आश्रम परिवारांनी नेहमी गजबजलेला असे. अमेरिकेसह इतर काही ठिकाणी त्यांनी आपल्या आश्रमांची स्थापना केली होती.

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे व स्वामी मुक्तानंदांचे संबंध अगदी निकटचे होते. शिरडीच्या लेंडी बागेतील साईनिवास या भव्य वस्तूचा शिलान्यास समारंभ स्वामीजींच्याच शुभहस्ते पार पडलेला होता. स्वामीजी आणि त्यांचे शिष्यवृंद यांनी शिरडीस अनेकदा भेट दिली होती व तत्कालीन न्यायालय धारक श्री. का. सी. पाठक साहेब यांनी त्यांचा व त्यांच्या शिष्य परिवारांचा यथोचित् सत्कारही केला होता.

स्वामी मुक्तानंद यांनी स्वामी नित्यानंद दुसरे व स्वामी चिद्‌विलासनंद यांना आपले उत्तराधिकारी म्हणून काही दिवसापूर्वीच निवडले होते.

स्वामी मुक्तानंदांच्या निर्वाणाने श्रीसाईबाबा संस्थानचे एक निकटवर्ती कायमचे दृष्टी आड झाले आहेत. त्यांच्या शिष्यपरिवारांच्या व श्रीगुरुदेव सिद्ध पीठ गणेशपुरी आश्रमवासीयांच्या दुःखात श्रीसाईलीला व श्रीसाईबाबा संस्थान सहभागी आहे. स्वामीजींच्या आत्म्याला चिरसद्‌गती लाभो हीच श्रीसाईचरणी प्रार्थना.

# जगत जननी दुर्गाभवानी म्हणजेच साईबाबा

—श्री. नंदकुमार राजाराम वेलवलकर
१९/३ राजाराम भुवन, टिळकनगर
एम. जी. रोड गोरेगाव मुंबई ६२

● साईबाबांच्या उदीने माझे प्राण वाचल्यामुळे माझ्या वडिलांची साईबाबांच्या-वर अतिशय श्रद्धा बसली. आमच्या घरात नित्य नेमाने साईबाबांची पुजा आरती होऊ लागली. मी किशोर अवस्थेत असतानाच पहिला महान चमत्कार साईबाबांनी मला दाखविला.

मी दर दिवशी सकाळी भगवान शंकराचे पिंडीवर अभिषेक नित्य नेमाने करी व संध्याकाळी देव्हाऱ्यात निरांजन लावून, सर्व देवांच्या तसबिरी समोर उदबत्ती फिरवून शांत चित्ताने श्री शिवस्तुति म्हणत बसत असे. अशाच एका संध्याकाळी भक्तिभावाने बसलो असताना माझी दृष्टी साईबाबांच्या तसबिरीवर स्थीर झाली. माझ्या मनात त्यावेळी एक विचित्र विचार आला.

हे साईबाबा आहेत तरी कोण ? साईबाबांची पुजा तरी का करायची ? एवढी दैवते आहेत ती सोडून साईबाबांची पुजा का करतात ? तसेच आपण हिंदू आणि ह्या मुसलमानाची आपण पुजा का करावी ? ह्या विचारांच्या फेऱ्यात मी गुरफटलो असतानाच साईबाबांच्या तसबिरीत प्रत्यक्ष अष्टभुजा दुर्गाभवानी उभी राहिली. थोड्या सेकंदात पुन्हा साईबाबा हा प्रकार तिनवेळा झाला व एक गंभीर ध्वनी निनादला. आता तरी मी कोण हे समजले ना ?

त्याचवेळी माझी पक्की खात्री झाली की साईबाबा म्हणजे निर्गुण निराकार प्रकटलेले एक परमेश्वरी अवतारच आहेत. मी त्यावेळी साईबाबांच्या समोर प्रेमाश्रूनी साष्टांग दंडवत घातले. त्यावेळेपासून आजपर्यंत सर्वांना माझे एकच सांगणे आहे की साईबाबा हे प्रत्यक्ष सृष्टी रचनाकार परमेश्वर आहेत.

●

# 'शरणांगता अभय देई साईमाऊली'

—कमला पां. गोरे
म्युनि. जी बिल्डिंग खो. नं. १०
सायन भंडारवाडा मुं. नं. २२

● तो दिवस २८ मे १९८२ चा शुक्रवार. संध्याकाळी सातचा सुमार होता. भाचीचा मुलगा अनिकेत, वय वर्षे पाच, इंग्लीश पहिलीला, रहाणार डोंबिवली. याला घेऊन मी सायनला इंदिरा मार्केटमध्ये गेले होते, घरी परत येताना एके ठिकाणी मी फुलझाडांना माती घेण्यासाठी थांबले. माती मिळाली नाहीच. पण एका मिनिटात अनिकेत मात्र हरवला. तो माझ्या पदराला धरून उभा होता. पण काय झाले कोण जाणे अनिकेत माझ्याजवळ नव्हता. तो हरवला खरा पण त्याच्या रडण्याचासुद्धा आवाज आला नाही.

मी इकडे तिकडे शोधू लागले पण हाय ! तो मला कोठेच दिसेना. मग मात्र माझ्या डोळ्यापुढे काजवे चमकले. कारण संध्याकाळी रस्त्यावर वाहनांची रेलचेल. अशावेळी हा गेला कोठे ? अनेक प्रश्न मनात डोकावू लागले. निराशेने मन ग्रासून गेले, आणि संकटकाळी धाव घेणाऱ्या श्री साईमाऊलीचा धावा सुरू झाला. जो जो मं त्याला शोधते तो तो अनिकेत मिळणे कठीणच वाटू लागले. श्रीबाबांचा धावा चालूच होता. बाबा धावा तुमच्या लेकीला संकटातून मुक्त करा. लोकांचे अपशरण माझ्यावर येऊ देऊ नका. तुम्हीच मदत करून त्याला घरी नेऊन सोडा असा प्रार्थना घोष चालूच होता.

कारण माझी बाबांवर पूर्ण श्रद्धा आहे. 'शरण मज आला आणि वाया गेला दाखवा दाखवा ऐसा कोणी' या वचनाप्रमाणे मी बाबांना शरणच गेले होते. सात वाजल्यापासून शोधता शोधता रात्रीचे आठ सव्वा आठ झाले. मग मात्र मी गर्भगळीत झाले. एक मन निराश झाले. पण दुसरे मन मात्र म्हणते की श्री बाबांनी त्याला घरी नेलाच असेल.

शोध घेत फिरत असता एके ठिकाणी रस्त्यावर श्री बाबांचे छायाचित्र काढलेले दिसले. त्या साई दर्शनाने मला फार मोठा आशेचा किरण मिळाला. श्री बाबांच्या छायाचित्राजवळ पाच मिनिटे उभी राहून मनोमन बाबांची प्रार्थना केली. 'बाबा,

तुम्ही भक्तांच्या संकटाला धावून जाता. मग माझेही संकट आपणच दूर करणार. मी जर तुमची भक्ती मनोभावे करीत असेन आणि ती तुम्हाला पावन होत असेल तर अनिकेतला आपणच कोणत्याही रूपाने का होईना घरी नेऊन सोडलेले असणार आणि माझ्या जीवनाचे भवितव्य आपल्याच हातात आहे. तो जर मला घरी गेलेला दिसला नाही तर मी माझ्या जीवाचे बरेवाईट करेन.' अशी प्रार्थना करून धावत घरी आले. आणि माझ्या श्री बाबांची काय किमया! अनिकेत हसत खेळत घरी आहे असे दिसले.

मी मनोमन बाबांना नमस्कार केला. घरी मी येईपर्यंत काय प्रकार झाला हे कोणालाच माहित नव्हते. कारण घरी जेव्हा तो एकटाच आला, तेव्हा घरी दुसऱ्या वहिणीने त्याला विचारले काय रे आलास! तेव्हा तो म्हणाला हो! मला मावशीने म्हणजे (मी) आणून घरापर्यंत सोडले, व मी कोठे गेले त्याला समजले नाही. तेव्हा घरच्यांची कल्पना मीच त्याला घेऊन आले.

मी घरी धापा टाकीतच आले. घरच्यांना काय झाले कळेना. मग झाला प्रकार सांगितला आणि अनिकेतला विचारले, तुला कोण घेऊन आले. तेव्हा तो म्हणाला, मला एका म्हाताऱ्या माणसाने रस्ता पार करून आणले. त्याला घरचा पत्ताही माहित नव्हता. मी विचारले ते गृहस्थ कोण होते? ओळखीचे होते का? तेव्हा तो म्हणाला, ते 'साईबाबा' होते. मी त्याला म्हटले, त्यांनी कसा पोशाख केला होता? तेव्हा तो म्हणाला मी आता तुम्हाला काहीच सांगणार नाही. मला तुम्ही पुढचे प्रश्न विचारू नका. कोणी आणले ते मी सांगितले. मी म्हटले अरे त्यांना निदान आपल्या घरी चहाला बोलवायचे पण तो चटकन म्हणाला, एवढे मोठे बाबा घरात नाहीत का? (बाबांची मूर्ती घरी आहे.) मग मात्र आम्ही सर्वांनी बाबांना नमस्कार केला. नंतर त्याला काहीच विचारले नाही. श्री बाबांच्या कृपाप्रसादानेच हरवलेला अनिकेत परत मिळाला. याचे समाधान व्यक्त करताना शब्द अपुरेच पडतात. आता तो दररोज शाळेत जाताना बाबांची उदी कपाळी लावून, सेवन करून जातो. असेच सर्व साई भक्तांच्या संकटकाळी श्री बाबांनी धाव घ्यावी, हीच साईचरणी विनम्र प्रार्थना.

'धन्य ती साईमाऊली संकटसमयी धावली.' साईमाऊलीस कोटी कोटी प्रणाम!

★

# साईबाबांनी प्राण रक्षण केले

—श्री. वसंत वामन प्रधान
श्री गणाधीराज को. ऑ. हाऊसिंग,
सोसायटी लि. बि. नं. २ ब्लॉक नं. ९२
मिठागर रोड, मुलुंड (पूर्व) मुंबई ८१

● जून १९८२ मधील स्मृती पटावरील न विसरणारा दिवस, संध्याकाळी साडे पाचचा सुमार माझी पत्नी गॅलरीत उभी होती. पहिल्या मजल्यावरील आमचा ब्लॉक रस्त्याच्या दर्शनी असल्यामुळे येणारे जाणारे सहज नजरेस पडत. शेजारील विंगमधून सोसायटीच्या रस्त्यावर रडत बाहेर पडलेली मंदा माझ्या पत्नीच्या दृष्टीस पडली व तिला मंदा काय झाले? का रडतेस असे माझ्या पत्नीने विचारले त्यावर ती म्हणाली ह्यांची प्रकृती (सौ. मंदाचा पती) फारच चिंताजनक आहे म्हणून त्यांची बहीण व मेव्हणे याना फोन करावयास आले होते. एवढे बोलून ती तिच्या ब्लॉकमध्ये गेली. तिचा ब्लॉक माझ्या पलिकडे जी विंगमध्ये तिसऱ्या मजल्यावर आहे व तिचा पती श्री. प्रकाश कुळकर्णी माझ्या मुलाचा अगदी जवळचा मित्र असल्यामुळे आमचे जाणे येणे आहे. फक्त मी व माझी पत्नी हृदय विकाराचे पेशंट असल्यामुळे जीने चढण्याचे टाळीत असतो. माझ्या पत्नीने त्याला आराम पडावा म्हणून श्री बाबांची पोथी श्री साईसच्चरित वाचावयास घेतले व मी न राहवून त्याचे घरी गेलो. चार वर्षे आम्ही जवळ जवळ असून सुद्धा मी प्रथमच त्याच्या बिऱ्हाडी गेलो. घरात त्याची पत्नी व लहान तीन मुले असा परिवार; शेजारील एक वृद्ध गृहस्थ मनुष्यधर्म म्हणून धीर देण्यास बसले होते. बाकी प्रत्यक्षात हालचाल करणारे कुणीच नव्हते. असो मी घरात शिरलो व प्रकाशाकडे पाहिले तर तो पोटातील तीव्र वेदनानी अत्यंत अस्थीर होता व डोळ्यातून सारखे अश्रू वहात होते. मी जगणार नाही असे म्हणत होता. तो गेले आठ दिवस किडनी व तत्सम विकाराने बिछान्यावर झोपून होता. डॉक्टरी इलाज चालू होते. दैवयोगे त्याला उपचार करणारे डॉक्टर भागवत अचानक त्यांचे वडील वारल्यामुळे बाहेरगावी गेले होते. हॉस्पिटमध्ये नेण्याकरिता कुणाची तरी मदत पाहिजे होती. माझे मुलगे ऑफिसला गेलेले ते रात्री घरी येणार. अशी एकंदर अडचण विचारात घेता; मी सौ. मंदाला विचारले की श्री साईसच्चरित असल्यास मला वाचावयास दे त्याप्रमाणे तिने मला पोथी दिली व मी प्रकाश जवळ बसून वाचावयास सुरुवात केली. साधारण पाच मिनिटांच्या आतच प्रकाशच्या विव्हळण्याचा आवाज मला ऐकू येईनासा झाला माझे कुतुहल वाढले पण मी त्याचेकडे न पाहता

पोथी वाचन तसेच चालू ठेवले व वाचन संपल्यावर मी त्याचेकडे पाहिले तर तो गाढ झोपी गेला होता. इतकेच नव्हे तर तो दुसऱ्या दिवशी कामावर रुजू झाला. झाल्या प्रकारामुळे त्यांची श्री बाबांवरील श्रध्दा अधीक दृढ झाली व आज नियमाने ते श्री साईसच्चरित वाचीत आहेत, व उदी ग्रहण करीत असतात. बाबांची लीला अगाध आहे कोणाच्या सत्तेने हे शरीरव्यापार चालतात? याचा सूत्रधार कोण? या धाणीच्या देहामध्ये त्वचा मांस अस्थी रुधीर मलमूत्र हे सर्व असून हेच नाशिवंत शरीर परमेश्वरी साधनेचे माध्यम आहे फक्त मनाचे शुध्दीकरण झाले पाहिजे व ते अखंड साईचिंतनाने होते.

# साधुरुपी साईबाबा

—सौ. शीला जगदीश चौबळ
अन्नपूर्णा चाळ, दाऊदबाग जयप्रकाश रोड
अंधेरी मुंबई नं. ५८

● ' शरण मज आला आणि वाया गेला दाखवा दाखवा ऐसा कोणी । ' या साईबाबांच्या वचनाची आठवण चांगलीच जागृति देते. माझे सासरे ' रक्तआवेने ' खूपच आजारी होते. त्यांना ३।४ डॉक्टरांचे औषध दिले परंतु गुण येईना. एक दिवस ते खूपच Serious झाले. तो दिवस होता रविवारचा. आमच्या कुटुंबिय डॉक्टरांनी त्यांना आताच हॉस्पिटलमध्ये घेऊन जा असा सल्ला दिला, परंतु ' नानावटी ' हॉस्पिटलमध्ये जागा खाली नाही तुम्ही दोन दिवसानी या असे सांगण्यात आले. त्यांच्या काळजीने आम्ही त्रस्त झालो होतो पण साईबाबांवर विश्वास ठेऊनच आम्ही २ दिवसानी हॉस्पिटलमध्ये प्रवेश मिळविला. तेथे नेण्यास विलंब लागल्यामुळे त्यांना खूपच त्रास झाला. दिवसातून २५।३० वेळा संडासला जावे लागायचे. शेवटी शेवटी ते अगदी थकून गेले, हॉस्पिटलमध्ये नेण्यापूर्वी मी साईबाबांना म्हटले होते घरी चांगल्यारीतीने परत येऊ द्या. त्यांना बरे वाटले की, आम्ही सर्व शिरडीला येऊन साईसप्ताहाचे पारायण करू आम्ही दरवर्षी शिरडीला जातो, व पारायण पूजा, अभिषेक वगैरे करतो.

ते घरी येण्यापूर्वी एका गुरुवारी भगवेवस्त्र परीधान केलेला एक साधू बरोबर दुपारी बारा वाजता आमच्या घरी आला, व म्हणाला ' मला जेवायला दे ' त्याप्रमाणे मी सर्व जेवण त्याला वाढले. जेवल्यावर तो स्वतःहून म्हणाला ' तुम्हारा बुढ्ढा सुखी रहेगा डरो मत ! जिता रहेगा ! मैं शिरडीसे आया हूँ । त्या दिवशी माझ्या मनाला सुद्धा खूप बरे वाटले. आपल्याला कोणाचा तरी आधार आहे असे वाटले. सासऱ्यांना एकूण ३२ सलाईनच्या बाटल्या दिल्या, व उदी आम्ही रोजच त्यांना पाण्यातून देत होतो. त्यानंतर १५ दिवसांनी म्हणजे ३५ दिवस राहून ते घरी सुखरुप परत आले.

त्याच्या नंतर आम्ही सर्वजण शिरडीला जाऊन साईसप्ताहाचे पारायण तर केलेच शिवाय साईपूजा, अभिषेक करून साईबाबांच्या दर्शनाचा लाभ घेतला. आता ते सर्वकडे हिंडू फिरू शकतात. रोज बाबांचे नामसरण करतात. अशी ही साईबाबांची अगाध लीला व अघटीत शक्ती आपल्याला जीवनात आनंदी आनंद देते, व आपले जीवन सुखी करते.

धन्य ते साईबाबा व त्यांची ती शक्ती.

●

## मुलगा पास झाला

—सौ. उषा सुभाष कार्णिक
भद्र, खोपकर वाडा अमदाबाद

● माझा मुलगा १९८१ साली दहावीत होता त्याला अभ्यासाचा फारच कंटाळा. हातात पुस्तक घेतलं की त्याला लगेच झोपच येई व त्यामुळे सारखे त्याला रागवावे लागे १० वीचे विद्यार्थी किती अभ्यास करतात हे सारखे त्याला दाखवावे हे रोजचेच झाले होते. एकदा तर माझ्या रागवण्याला कंटाळून त्याने न सांगताच घर सोडले. तो दिवस १५ नव्हेम्बर चा होता, व श्रीबाबांच्याच कृपेने तो १५ दिवसानी ( शोधण्याची शिकस्त केली होती. ) घरी परत आला. अगदी सुखवस्तु घरातील लोकात होता तो.

परत आल्यावर शाळेत व क्लासला जावयास त्याला लाज वाटत होती. त्यामुळे अभ्यासक्रम पण पूरा झाला नाही परीक्षेत फक्त ८ विषयामधून ३ विषयातच पास झाला. आता आक्टोबर-मध्ये परत परीक्षा द्यायचीच व तू अभ्यास कर तुला बाबा

मदत करतील असे सांगून सांगून त्याच्या जवळून थोडाफार अभ्यास करून घेतला परंतु तो अभ्यास पास होण्यास पुरेसा नव्हता. त्याने परीक्षा दिली पास होण्याचे शक्यच नव्हते जो काही विश्वास होता तो बाबांवरच.

निकालाचा दिवस आणि तो पण नेमका गुरुवार चतुर्थीचा आम्ही गुरुवारी संध्याकाळी बाल गोपालांना जमवून बाबांची आरती करतो व म्हणूनच मी मुलाला हाक मारली की हार आणायचा आहे. असा रडवा चेहरा करून काय होणार आहे. बाजारात जा. तो काहीच बोलला नाही पण त्याचे वडीलच कडाडले. जर समीर पास झाला तरच आता गुरुवारी आरती करायची. आपण ६ वर्षांपासून मनोभावाने बाबांची पूजा केली भक्ती केली सर्व समीर साठी केले पण त्याच्या बुद्धीत मुळीसुद्धा फरक पडत नाही. बाबा त्याला काही बुद्धि देत नाहीत तो पास झाला तरच संध्याकाळी आरती नाही तर सर्व बंद.

घरात एक प्रकारचे गंभीर वातावरण पसरले होते कोणीच कोणाशी बोलत नव्हते. हे नोकरीवर गेले मुलगा शाळेत गेला घरात मी एकटीच राहीले मग मी बाबांच्या फोटोकडे पहात पहात भरल्या डोळयाने बाबांना सांगत होते बाबा इतक्या वर्षांपासून करत आलेली आरती बंद होणार ! तुम्ही ती बंद करणार ! बाबा असे होऊ देऊ नका. तो नापास होणार हे नक्कीच तरीपण तुमची आरती बंद झाली न पाहिजे. ह्यांना सद्‌बुध्दी द्या आणि आरती चालू राहू द्या.

१२ वाजले १ वाजला उदास मनाने समीर वाट पहात होते. दुसरी मुले रीझल्ट घेऊन आली. मग मनात शंकेची पाल चूकचूक करण्यास लागली. दोन वाजले अजून समीर आला नाही. मग परत बाबां जवळ आले व दोन हात जोडून प्रार्थना करू लागले बाबा त्याला घरी येऊ द्या, परत दुर्बुध्दी देऊ नका. नापास झाला असेल व आता हे परत रागावतील ह्या भितीने तो परत कोठे गेला तर नसेल असे विचारत विचारत शेजारी गेले व मैत्रिणीला घेऊन शाळेत जाण्यास निघाले तोच तो दुरुन येताना मला दिसला त्यामुळे थोडेशे हायसे वाटले.

तो जवळ येताच त्याला हळूच विचारले समीर उशीर का झाला ? त्याने पण जरा घाबरत घाबरतच उत्तर दिले. रीझल्ट उशिरा दिला, मला मार्क फारच कमी मिळाले पण आई मी...पुढचे शब्द ऐकण्या आधीच मी त्याला म्हटले काही हरकत नाही. बेटा पुढच्या वेळेस जास्त मेहनत कर. हे सर्व ऐकून त्याला थोडेसे हसू आले, व तो म्हणाला आज तू रागावशील म्हणूनच मी शाळेत गेलो व सर्व मुलं गेल्यानंतर क्लार्ककडून माझी मार्क शिट घेतली. व बाबांची प्रार्थना करत अगदी एका डोक्याने

चोरट्यासारखे कुठे कुठे लाल रेघा दिल्या आहेत ते पाहिलं आणि काय ! मल यांचा धक्काच बसला. अग मला कुठेच लालरेशा दिसलीच नाही मी परत मार्कशिटकडे पहात होतो ती माझीच आहे ना. मी पास झालो व मला बाबांनी पा. केलं. मी अगदी जोरातच ओरडले म्हणजे 'गाढवा' तू पास झाला का? अरे आधीच हे सांगायचं नाहीस का ?

तो म्हणाला ते सर्व जाऊ दे पण आधी सांग संध्याकाळी आरती होईल ना लगेच बँकेत फोन केला. समीर पास झाला आहे. संध्याकाळी आरती होणार समोरून हे अगदी भरल्या आवाजानी म्हणाले हो, बाळा, बाबांनी आपले ऐकले मोठ्या थाटात आरती करू या. लगेच हे थोड्या वेळातच घरी हातात हार मोठा पुडा घेऊन अगदी आनंदात 'साईनाथ गुरु माझे आई' करत करत प्रथम बाबांना नमस्कार केला व मग आम्ही सर्वांनी खूपच आनंदात बाबांच. केली. अशाप्रकारे आमच्या घरात परत पूर्ववत्‌च आरती चालू राहिली आहे

●

## भक्तरक्षक व सेवक श्रीसाई

☆✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡

—श्री. अनिल केशवराव रसाळ
२१/३८२, बी. पी. टी. स्टाफ क्वॉर्टर्स
रेनॉल्डस रोड, वडाळा (पूर्व) मुंबई ३७

● श्री एकनाथांच्या घरी श्रीकृष्ण श्रीखंड्याच्या रुपाने वावरत होते. त्यांना याची कल्पनाही नव्हती. श्रीसाईसुद्धा आपल्या भक्तांसाठी वेगवेगळ्या रुपात आजहि येतात व राबतात. त्यांचे रक्षण व सेवा करतात.

दिनांक १४-१-१९७९ रोजी माझी थोरली बहिण धुळ्याहून आली त्यावेळी श्री साईप्रेरणेने मी गेले १२ वर्षे नित्यवाचनात असलेली श्रीसाईसच्चरित्राची पोथी तिला दिली.

धाकट्या बहिणीला मी सोमवारी दिनांक १५-१-१९७९ रोजी सकाळी दादरच्या संस्थान ऑफिसातून नवीन पोथी आणण्यासाठी पैसे दिले. तिने त्यादिवशी

जाणार नाही असे सांगितले पण दुसऱ्या दिवशी १६–१–१९७९ रोजी मात्र जाईन असे सांगितले.

१६–१–१९७९ रोजी अंगारकी चतुर्थी होती. आम्ही कोणीहि चतुर्थी करत नाही. पण श्रीसाईकृपेने आपोआप नवीन पोथी येण्यासाठी दिवस चांगला मिळाला.

रात्री आठ वाजता १६–१–१९७९ रोजी मी ऑफिसमधून घरी आलो. नेहमी-प्रमाणे हात पाय तोंड धुवून देवघरात गेलो. तिथे खाकी कागदात व्यवस्थित बांधलेली पोथी दिसली. आसन घेतले. उदबत्ती व दिवा लावला व मनःपूर्वक म्हणालो, 'हे श्रीसाई आपण आजहि पोथीरुपाने अस्तित्वात आहात. सर्व भक्तांना आजहि तुम्ही पोथीद्वारे मार्गदर्शन करता. आज अंगारकी आहे. आज आपण गणेशरुपाने आमच्या-कडे आलात तर आज मला दृष्टांत द्या.'

श्रींच्या आज्ञेप्रमाणे पोथी उघडली. तेव्हा देशमुखीण उपवास करून श्रीबाबां-कडून गुरुमंत्र घेण्यासाठी शिर्डीत येते, व बाबा तिला आपल्या गुरुने एवढी सेवा बारा वर्षे करूनसुद्धा मंत्र दिला नाही असे सांगतात, व देशमुखीण बाईला तू केवळ कास-वीच्या पिल्लाप्रमाणे माझ्याकडे अनन्यतेने पहा असा उपदेश करतात, आणि पूर्ण श्रद्धा व सबुरी ह्या दोन पैशांच्या गुरुदक्षिणेशिवाय गुरु ज्ञान देत नाही असे सांगतात असा प्रसंग आहे. तो अध्याय आला. मला उपदेश मिळाला व मी पोथी मिटली व पुन्हा श्रींच्या आज्ञेने उघडली. आणि काय आश्चर्य! पोथीत अक्षता, तुळशीच्या पानांचा एक झुबका, कुंकू! पोथी मिटली व त्यांच्या सांगण्याप्रमाणे पुन्हा उघडली पुन्हा कुंकू, शेवंतीच्या फुलाच्या पाकळ्या व अक्षता! पुन्हा पोथी मिटवून उघडली तर पुन्हा उघडली तेव्हा पुन्हा तोच प्रकार! मी तशीच पोथी घेऊन सौ. ला दाखवली. माझ्या धाकट्या बहिणीला दाखवली. त्यापण चकित झाल्या. धाकट्या बहिणीने तर तिने जेव्हा ती घेण्यापूर्वी पूर्ण तपासली तेव्हा यापैकी एकहि वस्तू नसल्याचे खात्रीपूर्वक सांगितले. आमच्या घरात श्रीसाई प्रत्यक्ष आहेत. जसे ते प्रत्येक घरात जिथे त्यांची पोथी आहे तिथे आहेत. याचा पुरावा त्यांनी दिला, व आमच्या सर्वांचे ते इतर सर्व श्री साईभक्तांप्रमाणे रक्षण व सेवा करीत आहेत, असे वारंवार पटवत आहेत.

★

# माझे जीवन साईमय झालेले आहे

**—श्री. स. अ. रेगे**
ए/६ अमिया को. हौ. सोसायटी
दुसरा मजला, अंधेरी मुं. ५८

● सोळा जानेवारी १९८१ रोजी माझे वडील बंधू कै. श्री. जयप्रकाश रेगे, वडाळा येथील इंडियन ह्यूम पाईपमधील कामगार अधिकारी यांचे कॅन्सरच्य-रोगाने निधन झाले. आमच्या घरातील एक अंकुर काळाच्या पडद्याआड गडप झाला. हा अचानक झालेला आघात सोसण्याइतकी ताकद आमच्यात उरली नव्हती. आम्ही सारे गांगरून गेलो होतो. एके दिवशी आमच्या नात्यातील एका बाईने मला साई-बाबांच्या जीवनावरील एक पुस्तक, ज्याचे नाव 'मशीदीत प्रकटला परमेश्वर' वाचा वयास दिले. प्रथम मी ते वाचून काढले, नंतर माझ्या आईने व माझ्या डॉक्टर बंधूने ते पुस्तक वाचून काढले. मला नंतर माझ्या आईत व डॉक्टरबंधूत पुस्तक वाचल्यानंतर बराच बदल झालेला दिसून आला. नंतर मी, माझी आई, माझी बहीण आणि माझे वडील तसेच आमची जवळची काही नातेवाईक मंडळी मिळून M. I. D. C. च्या गाडीने मे महिन्यात शिरडीला गेलो. परंतु शिरडीला पोहा चल्यावर मला प्रथम तेथील गर्दी पाहून फारच चिंता वाटू लागली की आपणाला पहाटेची काकड आरती मिळेल की नाही, कारण गाडी दहा वाजता परत नाशिकला जाणार होती. परंतु बाबांनी आमची चिंता दूर केली, आम्ही सर्वांनी लगेच आंघोळ करून घेतली, व काकड आरतीसाठी मंदिरात पोहचलो. नंतर मंदिरात बाबांच्या भव्य मूर्तीचे दर्शन घेतल्यावर आणि समाधीवर डोके ठेवल्यावर बाबांच्या खालील तीन बोधामृतवचनाचा प्रत्यय येऊ लागला.

१) शिरडीस ज्याचे लागतील पाय टळतील अपाय सर्व त्याचे.
२) माझ्या समाधीची पायरी चढेल दुःखही हरेल सर्व त्याचे.
३) जरी हे शरीर गेलो मी टाकून, तरी मी धावेन भक्तासाठी.

माझी बहिण, दोन वर्षापूर्वी तिचे लग्न झाले होते परंतु माझ्या बहिणीला अपत्य नव्हते; आणि ही आमची इच्छा बाबांनी माझ्या बहिणीला पुत्ररत्न देऊ पूर्ण केली. श्री साईबाबा आता माझे सर्वस्व होऊन बसले आहेत. त्यां नाव सकाळ, संध्याकाळ घेतल्याशिवाय मी कुठल्याच कार्याला सुरवात करी

नाही. श्री सद्गुरु साईबाबांची अकरा बोधामृतवचने तर माझी पाठ झाली आहेत आणि ती म्हटल्याशिवाय मला झोप येत नाही. थोडक्यात श्री सद्गुरु साईबाबा माझे सर्व काही आहेत, म्हणूनच मी खालील वाक्यात एवढेच म्हणतो.

तूच माझा बाप-माय, तूच माझा देवराय,
तूच माझी करिसी सोय, अनाथ नाथा दीनबंधू

# साईंच्या उदीचा व नामाचा महिमा

—सौ. कमल बा. रेखी
स्पेशल एक्सि. मॅजिस्ट्रेट
बी/११९/६ सरकारी कर्मचारी वसाहत
वांद्रा ( पू. ) मुंबई ५१

● माझा एकुलता एक मुलगा चार वर्षांपूर्वी ऐन परिक्षेच्या वेळीं तापाने आजारी झाला. डॉक्टरीं उपचाराने ताप कमी होण्याची चिन्हे दिसेनात. स्पेशालिस्ट-कडे न्यावे असे आमच्या फॅमिली डॉक्टरांचे मत पडले. त्याच रात्री त्यास सपाटून घाम येऊ लागला. वारंवार कपडे बदलावे लागले तरी घाम चालूच होता. आम्ही सर्व जण फारच काळजीत पडलो. हळूहळू तो गार पडत चालला. डॉक्टरांच्या उपचाराने पण काहीच उतार पडत नव्हता. तोंडाने मुलगा सारखे साईबाबा–साईबाबा असे बड-बडायचा. मी त्याला मांडीवर घेऊन बसले होते. मनात सारखा बाबांचा धांवा करीत होते. त्याच्या अंगाला व कपाळाला बाबांची उदी लावली. नामस्मरण चालूच होते. दोन तासांनी तो हळूहळू शुद्धीवर आला. ताप निघाला, व घामपण कमी झाला व त्याच्या प्रकृतीस थोडा आराम पडू लागला. दुसऱ्या दिवशी स्पेशालिस्टला प्रकृती दाखविली व त्यांनी मुलाची प्रकृती नॉर्मल आहे, घाबरू नका. असे सांगितले. आता माझ्या मुलाची प्रकृती ठीक आहे. आम्ही सर्व कुटुंबीय मंडळी दररोज नेमाने रात्री झोपण्याचे अगोदर बाबांची प्रार्थना, नामस्मरण नियमितपणे करीत असतो. खरोखर उदीचा व नामाचा तसेच साईभक्तीचा महिमा अगाध आहे. ☆

# असाही एक साई चमत्कार

—श्री. प्रफुल वसंत दिघे
दिघे बिल्डिंग, खुंटवली
अंबरनाथ जि. ठाणे

● तसे पाहता मी काही अंधश्रद्धाळू धर्मभोळा, वगैरे नाही. मला प्रवासाची आवड. पण प्रवासाचे ठिकाण निवडताना मात्र रमणीय ठिकाणाबरोबर धर्मक्षेत्र असणाऱ्या ठिकाणास जास्त प्राधान्य. अतिशयोक्ती नाही, पण महाराष्ट्रात एकही ठिकाण नाही जेथे आम्ही भेट दिली नाही असो. दि. २१-५-८० रोजी आम्ही कुटुंबिय शिर्डीस आलो. मे महिना असल्यामुळे अर्थात्च शिर्डीला 'खोली'ची अपेक्षा न करताच तेथील मोठ्या हॉलमध्येच मुक्काम ठोकला. काही तासानंतर इतर भक्तगणांची ओळख होवून मैत्रीत रूपांतर झाले, त्यामुळे २-३ दिवस फारच मजेत घालविले. त्या प्रशस्त हॉलमध्ये रात्री सर्वजण झोपलेले पाहतां मला सहजच कल्पना आली, बाबांचेकडे काय किमया असावी, निरनिराळ्या, जाती पोटजातीची, प्रांताची, वर्गाची माणसे या हॉलमध्ये आपलेपण विसरून एकमेकांच्या सहवासास शांत झोपलेली होती.

दुसरे दिवशी दि. २२-५-८० रोजी आम्ही सकाळीच सुचिर्भूत होवून, देवदर्शन धार्मिक विधी झाल्यावर सकाळी १०-१०॥ चे सुमारास बाबांची चावडी वगैरे ठिकाणे पहात पहात बाबांच्या सानिध्यातील भक्तगणापैकी (त्यावेळच्या) लक्ष्मीबाईचे घरी आलो. बाबांनी स्वतःजवळील त्याकाळी असलेले चांदीचे ९ रुपये ह्याच लक्ष्मीबाईला दिले होते; व त्यांच्या वंशजानी अजूनही ते पैसे जतन करून ठेवले आहेत, व भक्तगणांना त्या पैशाचे दर्शन घेण्याची सोयहि केलेली आहे. आम्ही पण त्या लक्ष्मीबाईचे घरी जावून त्या बाबांचे रुपयाचे दर्शन घेतले. लक्ष्मीबाईचे घरासमोरील अंगणात जेथे आज तुळशीवृंदावन आहे. तेथे मी उभा असताना सहजच माझे मनात कल्पना आली लक्ष्मीबाईला बाबांनी प्रत्यक्षात प्रसाद दिला, तसा आपणास मिळणे शक्य नाही. बस्स् आणि काय आश्चर्य, माझे सहजच लक्ष खाली गेले, व कोणालाही विश्वास वाटणार नाही, अशी घटना क्षणार्धात घडली. माझे पायाजवळच एक दहा पैशाचे नाणे, नाणे म्हणून ओळखता येणार नाही, अशा स्थितीत पडलेले होते. नाणे साफ गंजलेले. त्याचे २ कडा तुटलेल्या. ते नाणे हातात घेतल्यावर माझे मन आनंदीत झाले. बाबांनीच दिलेला तो मला प्रसाद आहे. म्हणून ते नाणे स्वच्छ करून, आमचे देव्हाऱ्यात ठेवलेले आहे, व त्याची रोज नित्यनियमाने पुजा होत

असते. बाबांचे दरबारात श्रध्देने येणाऱ्यास फळ हमखास मिळणारच. अशा या आपल्या बाबांचे ठायी आम्ही नतमस्तक.

★

# बाबा तुम्हीच आमचा आधार !

—श्री. ज. ब. कोष्टी
बी. ए. बी. एड.
मुरबाड (ठाणे)

● फेब्रुवारी महिन्यातील घटना. एकाएकी माझ्या पत्नीच्या पोटात दुखू लागले. प्राथमिक उपचार केले पण दुखणे अधिकच होऊ लागले. आमच्या डॉक्टरांनी कल्याणचे प्रसिद्ध सर्जन डॉ. म्हसकर यांचेकडे जाण्याचा सल्ला दिला. डॉ. नी सलाईन लावून व औषधोपचार करून दुखणे काबूत आणले. साधारण बरे वाटल्यानंतर आम्ही घरी आलो. परंतु पुन्हा आमची पाचावर धारण बसली. पुन्हा तिचे दुखणे बळावले. सतत चार महिने डॉक्टर उपचार करीत होते. त्रासामुळे व जाग्रणामुळे घरातील सर्वांच्या तब्येती बिघडल्या.

एकदा कल्याणला डॉक्टरांकडे गेल्यावर मी एक श्री बाबांची तसबीर खरेदी केली. फोटोची यथासांग पूजा केली. श्री बाबांना साकडे घातले. मनात दुःख कमी होण्यासाठी विनवणी केली. आणखी मे महिन्यात तिची बी. ए. ची परीक्षा होऊ दे अशी प्रार्थना केली. पत्नीही मनोभावे बाबांना विनवू लागली. बाबांनी आमची हाक ऐकली. पत्नी परिक्षेअगोदर बरी झाली व परीक्षा व्यवस्थितरित्या पार पडली. परंतु परीक्षा झाल्या बरोबर आणखी आजार बादला. आमची झोप उडाली. मी बाबांचा प्रसाद व उदी संस्थानकडून मागवून घेतली. प्रसाद व उदीच्या प्रभावामुळे पत्नीचा आजार हळूहळू कमी झाला. आता तिला काहीही त्रास नाही. हे सर्व बाबांच्या कृपाशिर्वादामुळे झाले अशी आमची पूर्ण श्रद्धा आहे. श्री बाबांच्या दर्शनाची ओढही लागली आहे तीही बाबा पुरी करतील अशी पूर्ण श्रद्धा आहे.

●

३८७

# उदीचा माहिमा

卐——卐

—कु. सरल प. खारकर
'साई निवास' सायन हौसिंग सोसायटी
प्लॉट नं. ३६ ए पूर्व ब्लॉक नं. ४
रोड नं. २ स्कीम नं. ६ शीव मुं. २२

● गेल्या वर्षीच्या दिवाळीत घडलेली घटना. शनिवारी वसुबारस होती. माझ्या मनात काय आले कोण जाणे ! ते श्री साईबाबाच जाणे मी एका कागदावर माझ्या जवळच्या डबीतील उदी घेतली, व तिची पुडी केली. मी आजारी. पडल्याठिकाणी पुडी चांगली व्हावी म्हणून भावाला घरातून दोरा आणावयास सांगितला. त्याला दोरा मिळाला नाही. मी माझ्या जवळच्या फाटक्या पंचाची काटाळी काढली, व ती पुडी बांधली. भावाला म्हणाले हे बघ रविंद्र, मी तुझ्या ऑफीसबॅगमध्ये ठेवावयास उदीची पुडी देत आहे ती तू ठेव. भावानी मनोभावे उदीची पुडी ठेवली. दुसऱ्या दिवशी धनत्रयोदशी. भाऊ ऑफीसला गेला. संध्याकाळी घरी येताना दादरला मध्यरेल्वेच्या गाड्या बंद. दिवस लहान. गाडी नाही म्हणून खोदादाद सर्कल जवळ ६६ नंबरच्या बससाठी येत असता पदपथावर अंधार असल्यामुळे झाड पडून खड्डा तसाच राहिलेला होता त्यात पाय जाऊन भाऊ त्यात घसरला गुडघ्यावर आपटला. नाकावरचा चष्मा ओघळला. तेवढ्यात एका सिंधी तरुणाने हात देऊन उठवले व तसेच थोडा वेळ उभे रहाण्यास सांगितले व नंतर बसने घरी जा, असा सल्ला दिला. भाऊ घरीं आला. आल्याबरोबर सर्व घटना सांगितली गुडघा, कोपर यास लागले होते. पाय ओढीत चालत होता. मोठ्या वहिणीने औषध लावले. मला नंतर सांगितले कारण मी घाब-रून गेले असते. भाऊ तीन दिवस झोपूनच होता. मनात आले, बघा एवढ्या वर्षात त्याच्या बॅगमध्ये उदीची पुडी ठेवावयाचे सुचले नाही, मग आदल्या दिवशीच रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास मी त्याच्याजवळ दिली. क्षणभर मनात विचार आला की 'श्री साईबाबांनी' मला प्रेरणा दिली उदीमुळे भावाला फार लागले नाही. कारण 'बाबांना'च त्याची काळजी. आम्ही सर्व साईभक्त. भाऊ गावाला जायचा असला की त्याच्याजवळ उदीची पुडी देत असू. श्री साईबाबांची उदी म्हणजे संजीवनी आहे. श्रीं साईबाबांना आम्हा भावंडांचे कोटी कोटी प्रणाम.

●

# साईबाबा आणि मी

—डॉ. वाय. एन. हिवारे
कल्बुर्गी दवाखाना, राममंदीर रोड,
बिदर (कर्नाटक) ५८५४०१

● १९७८ सालापूर्वी मी साईबाबांना ओळखत नव्हतो अशातली गोष्ट नाही. मी त्यांना ओळखत होतो. एवढेच नव्हे तर माझ्या दवाखान्यात इतर देवांच्या तसबिरीबरोबर त्यांची तसबीरही लावली होती. कारण माझी पत्नी लहानपणापासून बाबांना जाणत होती, व काही दिवस तिने त्यांची मनोभावे पूजाही केली होती. त्यांचे लहानसे चरित्रही तिच्या वाचण्यात आले होते. चरित्र वाचूनच ती गप्प बसली नाही तर वाचलेल्या पुस्तकावरील मुखपृष्ठाचे बाबांचे चित्र पण तिने एका नकाशाच्या वहीत काढले होते. पण नवल हे की लग्नानंतर ती बाबांस पूर्णपणे विसरून गेली.

आम्ही पाच वर्षांपूर्वी प्रथम जेव्हा शिर्डीत आलो तो बाबांच्या संपूर्ण छायेच्या कृपेने वेडे बनलो. तरी तिला आपण बाबांचे चित्र काढले होते याची आठवण झाली नाही. गतवर्षी एकाएकी तिच्या लक्षात आले नि आश्चर्य हे की दुसऱ्या दिवशी त्या नकाशाच्या वहीवरील कव्हर तिला देवघरात सापडले व थोड्याशा प्रयत्नानंतर ती वही तिला सापडली. जवळ जवळ २१ वर्षांपूर्वी ते काढलेले चित्र मी फ्रेम करवून घेतले.

तात्पर्य हे की आम्ही लग्नापासूनच (अन् सौ. त्याच्याही अगोदरपासून) साईबाबांच्या संपर्कात होतो. पण आमच्या कर्मभोगामुळे ते आमच्या अत्यंत जवळ असूनही आम्ही त्यांच्यापासून योजने दूर होतो. नंतरच्या काळात मला त्यांचा विचार पण आला नाही. माझे तर सोडा, माझ्या पत्नीने आवडीने ज्या देवाची चित्रे काढली होती तिला पण त्यांचा विसर पडावा हे नवल नाही काय ! पण माझी पुण्याई थोर मी श्रींच्या चरणी लागलो. माझा उद्धार झाला. आता केवळ माझे मन साई साई शिवाय दुसऱ्या कुणास भजन नाही. रात्रंदिवस त्यांच्या नावाचा जप माझे मन करते. 'मी' मी राहिलो नाही. मी जे काय करतो ते मी करीत नसून स्वतः बाबा करवून घेतात. बाबांची भक्ती करणे हेच माझे परम दैवत आहे.

दररोज बाबांची दासगणूकृत स्तवनमंजरी वाचतो. त्याशिवाय कुठे बाहेर जात नाही. जेवणही घेत नाही. मला अगोदर मराठी जमत नसे. पण आज बाबांची स्तवन

मंजरी तोंडपाठ आहे. दुपारी, संध्याकाळी बाबांची गाणी ऐकतो. धंदा करीत करीत अनेकांना बाबांच्या चमत्काराची, त्यांच्या उदीचे तर कधी त्यांच्या समाधीमंदीराचे, नाहीतर साईलीलातील अनुभवांचे गुणगान करीत असतो. रात्रंदिवस त्यांना भजतो. त्यांच्याशिवाय माझे जीवन शून्य भासते. घरीदारी सगळीकडे बाबाच! बाबांचे चित्र सजवलेले आहे. माझ्या अनेक वस्तूंवर त्यांच्या चित्राचे स्टीकर चिकटवलेले आहेत. माझ्या बोटात बाबांच्या चित्राची सोन्याची अंगठी आहे. गळयात त्यांच्याच चित्राची साखळी आहे. मी हे वरवरचे दिखाव्याचे करतो असे समजू नये. वास्तविकतः मला हे सर्व करायला मनःपूर्वक आवडते.

माझी अगदी मनापासूनची इच्छा आहे की ते माझ्या अणूरेणूत सामावले जाऊन, माझ्या कणाकणातून साई साई शब्द उमटावेत. म्हणून मी साईमय व्हायचा प्रयत्न करीत आहे. ही माझी इच्छा नाही तर ती बाबांची असे मी समजतो. प्रत्येक काम करावयाचे अगोदर त्यांच्यावर भार टाकतो. मी ते करीत नसून बाबाच करवून घेतात अशी माझी दृढ भावना आता बनली आहे. सकाळी साईबाबांच्या उदीचे प्राशन केल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याच पदार्थाचे किंवा पाण्याचा घोटही घेत नाही. बाबांच्या नावाचा जप करतो.

मी करीन म्हटल्याने होणार नाही. सर्व काही साई समर्थ करवून घेत आहेत, व पुढेही करवून घेतील. त्यांना काय अशक्य आहे. 'मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरीम्' इतके सामर्थ्य ठेवणाऱ्या साईबाबांचे मी काय म्हणून वर्णन करणार. मात्र आमचे कर्म सरळ पाहिजे. मी अगोदर अज्ञानी चंचल जिद्दी होतो. आज साईबाबांच्या सानिध्यात शांत नि स्थिर बनलो आहे. बाबांची शिकवणूक 'श्रद्धा आणि सबूरी' माझ्या मानस पटलावर ठसली आहे. आज बाबा माझा आधार बनून माझ्या डगमगत्या संसारी नौकेला सावरले आहे. अशा या समर्थ साईबाबांना माझा प्रणाम.

जय जय साई समर्था।

श्री साईलीला

# लेखक कवी नववे स्नेह संमेलन-शिरडी. सन १९८३

श्रीसाईलीला या श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या मासिकाच्या लेखक-कवींचे स्नेहसंमेलन श्री क्षेत्र शिरडी येथे रविवार ता. ३० व सोमवार ता. ३१ जानेवारी १९८३ रोजी भरविण्यात येत आहे. या दोन दिवसाच्या स्नेह संमेलनात श्रीबाबांचे जवळून दर्शनसुख, मेळावा, सांस्कृतिक कार्यक्रम, परस्पर परिचय, श्रीसाईलीला विकास, प्रचार-प्रसार इ. दृष्टीने चर्चा व विचारविनिमय, परिसंवाद, श्रीबाबांविषयक हवे ते विचारा ही सामान्यज्ञानाची रंजक चर्चा शक्य झाल्यास एखाद्या आध्यात्मिक विषयावर सवंग परिसंवाद इ. असा भरगच्च कार्यक्रम आयोजित केलेला आहे.

या स्नेह संमेलन प्रसंगी फक्त श्रीसाईलीलेच्याच लेखक कवींना निमंत्रित केले जाणार असल्याने गेल्या आठ वर्षात कमीत कमी निदान तीन वेळा तरी आपले गद्य वा पद्य साहित्य श्रीसाईलीलेतून प्रसिद्ध झालेले आहे अशाच लेखक कवींना निमंत्रित केले जाईल. संमेलनातील स्वागत व समारोप गीतेसुद्धा लेखक-कवी मधूनच गाईली जावीत. केवळ त्यासाठी अन्य गायक वादकांनी येऊ नये. ही बंधने पाळून श्रीसाई-लीलेच्या ज्या लेखक कवींना स्नेहसंमेलनास हजर रहाण्याची इच्छा असेल त्यांनी याच अंकात पान १२४ वर दिलेला तक्ता बॉलपेन नेच लिहून संपूर्णपणे भरून खाली दिलेल्या पत्त्यावर ३१ डिसेंबर १९८२ चे आत शिरडी येथे मिळेल असा पाठवावा. तो येताच सर्व ती छाननी करून त्यांना रितसर अधिकृत निमंत्रण कार्ड रवाना केले जाईल. ३१ डिसेंबर १९८२ नंतर या संमेलनाचे बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. संमेलनास येणाऱ्यांनी २९-१-८३ पूर्वी येऊ नये.

या स्नेहसंमेलनास हजर रहाणाऱ्यांची निवास, चहापान, व भोजन-प्रसादाची सारी व्यवस्था श्रीसाईबाबा संस्थान तर्फे केली जाईल.

तक्ता पाठविताना पोस्टपाकीटावर कृपया साईलीला संमेलन असे कोपऱ्यात लिहा.

तक्ता पाठविण्याचा पूर्ण पत्ता :-

**कोर्ट रिसीव्हर, श्रीसाईबाबा संस्थान,**

मु. पो. शिरडी, जि. अहमदनगर, ता. कोपरगाव

पिन ४२३१०९

निमंत्रक :

**क. हि. काकरे,**

कोर्ट रिसीव्हर,

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी.

**डॉ. श्री. दि. परचुरे**

**श्री. सदानंद चेंदवणकर,**

कार्यवाह.

**लेखक-कवी ९ वे स्नेहसंमेलन शिरडी येथे रविवार/सोमवार दिनांक ३० व ३१ जानेवारी १९८३ रोजीचे...........................**

माननीय श्री. कोर्ट रिसीव्हर यांना

सा. न. वि. वि.

शिर्डी येथे भरणाऱ्या ९ व्या लेखक-कवी स्नेहसंमेलनास मी हजर राहू इच्छितो-इच्छिते. आपणास हवी असलेली माहिती खाली लिहीत आहे.

१) संपूर्ण नाव-(प्रथम आडनाव)

२) संपूर्ण पत्ता :-

३) व्यवसाय :-

४) शिक्षण :- ५) वय -

६) श्रीसाईलीलेचे वर्गणीदार आहे-नाही -

७) वर्गणीदार असल्यास मराठी-इंग्रजी-वर्गणीदार क्रमांक..............

८) श्रीसाईलीला मधून गद्य की पद्य लिहिता

९) लेख वा काव्याची शिर्षके (केवळ संदर्भासाठी)

महिना प्रसिद्धी वर्ष

१. ..........................................................................

२. ..........................................................................

३. ..........................................................................

४. ..........................................................................

५. ..........................................................................

१०) सोबत कुणी येणार आहे ? होय-नाही.

११) कोण येणार ? (नातू, पती, पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ, बहिण, सून यापैकी कुणाही एकासच आणता येईल)

१२) संमेलनात काही सूचना मांडणार ? होय-नाही.

(सूचना वेगळ्या कागदावर लिहून पाठवा व त्या संबंधी आपले विचारही लिहून पाठवा)

तारीख- / / १९८२ स्वाक्षरी....................

४०७

# श्रीसाईबाबांचे ज्वलंत चमत्कार–अनुभव

—श्री. जी. के. म्हात्रे
एफ. आर. एच. एस. ( लंडन )
कामगार नगर क्र. १, १२/१९, न्यु
प्रभादेवी रोड, मुंबई २५

● श्रीसाईबाबांच्या चमत्काराविषयी जो जो विचार करावा तो तो कोण जाणे मनुष्यस्मृतिला ही एक अतुलनीय श्रीसाई ईश्वरशक्ति कोठून कोठे होऊन जाते, परंतु ह्याचा शेवट असा कोणत्याही भक्त योग्याला अनुभवास आलेला नाही...!

आज दृष्टान्त, तर उद्या स्वप्नप्रेरणा, असे काहीना काही होऊन श्रीसाई आपल्या भक्ताला सुचक असे मार्गदर्शन करीत असतात.

पूर्वी आम्हाला श्रीसाई विषयी काहीच माहिती नव्हती. माझी पत्नी सौ. वासंती ही नेहमी आजारी असे. आजारपणात डोळ्यांतून तसेच तोंडामधून रक्त वहात असे. अर्थात डॉक्टरी उपचार देखील चालू होते.

आणि अचानकपणे तिला रात्री साईबाबांनी दर्शन दिले. आजारपणात ती संपूर्ण २१ दिवस दुधावरच होती. त्याच २१ दिवसात ती रात्री १२ पासून पहाटे ४ पर्यंत ध्यानमग्न असे, व एकंदरीत त्या चार तासात ती फक्त हिंदी भाषेतच बोलत असे.

तेव्हापासून आम्हाला श्रीसाईबाबांविषयी अधिक काही माहिती समजली. त्यावेळेपासून मी अजूनही श्रीसाईबाबांचे नामस्मरण, तसेच श्रीसाई सच्चरिताचा सप्ताह, रोजची पूजाअर्चा वगैरे करीत आहे. आणि पावलोपावली ह्याच साईभक्तीने आम्हाला योग्य वेळी मार्गदर्शन केलेले आहे.

ज्या आजारात अक्षरशः डॉक्टर अपयशी ठरले तेथे फक्त श्रीसाईंची उदी प्रभावी ठरली. तेव्हापासून माझ्या पत्नीची स्थिती आरोग्य दृष्टीने व्यवस्थित असून अजूनही तिला श्रीसाई मार्गदर्शन करीत असतात.

पूर्वीपासून आमच्या घरात कोठेही कोणत्याही जड वस्तुखाली, टेबलावर पसरलेल्या मेणकापडाखाली, श्री साईंच्या देव्हाऱ्यातील पुतळ्यासमोर किंवा इतरत्र ‘ उदी

अक्षरे ' आपोआप लिहिली जातात. त्यांची लांबी, रुंदी व उंची ठराविक मापाची असतात. ही अक्षरे फक्त हिंदी भाषेतच असतात.

प्रथमच लिहिली गेलेली ही ' उदी अक्षरे ' खालीलप्रमाणे–

और पैसा ये चिज कुछ नहीं
दुनिया में सच्चा बात करना
गरीब को मदत करना
और कोई आदमी के साथ झगडा नहीं करना
श्रद्धा सबुरी धरना तो अल्ला तेरा भला करेगा

ह्या उदीअक्षरांचे वैशिष्ट्य असे की नेहमी सुरुवात ' और ' पासून आणि स्वल्प-विराम, पूर्णविराम, उद्‌गारचिन्ह, प्रश्नचिन्ह वगैरे असे काहीच शेवट नसते.

आमच्याकडे कोणीही नातेवाईक अथवा इतर साई भक्तगण येतात. त्यांच्या मनातील अपेक्षा–इच्छा असल्यास ते श्रीसाईजवळ ध्यानस्थ होऊन प्रार्थना करतात. त्यानंतर त्यांच्या इच्छे–अपेक्षेनुसार उदी अक्षरे लिहून त्या भक्तास योग्य खुलासा दर्शवितात.

आज मितीपर्यंत कोणत्याही आशयाची, इतर भक्तगणांना मार्गदर्शन देणारी, तसेच आमचीही संकटसमयी भक्तलाज राखणारी उदीअक्षरे आमच्या घरात येत आहेत म्हणजे खरोखरीच श्रीसाईंची ही अगाध लीलाच म्हणावी....!

श्रीबाबांची प्राप्ती, विचार करून पाहिले तर फारशी कठीण नाही. भक्ताने त्याचा ध्यास घेतला पाहिजे. त्यांच्या भेटीची जिवंत तळमळ अंतःकरणात उत्पन्न झाली पाहिजे.

आपले रक्षण करणारा, आपला त्राता एकमेव श्री साईच आहे. तो करील तसे होईल ही तुमची दृढ भावना झाली पाहिजे, म्हणजे तोच तुमची सर्व प्रकारे काळजी वहातो. मात्र तुम्ही त्याला आपले अंतःकरण अर्पण केले पाहिजे !

ह्यासाठीच श्री साईंनी आपल्या भक्तांना उद्देशून खालील उद्‌गार काढले आहेत–

I Look to you,
If you Look to me

५०/

# श्रीसाईंची प्रेरणा व कृपाप्रसाद

—श्री. ग. रा. पालकर
२२३/२, दारूवाला चाळ
बझार वॉर्ड, कुर्ला, मुं. ४०००७०

● तसा मी काही यशोदित कवि नव्हे. पण श्रीसाईबाबांच्या प्रेरणेने आता बरेच काही लिखाण करीत आहे. लेखनातील प्रगति व त्यानुसार ध्वनिमुद्रणाची मिळणारी संधी हा बाबांचाच कृपाप्रसाद आहे. ही माझी अंतरिक भावना. नेहमीच्या प्रार्थनेबरोबरच लिहिण्यापूर्वीही मी बाबांची मनोमन आळवणी करतो व लेखनास सहाय्य करावे अशी प्रार्थनाही करतो. मग लिखाण गद्यातील कथा प्रकार असो अथवा पद्यासारख्या लावणी, गजल, भक्तीपर रचना असो. लिखाणाचा अंतिम टप्पा पूर्ण झाला की पुन्हा मनोमन बाबांचे आभार मानून त्यांना वंदन करतो. माझ्या लिखाणाच्या अल्प काळातील यशाचे हे एक रहस्य आहे.

## मला पुन्हा एकदा श्री साईबाबा कॅसेट ध्वनिमुद्रणाचा योग

'श्री साईगीतांजली' कॅसेट ध्वनिमुद्रणाच्या वेळेस सिने संगीत दिग्दर्शक नंदू प्यारे उपस्थित होते. सदर कॅसेटमधल्या सर्व रचना त्यांना अगदी मनापासून आवडल्या. त्याच वेळेस त्यांनी माझ्याकडून बाबांविषयीच्या १० रचनांची मागणी केली. थोडक्यात विषय समजावून सांगितला अन् त्यांनी स्वरबद्ध केलेल्या महंमद रफीच्या आवाजातील बाबांचे गाणे ऐकवले. (श्री. नंदू–प्यारे यांनी स्वरबद्ध केलेल्या 'संभावना' या चित्रपटातील गीत) तुम्ही मला लवकरात लवकर गाणी द्या. मी ती गाणी सिने कलाकारांच्या संचात गाऊन घेईन. असे सारखे म्हणायचे. मीही त्यांना प्रयत्न करतो असे सांगून दुसऱ्या दिवसापासून सतत एक आठवडाभर लिहिण्याचा प्रयत्न केला. पण मनासारखी एकही ओळ लिहिली जात नव्हती, आणि काहीतरी खरडून द्यायला मन तयार नव्हते. कारण गाणार होते चित्रपट कलाकार. जमत नाही म्हणून मी तो प्रयत्न सोडून दिला. अन् दुसऱ्या होणाऱ्या ध्वनि मुद्रणाच्या गीतांकडे वळलो. काही दिवसानंतर ध्वनिमुद्रणाच्या वेळेस पुन्हा त्यांची स्टुडिओत भेट झाली. तेव्हा त्यांनी बाबांच्या गीताविषयी विचारले.

'अहो, प्रयत्न केला पण अजून काही जमलं नाही' असं मी त्यांना प्रामाणिकपणे सांगितले. यानंतरही दोन तीन आठवडे गेले. पण एकही ओळ जुळून येईना.

बाबांची इच्छा नाही असं वाटलं, आणि विषय मनातून काढून टाकला. नंदू प्यारे यांचा गाणी झाली का ? म्हणून निरोप यायचा, माझं पालुपद ठरलेलं 'अजून जमलं नाही.' या नंतर हा विषय तेही विसरले अन् मीही दुसऱ्या गीतांकडे लक्ष केन्द्रीत केले. एका गुरुवारी सकाळी बाबांच्या तसबीरीपुढे नमस्कार करताना अगदी सहजतेने बोल उमटले.

उठ–उठ साईनाथा सरली निद्रा वेळा
अधिर दर्शनासी झाला पहा भक्त मेळा ॥ धृ० ॥

आणि मला नंदू–प्यारे यांनी केलेल्या १० गीतांच्या मागणीचे तीव्रतेने स्मरण झालं. शब्द अखंडीत शेवट पर्यंत मीटर मध्ये जुळतच गेले.

वृक्षलता फुले उमळती
मधूर स्वरे पक्षी गाती
पूर्व दिशा क्षितिजावरती
सूर्य देव आला ॥ १ ॥

देवा स्नान संध्ये ठाई
वाट पाहे गोदा माई
पूरे निद्रा झाली साई
फार वेळ झाला ॥ २ ॥

व्हावी साई कृपा दृष्टी
आले भक्त दर्शन भेटी
मंदिरात झाली दाटी
उठी बा दयाळा ॥ ३ ॥

बस्स ! बाबांची प्रेरणा म्हणून लिहायला बसलो. अगदी तीन दिवसात दहा गाणी नंदू–प्यारे यांच्या मना सारखी लिहून दिली.

ध्वनि मुद्रणाच्या वेळेस त्यांनी मला विचारले 'काय ! कशा वाटतात चाली ?' मी म्हटलं अगदी छान कंपोझ केलत हो.

ते म्हणाले 'एका दिवसात बसवल्या या चाली. बाबांचीकृपा म्हणतात ती हीच.'

मीही त्यांना म्हटलं, 'बाबांच्या प्रेरणे मुळे तर हे घडलं.' त्यांची सेवा तर तो करवून घेत आहे. आपण काय एक निमित्त.'

# श्रीसाईबाबांना भक्ताची काळजी असते

—श्री. लक्ष्मण बापूराव रापतवार
वॉटर वर्क्स, किल्ला, नांदेड

● मी दोन वर्षांपासून हृदयविकाराने आजारी होतो. एकदा प्रकृती तपासून घ्यावी म्हणून औरंगाबादेस आलो. तेथे डॉक्टरांनी सांगितले की हृदयविकाराची मुळीच शिकायत नाही. फक्त वीकनेस आहे. जास्त श्रम करू नये. पायऱ्या चढू नये वगैरे अटी सांगितल्या.

दर वर्षी मी शिर्डीस साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेत असतो. परंतु आजारामुळे दोन वर्षांपासून त्यात खंड पडला. माझ्या जीवाची तळमळ पाहून साईबाबांस दया आली असावी, कारण माझ्या भावाने व पत्नीने मला शिर्डीस चलाच म्हणून आग्रह धरला. केव्हातरी एकदा मरावयाचे आहे मग का घाबरावे म्हणून मीही मनास पक्के केले व आम्ही तिघेजण शिर्डीस दर्शनाकरता निघालो.

माझ्या पत्नीस मोटार सहन होत नव्हती. तिला वांत्या होत होत्या तर माझ्या प्रकृतीच्या मानाने मोटारीचा प्रवास सोयीस्कर होता. माझी पत्नी माझ्याबरोबर निघाली तो साईबाबांचा चमत्कार असा झाला की पत्नीच्या वांत्याच काय साधी चक्करसुद्धा अथवा डोकेसुद्धा दुखले नाही. आम्ही दुपारच्या आरतीच्या वेळी पोहचलो. तडक सामान घेऊनच आम्ही मंदिरात गेलो. आरती संपली. तीर्थप्रसाद घेतला व मी आपल्याला आज मुक्काम करावयाचा म्हणून भावास एखादी खोली मिळत असल्यास चौकशी करून पाहण्यास सांगितले.

थोड्याच वेळात माझ्या भावाने रूमची चावीच बरोबर आणली. आम्हास जी खोली मिळाली होती ती तळमजल्यावर व अगदी गुरुपादुकांच्या समोर. साईबाबा स्वतः आपल्या भक्ताची किती काळजी वाहतात हे ह्यावरून सिद्ध होऊ शकेल.

मला डॉक्टराने पायऱ्या चढू नयेत म्हणून सांगितले होते ते बाबांस समजले असावे म्हणून त्यांनी माझी सोय तळमजल्यातच करून टाकली, व मला त्रास होवू नये म्हणून बाथरुमसुद्धा जोडलेले होते. शिवाय मी रूममध्ये बसल्या बसल्या चोवीस तास साईबाबांचे दर्शन करू शकत होतो. कारण गुरुपादुकेचेमंदीर माझ्या रुमच्या

अगदी समोर होते व बसल्या बसल्या समाधी मंदीराचा कळस व ध्वज माझ्या अगदी जवळ डोळ्यासमोरच दिसत होते. जर मी सबंध आयुष्यभर तेथे राहिलो असतो तरी आनंदी आनंदच झाला असता व कंटाळा आला नसता अशी ती रूम होती. समाधी मंदीरात चाललेला सर्व कार्यक्रम व आरत्या रूममध्ये बसून स्पष्ट ऐकू येत होत्या व तेथूनच मी साष्टांग नमस्कार घालीत होतो.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी आजारी आहे किंवा नाही असे मला स्वत:लाच वाटू लागले. गरम पाण्याने स्नान करून काकड आरतीस हजर राहिलो. साईबाबांच्या समाधीच्या मंगल स्नानास भाग घेतला, तीर्थ प्राशन केले. नंतर आम्ही तिघानी मिळून अभिषेक केला. समाधीचे व साईबाबांचे जवळून दर्शन घडले. साईबाबांच्या चरणी मस्तक टेकले समाधीस साष्टांग दंडवत केले व अशा आनंदात माझे मनोदय पूर्ण झाले. दुपारची आरती आटोपली भोजन घेतले व पुनः पुनः समाधी मंदीरात द्वारकामाईत व चावडीत जाऊन वारंवार साईबाबांचे दर्शन घेतले. अब्दुल बाबा ( ज्याना मी हयातीत पाहिले होते ) त्यांच्या समाधीचे दर्शन घेतले व एस. टी. ने सुखरूप औरंगाबादेस येऊन पोहचलो.

ह्या वेळी जेवढा आनंद माझ्या मनास झाला, तेवढा गेल्या पंचवीस वर्षात कधीच झाला नव्हता. ही सर्व साईबाबांची कृपा नव्हे तर काय. साईबाबा दयाळू आहेत आपला आजारी भक्त दर्शनाकरता येत आहे म्हणूनच त्यांनी माझी सर्व व्यवस्था केली व मला कोणत्याच प्रकारचा त्रास होऊ दिला नाही. साईबाबा माझे कुळ दैवतच नव्हेत, तर माझे माय बाप आहेत. ते आपल्या लेकराची जीवापेक्षाही जास्त काळजी वाहतात.

# श्री. रामचंद्र बाळकृष्ण खोत, सेवानिवृत्त पर्यवेक्षक यांचे दुःखद निधन

श्री साईबाबा संस्थानचे एक ज्येष्ठ व प्रामाणिक सेवक श्री. रामचंद्र बाळकृष्ण खोत यांचे दि. १८।९।८२ रोजी औरंगाबाद येथे मेडिकल कॉलेज हॉस्पिटल मध्ये दुःखद निधन झाले.

श्री. रा. बा. खोत यांचा जन्म दि. २८।२।१९१० रोजी अकोले तालुक्यातील कळस या गावी झाला. प्रथम त्यांनी महसूल विभागात तलाठी म्हणून सेवेस प्रारंभ केला. त्यांची सदर नोकरी अहमदनगर जिल्ह्यात खुद्द शिरडी या गावीही काही वर्षे झाली. त्यानंतर ते त्यांच्यातील हुशारी, प्रामाणिकपणा व कष्टाळूपणा यामुळे सर्कल ऑफीसर या पदापर्यंत गेले. सरकारी नोकरीत उत्कृष्टपणे काम केल्याबद्दल त्यांना केंद्र सरकारकडून प्रशस्तीपत्र व मेडल मिळाले होते. सर्कल ऑफीसर या पदावर काम करीत असतानाच श्री साईबाबांची सेवा करता यावी म्हणून निवृत्ती पूर्वीच त्यांनी सरकारी सेवा सोडून संस्थानमध्ये नोकरी स्वीकारली. त्यांना लवकरच वरिष्ठ लिपीक-पर्यवेक्षक या पदावर नेमून त्यांचेकडे आस्थापना, संस्थानची जमीन, इमारती, कोर्ट कचेऱ्यातील कामे सोपविण्यात आली होती व ती कामे त्यांनी अत्यंत जबाबदारीने पार पाडली. याशिवाय संस्थानकरिता जमिनी संपादन करणे, संस्थानचे हितसंबंधास बाध येऊ न देणे, संस्थानची मालमत्ता रक्षण करणे याकडे त्यांनी सदैव लक्ष ठेवून प्रयत्न केले. निःस्वार्थीपणा हा त्यांचा विशेष गुण होता. ते संस्थानचा माहितीकोषच होते.

त्यांच्या मागे पत्नी, ३ विवाहीत मुली, २ विवाहीत मुले नातवंडे व असंख्य मित्र असा परिवार आहे. त्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

त्यांच्या आत्म्यास श्री साईबाबा शांति व सद्गती देवोत.

## श्रीमती जिजाबाई पुंजा कळसे, भोजनगृह सेविका यांचे दुःखद निधन

श्री साईबाबा संस्थानचे भोजनगृहात सन १९७३ पासून काम करीत असलेल्या श्रीमती जिजाबाई पुंजा कळसे यांचे अवघ्या २८ व्या वर्षी दिनांक १८।९।८२ रोजी श्री साईनाथ रुग्णालयात अल्पशा आजारानंतर दुःखद निधन झाले.

त्यांचा स्वभाव अत्यंत प्रामाणिक, कष्टाळू व मनमिळावू होता. त्यांच्या अकस्मात निधनाने सर्व संस्थान सेवकात हळहळ व्यक्त करण्यात आली.

श्री साईबाबा त्यांच्या आत्म्यास शांति व सद्‌गती देवोत.

× × ×

## श्री. हरीदासबाबा कुलकर्णी यांचे दुःखद निधन

संस्थानचे जुने माजी सेवेकरी श्री. हरीदासबाबा कुलकर्णी यांचे शिरडी येथे दि. १७।९।८२ रोजी सायंकाळी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांनी बरेच वर्षे श्री साईबाबांची भक्ती केली.

श्री साईबाबा त्यांच्या आत्म्यास शांति व सद्‌गती देवोत.

× × ×

## लक्ष्मण साळबा आरणे यांचे दुःखद निधन

श्री साईबाबा संस्थानचे आरोग्य विभागातील एक तरुण सेवक श्री. लक्ष्मण साळबा आरणे यांचे अल्पशा आजाराने अवघ्या २५ व्या वर्षी दि. २१।७।१९८२ रोजी दुःखद निधन झाले. त्यांचा स्वभाव अत्यंत मनमिळावू, कष्टाळू व प्रामाणिक होता. त्यांच्या आकस्मिक निधनाने सर्वांना हळहळ वाटली. त्यांच्या मागे पत्नी, २ मुली असा परिवार आहे.

श्री साईबाबा त्यांच्या आत्म्यास शांति व सद्‌गति देवोत.

# शिरडी–वृत्त माहे ऑगस्ट १९८२ 

या महिन्यात श्रावण आल्यामुळे श्रींच्या दर्शनासाठी भाविक साईभक्तांची गर्दी बरीच होती. सत्यनारायण पूजाही बऱ्याच झाल्या. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे–

**कीर्तन**–१) ह. भ. प. वासुदेवशास्त्री धर्माधिकारी, अकोला जि. नगर.
**प्रवचन**१) ह. भ. प. देशमुखबुवा, शिर्डी.
२) ह. भ. प. शादीलाल शर्मा, जयपूर.
३) ह. भ. प. अनंत गजानन दातार, अंबरनाथ.
४) ह. भ. प. लक्ष्मण महाराज वाघचौरे, शिर्डी.
५) श्री. भानुदास वामन गावडे, मुंबई.

**भजन, गायन, वादन वगैरे**–१) श्री. साईदास बाबा, साईनिलीयम, बैतूल. २) श्री. परशुराम तायवाडे, पार्ला. ३) अण्णासाहेब यादवराव घोटकर, भीवधानोरा. ४) श्री दत्त प्रासादिक भजनी मंडळ, पाढनोली. ५) सौ. शशीबाला जोशी, ठाणे. ६) श्री साईनाथ भजनी मंडळ, ग्वाल्हेर. ७) सौ. मेघना शिरीष शेटे, पुणे. ८) श्री. आप्पासाहेब कागे, भोपाळ. ९) शिर्डी साई करचला मीशन, विजयवाडा. १०) जयविजय ऑर्केस्ट्रा, मुंबई. श्री विजय ल. धोपावकर. ११) श्री. विजय विनायक आठवले. १२) सौ. वैशाली विजय आठवले. १३) श्री. शिरीष कीर्तने. १४) श्री. अनिलचंद वडांगळे १५) श्री. सतीश चंदनशिव १६) श्री. राजू गोडांबे १७) श्री. राजू कुलकर्णी १८) श्री. शिरीष हळदणकर १९) श्री. पांचाळ २०) श्री. निवृत्ती पगारे २१) श्री. सुरेन्द्र कुमार नजमुद्दीन शेख २२) श्री. सतीश चव्हाण २३) श्री. सुधीर चव्हाण २४) कु. अरुणा २५) श्री. नरेन्द्र घोलप २६) 'छबीदार नार गुलजार'चे सर्व कलाकार, पुणे.

**हवापाणी**-शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

**स्वराज्य प्राप्तीदिन**–१५ ऑगस्ट रोजी श्री साईबाबा संस्थान शिर्डीतर्फे रिसीव्हर मा. श्री. क. हि. काकरेसाहेब यांचे शुभ हस्ते ध्वजवंदन कार्यक्रम झाला. संस्थान कर्मचारी, पोलीस, होमगार्ड पथक, सन्माननीय पाहुणे, प्रतिष्ठीत ग्रामस्थ, शिक्षक वर्ग, विद्यार्थी, विद्यार्थीनी, साईनाथ हायस्कूल बॅण्डपथक उपस्थित होते. सर्वांना चहापान देण्यात आले व मुलांना खाऊ वाटण्यात आला.

**गोकुळ अष्टमी कार्यक्रम** – सालाबादप्रमाणे गुरुवार दि. १२–८–८२ गोकुळ अष्टमी कार्यक्रम झाला. रात्री गुरुवारची पालखी झाल्यानंतर रात्रौ १० ते

१२ कृष्णजन्म कीर्तन झाले व नंतर शेजारती झाली. दुसरे दिवशी सकाळी गोपाळकाला कीर्तन व रात्री रथाची मिरवणूक झाली.

# शिरडी वृत्त माहे जून १९८२

## पुरवणी

### "श्री साईनाम सप्ताह"

श्री साई प्रचार केन्द्र, चंदीगड यांनी गुरुवार दि. १०।६।८२ ते गुरुवार दि. १७।६।८२ पर्यंत ७ दिवस श्री क्षेत्र शिर्डी येथे लेंडीबागेत साईनाम सप्ताह साजरा केला. या सात दिवसात त्यांनी 'ॐसाई श्री साई जय जय साई' या नाम मंत्राचा अखंड जप अहोरात्र चालू होता. सप्ताहात अनेक लोकांनी भाग घेतला. तसेच कल्लूर (आंध्र प्रदेश) येथून १०० पेक्षा जास्त लोक श्री साईबाबांचे पालखीसह पदयात्रा करीत शिर्डी येथे आले. त्यांनी साईनाम सप्ताहात भाग घेतला. नंतर दि. १७।६।८२ रोजी ते पायी परतले. सदर सप्ताह कार्यक्रमाचे संयोजन साईभक्त श्री. जे. पी. खन्ना चंदीगड यांनी केले होते.

# शिरडी वृत्त माहे सप्टेंबर १९८२

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. रविवार, गुरुवार व सुटीचे दिवशी बरीच गर्दी होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली, ती खालीलप्रमाणे–

**कीर्तन**–१) ह. भ. प. लक्ष्मण आनंदा मिरजकर, इस्लामपूर.
२) ह. भ. प. डुकरे, पेठ.

**प्रवचन**–१) ह. भ. प. श्री. नैतिकानंद, उक्कलगांव, श्रीरामपूर.
२) ह. भ. प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिर्डी.

**भजन, गायन, वादन वगैरे**–१) श्रीमती नलिनी सदानंद कामत, ठाणे. २) श्री. विठ्ठल विष्णू मांजरेकर, शिर्डी. ३) श्री. नंदकिशोर जी. पुरोहित, मुंबई. ४) स्वामी संजयानंद, बद्रीनाथ. ५) सौ. मीरा संजयानंद ६) श्री सत्यसाईबाबा समिती, उल्हासनगर. ७) तरुण भजनी मंडळी, दसने, पुणे. ८) श्री. रतनलाल शर्मा, नागपूर ९) श्री. श्यामसुंदर भेडा, संगमनेर. १०) श्री. शिवराम बिडवे, ११) मीरा चटरजी, पाटणा. १२) श्री. सुनील माधवराव जोशी, सांगली. १३) श्री अरुण तुकाराम दयाळ, सातारा. १४) संगीतरत्न नन्हेबाबू कुँवर, बिदर. १५) श्री. सत्यनारायण जाधव, हैद्राबाद. १६) श्री साईनाथ भजनी मंडळ, विलेपारले.

**हवापाणी**–शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पाऊस चांगला पडला. साधारणतः मधून मधून एक आठवडा पाऊस पडल्यामुळे पाणीपुरवठा-बाबत काळजी काही प्रमाणात दूर झाली.

☆

## पुरुष नसबंदी शिबीर

श्रीसाईबाबा संस्थान शिरडी व पंचायत समिती कोपरगाव प्राथमिक आरोग्य केंद्र राहाता याचे संयुक्त सहकार्याने दि. २९–९–८२ रोजी श्रीसाईनाथ रुग्ण-लयात नसबंदी शिबीर घेण्यात आले.

शिबीरामध्ये एकूण ११० नसबंदी शस्त्रक्रीया करण्यात आल्या. रुग्णांची व त्यांचे सोबत असलेल्या नातेवाईकांची जेवणाची व चहाची व्यवस्था श्रीसाईबाबा संस्थानतर्फे मोफत करण्यात आली होती.

शस्त्रक्रीया करून घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तिस,

| | |
|---|---|
| संस्थान तर्फे अनुदान | रु. १००–०० |
| सरकारी अनुदान | रु. १५५–०० |
| पंचायत समिती कोपरगाव तर्फे अनुदान | रु. २५–०० |

असे एकूण रु. २८०–०० अनुदान व प्रमोटरला प्रत्येक केस मागे रु. २७–०० रोख अनुदान देण्यात आले.

या शिबीरात संस्थान रुग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. जोशी, वैद्यकीय अधिकारी डॉ. देशपांडे तसेच राहाता प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ गुंजाळ, डॉ. क्षीरसागर, डॉ. स्वामी, डॉ. पाटील व डॉ. दोंडीवाला यांनी शस्त्र-क्रिया केल्या; व शिबीर यशस्वीरित्या पार पाडण्यास बहुमोल मदत केली.

शिबीराचा अनुदान व सत्कार समारंभ संस्थानचे शासकीय अधिक्षक श्री. द. चिं. पाटक यांचे हस्ते, मा. सभापती श्री. काळवाघे, बी. डी. ओ. श्री. शिंदे, शिक्षण विस्तार अधिकारी वगैरे मान्यवर व्यक्तींच्या उपस्थितीत करण्यात आला.

शिबीराचे यशस्वी आयोजन व शिबीरात बहुमोल मार्गदर्शन संस्थानचे रिसी-व्हर मा. क. हि. काकरेसाहेब यांनी केले.

## साईभक्त संत श्री बशीरबाबा

● जागतिक साई प्रचार सभेचे संत श्री बशीरबाबा मु. पो. कडप्पा (हैद्राबाद) हे आपले ६०० ते ७०० स्त्री-पुरुष शिष्यगणांसह श्री साईबाबांचे दर्शनासाठीं आले होते. त्यांचा मुक्काम दि. २५-८-८२ ते ४-९-८२ पर्यंत होता. या काळात त्यांनी शिर्डी येथे यज्ञ, प्रवचन, आरती वगैरे धार्मिक कार्यक्रम केले.

# भारतातील श्रीसाईबाबांची मंदिरे

(मागील अंकावरून क्रमशः)

९३) श्रीसाई मंदिर — वॉटरवर्क्स जवळ, मु. पो. राजमहेंद्री, (पूर्व गोदावरी जिल्हा) आंध्रप्रदेश

९४) श्री साईबाबा मंदिर — रंगावरम, मु. पो. विजयवाडा, आं. प्र.

९५) श्रीसाई मंदिर — सेक्टर नं. १२ भिलाई (मध्यप्रदेश)

९६) श्रीसाई वैभव कार्यालय — विठ्ठल मंदिर रोड, वार्ड नं. ९ मु. पो. वर्धा

९७) श्री द्वारकामाई — अरूंडेल पेट, मु. पो. गुंतूर (आं. प्र.

९८) श्रीसाईनाथ मंदिर — गेन्नावरम, तालुका कनिगिरी जि. प्रकाशम

९९) श्री साईबाबा मंदिर व मिशन — साईनगर, लालागुड्डा, मु. पो. सिकंदराबाद

१००) श्रीदत्त साई मंदिर — नागाश्रम, मंदिर तळाव, मु. पो. खरगपूर

१०१) श्रीसाई मंदिर — नारायण घाट, वाराणसी

१०२) श्रीसच्चिदानंद साईनाथ महाराज मंदिर — ४-७-३२९ ईसामिया बाजार, मु. पो. हैदराबाद २७ आंध्रप्रदेश

१०३) श्रीसाईबाबा मंदिर — मु. पो. गरखल, हिमाचल प्रदेश।

१०४) श्रीसाईबाबा सेवासमिती — नलिनी भवन, रायसिंहची बाग, कॅम्प, मु. पो. ग्वाल्हेर

१०५) श्रीसाई मंदिर — श्रीसाई सदन, गांधीनगर, मु. पो. आबूरोड, राजस्थान